

# श्री सप्तशती गुरुचरित्रसार


(गद्य रुपांतर)

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस
गुरुपोर्णिमा
२९ जुलै २००७

मुद्रक
**ग्राफिक प्रिंटर्स**
वझिरा नाका, बोरिवली (पश्चिम),
मुंबई - ४०० ०९१.
दूरध्वनी क्र. २८९९ ९३३०, २८९९ ९२३९, ९३२२८४०८४६

प्रकाशक
**श्री भगवती प्रकाशन**
६/१, साईविहार, कर्वेनगर,
पुणे - ४११ ०५२



प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर

# अध्याय १

पारमार्थिक ग्रंथांचे उत्तम ज्ञान व्हावे अशी ज्यांना इच्छा आहे त्यांनी आपले अंत:करण सर्वप्रथम निर्मत्सर केले पाहिजे. दुसऱ्याच्या कल्याणाबद्दल असणाऱ्या द्वेष बुद्धीला मत्सर असे म्हणतात. जगाची उत्पत्ती, स्थिती आणि लय करणाऱ्या सगुण ईश्वराचा प्रसाद संपादन केला तर सर्व दु:खे दूर होतात. हे जर, स्वत:ला दु:खी समजणाऱ्या जीवाला सोप्या भाषेत समजावले तर तो सगुणोपासना करण्यास प्रवृत्त होतो. सगुणाकडून पुढे निर्गुणाकडे नेण्यासाठी मोठ्या महाराजांनी हा ग्रंथ केला. हा ग्रंथ आहे तरी काय? तर संपूर्ण वेदांचे सार याच्यामध्ये आलेले आहे. इतरही शास्त्रीय सिद्धांत यात आलेले आहेत. ते सगळे समजावून घेतले पाहिजेत. श्री म्हणतात जरी यात श्रीगुरुंच्या लीलांचे वर्णन असल्यामुळे याला श्रीगुरुचरित्र असे नांव असले तरी मुख्यत: शिष्यांनी कसे वागावे याचे यात मुख्य मार्गदर्शन केले आहे.

भक्तीने ज्याची प्राप्ती होते अशा त्या श्रीदत्तप्रभुंचे चरित्र मोठे महाराज संक्षेपाने सांगताहेत. सद्भावी भक्तांनी दत्तप्रभुंच्या चरणी चित्त ठेवून हे चरित्र ऐकावे. या चरित्राचा कर्ता स्वत: श्रीदत्तप्रभू जरी असले तरी त्यांनी मोठ्या महाराजांना निमित्त केले आहे, हे मानून जे हे चरित्र वाचतील किंवा भक्तीने ऐकतील तेच हा भवसागर तरुन जातील, आपल्या कुळाचा उद्धार करतील. ज्याचे मनाने ज्ञान करून घेता येणार नाही, ज्याचे वाणीने वर्णन करून सांगता येणार नाही, तो स्वत:च्या इच्छेने भक्तांना आपले ज्ञान करून देतो. असा हा नरसिंह सरस्वती कलीयुगी भक्तांसाठी अवतरला.

कृष्णातीरावरही दत्तप्रभू आहेत आणि अमरजातीरावरही आहेत. सर्व लोकांना पावन करणारे त्यांचे चरित्र आहे. त्याचे श्रवण करण्याने, अखंड चिंतन करण्याने पुष्कळ फळ मिळते. त्या चरित्राच्या श्रवणाने, पठणाने मन पवित्र होते.

कृष्णा व अमरजातीरावर संन्यासीरुपाने राहून सर्वत्र संचार करून लोकांना पवित्र करणाऱ्या अनेक प्रकारच्या लीला त्यांनी केल्या. आता ते स्थान सोडून कुठेही गेलेले नाहीत. हे पहाणाऱ्याने सांगितले आहे (मोठ्या महाराजांनी) आपलं, असंच

कोणाच्या तोंडून ऐकून लिहिलेले नाही. ही दंत कथा नाही. ज्यांना दर्शनाची तळमळ लागलेली आहे त्यांना ते आजही दर्शन देतात. नामधारक हा सरस्वती गंगाधराचा पुत्र. त्याच्या कानावर दत्तप्रभुंचा महिमा आला होता. तो त्रिविध तापाने पोळलेला होता आणि याला या दुःखातून दत्तप्रभुच बाहेर काढतील असा विश्वास निर्माण होऊन तो गाणगापूराला निघाला होता. दत्तप्रभु जरी अव्यक्त असले तरी आपण त्यांच्या पादुकांचे दर्शन घेऊ असे त्याने ठरवले आणि येताना वाटेत तो त्यांची निरनिराळ्या रीतीने स्तुती करु लागला. तो जिज्ञासू भक्त आहे, श्रद्धावान आहे तरीही त्याला क्षणभर असे वाटले की आपल्याला ज्या अर्थी दत्तप्रभुंचे दर्शन होत नाही त्या अर्थी त्यांचे आपल्याकडे लक्ष नाही किंवा आपले पाप अधिक असले पाहिजे म्हणून आपली अशी स्थिती झाली असावी.

अशा स्थितीत अत्यंत कळकळीने धांवा करूनसुद्धा जेव्हां त्याला दत्तप्रभुंचे दर्शन झाले नाही तेव्हां मात्र दुःखावेग अनावर होऊन तो मूर्च्छित पडला. मग मात्र दत्तप्रभुंनी त्याला स्वप्नात दर्शन देऊन आश्वासन दिले. तेव्हां त्याची ती सामान्य अर्थाने मूर्छा नव्हती तर सद्गुरुंच्या दर्शनाच्या तळमळीने एकनिष्ठा उत्पन्न होऊन ध्यान लागले, दत्तप्रभुंचे दर्शन झाले आणि थोड्या वेळाने जागृतावस्था प्राप्त झाल्यावर आपले स्वप्न खरे असल्याचे त्याला जाणवले.

○ ○ ○



## अध्याय २

दत्तप्रभुंचे स्वप्नात दर्शन झाल्यावर नामधारक उठून चालू लागतो तर त्याला सिद्ध भेटतात. नामधारक त्यांना त्यांचा परिचय विचारतो. ते अतिशय आनंदित होऊन सांगतात, ''ज्याच्या भक्तांना कधी दैन्य, ताप वगैरे पहात नाही असे दत्तप्रभु आमचे गुरु आहेत.'' हे ऐकल्यावर नामधारक त्यांना म्हणतो, ''मी सुद्धा त्यांचा भक्त असताना त्यांनी माझी उपेक्षा कशी केली ?'' हा प्रश्न ऐकून सिद्ध मनांत विचार करतात, ''या विश्वरुपी यंत्र चालकाच्या म्हणजे दत्तप्रभुंच्या ठिकाणी याचे चित्त अजून स्थिर झालेले दिसत नाही'' आणि नामधारकाला ते म्हणतात, ''तू कसाही वागून देवाला उगीचच दोष देतो आहेस. इतर कोणाला कोप आला तर गुरु आपल्या भक्तांचे रक्षण करतात पण गुरुंना मात्र कोप आला तर कोणीही रक्षण करु शकत नाही.'' तेव्हां नामधारक सिद्धांना गुरुंची थोरवी सांगायची विनंती करतात. त्याप्रमाणे सिद्ध सांगतात..

गोदावरी तीरावर राहाणाऱ्या वेदधर्मा ऋषींना पुष्कळ शिष्य होते. वेदधर्मा ऋषींनी या शिष्यांची निष्ठा कशी आहे हे एक दिवस पाहायचे ठरवले. स्वतःचे प्रारब्ध जाणणारे ते ज्ञानी महात्मे होते. त्यांनी शिष्यांना सांगितले, ''तपश्चर्येने माझे पुष्कळसे पाप गेले आहे. थोडे भोगायचे शिल्लक राहिले आहे. त्यामुळे माझ्या शरीरात व्याधी निर्माण होणार आहे. त्या व्याधीरुपाने ते भोगायचे आहे. त्यासाठी मी काशीत जाऊन राहाणार आहे. तेव्हां तिथे माझे रक्षण (सेवा, शुश्रुषा) करायला तुमच्या पैकी कोण यायला तयार आहे ?'' प्रथम सगळे शिष्य म्हणाले, 'आम्ही येऊ' तेव्हां वेदधर्मा ऋषी म्हणाले, ''तिथे आपली जेवाखायची उत्तम सोय आहे. केव्हां तरी गुरुंजवळ जायचे आणि थोडा वारा घालून यायचे असे नाही. माझ्या सबंध शरीरातून कुष्ठरोग वाहाणार आहे. माझ्या अंगावर माशा येऊन बसणार, त्या दूर केल्या पाहिजेत. माझे अंग स्वच्छ धुवून काढले पाहिजे. मला भिक्षा मागून अन्न आणून दिले पाहिजे. ही सगळी सेवा करायची, कोण माझे रक्षण करणारा आहे ?'' हे त्यांनी सर्वांच्या समोर मांडले.

सगळे गप्प बसले. ही सेवा कांही शक्य नाही. कठीण आहे. दीपक नांवाचा एकच शिष्य मात्र ही सेवा करायला तयार झाला. तो म्हणाला, ''दोष शिल्लक ठेवणे

योग्य नाही. कारण तो दोष मोक्षाला विघ्न उत्पन्न करेल. तेव्हा तुमचे जे प्रारब्ध आहे ते मी माझ्या देहाने भोगीन.'' म्हणजे नुसती सेवा करायची तयारी नाहीये. गुरुंचे सगळे भोग भोगायची तयारी आहे. म्हणजे केवढी उच्च भक्ती आहे.

वेदधर्मा म्हणाले, ''ह्या भोग भोगण्यास प्रतिनिधी चालत नाही. आणि पापभोगाचा प्रतिनिधी कोणी होणार नाही. पुण्य भोगणारे पुष्कळ तयार होतील, देणारेही तसेच पाहिजेत. पुण्य घेऊन जा, बाबा. तसे देतात म्हणा शेवटी. ज्ञानी मनुष्य आपला देह सोडायच्या वेळेला दुसऱ्याला भोग देऊन शकतो. असे म्हणतात, साधू-सत्पुरुष देह ठेवायच्या वेळी त्यांचे धन वगैरे जे कांही असेल ते मुलाबाळांना मिळते. सगळ्या कर्मातून तो मुक्त होणार आहे. त्याची मनोभावाने सेवा करणारे जे भक्त आहेत त्यांना त्याचे पुण्य मिळते आणि त्याचा द्वेष करणारे, शत्रु बुद्धीने राहाणारे जे आहेत त्यांना पाप जाते आणि तो सत्पुरुष मोकळा होतो. ही अशी वाटणी केलेली आहे. तेव्हां मला स्वत:लाच तो भोग घ्यायचाय काशीमध्ये जाऊन. शक्ती असेल तर माझे रक्षण कर.''

वेदधर्मा मोठे तपस्वी पुरुष. केवढे तप केलेले, केवढे ज्ञान मिळवलेले, केवढ्या सिद्धी मिळाल्या होत्या! शिष्याला लगेच त्यांनी कृतार्थ केले ना!! म्हणजे हे ज्ञान स्वयंसिद्ध आहे. पण अशा स्थितीमध्येसुद्धा एकदम कुष्ठरोग झाला. अंध झाले. दीपक त्यांची सेवा करु लागला. गुरुंच्या शरीरावर व्रण झालेले, जखमा झालेल्या. त्याच्यातून रक्त पू वाहात होता. त्या व्यथेमध्ये कार्याकार्याकडे लक्ष लागत नाही. विरुद्ध आचरण करु लागले, बोलू लागले. शिष्याला मारु लागले. सेवा करायला लागल्यानंतर एकदम म्हणायचे, ''भिक्षा मागून आण. मला भूक लागली आहे बरं'' भिक्षा मागायला निघाले की म्हणावं, ''काय माझे अंग धूत नाहीस, कशाला भिक्षा मागतोस?'' वाटेल तसे बोलायचे आणि त्याने जर सांगितलेले ऐकले नाही तर मारावे त्याला.

पण दीपकाच्या मनाला एकदासुद्धा खेद नाही. कांही नाही. म्हणजे सेवेच्या वेळेलाच ज्ञान झाले आहे. देह तादात्म्य गेले ना त्याचे! देह तादात्म्य असताना गुरु बोलले, मारले तर लगेच राग यायला हवा त्याला. पण त्याला राग आला नाही.



म्हणजे इतकी कर्तव्यनिष्ठा, गुरुभक्तीचे साधन इतक्या कठोरपणाने पालन करतो आहे, की मानापमान नाही. जर मनाला वाटले, 'मी इतके करतो तरीसुद्धा ह्यांना पसंत पडत नाही?' असा केव्हांही त्याच्या मनांत विचार आलेला नाही. दीपकाने मागून आणलेली भिक्षा, 'हे कसले आणलेस अन्न', असे सांगून गुरुंनी ती फेकून द्यावी. चांगले पक्वान्न घेऊन यायला सांगावे. बरं, बाबा निघाला भिक्षा मागायला, तेवढ्यात म्हणाले, ''थांब माझी देहशुद्धी तूं केली नाहीस. कुठे जातोस? ह्या सगळ्या माशा मला चावतायत.'' बरं, बाबा राहिलं. नाही जात भिक्षेला त्यांने अंग स्वच्छ करायला सुरवात केली की म्हणावं, काय कळत नाही तुला? मला इतकी भूक लागलेली असताना हेच करीत बसलास तूं? असे पुन्हा त्यावेळेला बोलायचे. लवकर अन्न आण. याचना करुन त्याला भिक्षा आणावी लागत होती त्याला आणि ह्यांनी ती फेकून द्यावी. आमचे गुरुमहाराज आजारी आहेत त्यांना परत भिक्षा द्या, असे मागूनच आणावे लागेल की नाही. त्यावेळेला भिक्षा देणारे चांगले भेटले तर ठीक. नाहीतर त्यांचे पुन्हा शिव्याशाप खायचे. नाही तर दुसऱ्या घरी जायचे. म्हणजे किती छळ आहे हा! जेवण वगैरे झाल्यावर एखादे वेळेला म्हणावे, ''दीपका,दमलास रे फार तूं, फार सेवा केलीस. नीज बाबा तूं.'' जर दीपकाने अंग टाकले की म्हणावे, ''अरे भूक लागली आहे.'' म्हणजे चालला लगेच भिक्षा मागायला. बाहेरचे शिव्याशाप खायचे, गुरुंचे खायचे.

पण दीपकाचे अंत:करण शुद्ध आहे. निराशा नाहीये. तितिक्षा, देहात्म विवेक वगैरे सगळा अभ्यास झाला आहे. मग ज्ञान व्हायला काय वेळ लागणार? इतका छळ केला तरी दीपकाच्या मनामध्ये कांही खेद नाही. स्वत:च्या देहाकडेसुद्धा लक्ष न देता अहोरात्र सद्‌गुरुंची सेवा करतो आहे. त्याला स्वत:ला जेवायला कुठला अवसर मिळणार. गुरु म्हणाले, नीज जरा. दमलायस. पण कुठले निजायला! लगेच पुन्हा हांक मारलीच. आपले सद्‌गुरुनाथ हे सर्व देवांचे नियामक आहेत ही बुद्धी त्यांची आहे. सेवा करतो आहे. क्षुधा, तुष्णा सगळे गेलेले आहे. मनोनिग्रह, इंद्रिय निग्रह सगळा झालेला आहे. अशी सेवा चालली आहे. सद्‌गुरुंच्या चरणाचे तीर्थ हेच गंगाजल आहे. सद्‌गुरु हे साक्षात् विश्वेश्वर आहेत, आनंदनिधी आहेत, ही खात्री मनामध्ये ठेवून आपले मन त्याने इतरत्र कुठेही जाऊ दिले नाही.

सद्‌गुरु महाराज ही त्याची परीक्षा पहाताहेत, असा एक उद्देश्य दिलेला आहे. शिष्याची परीक्षा पहाण्याकरता असे क्लेश भोगताहेत. त्या गुरुभक्तीमुळे पवित्र झाला आहे तो. ईश्वरसाक्षात्काराची योग्यता त्याला मिळाली आणि विश्वेश्वर त्याचेजवळ आले. विश्वेश्वरांनी त्याला दर्शन दिले. म्हणाले, ''तुला वर देण्याकरता मी आलोय. तुला पाहिजे तो वर मागून घे. तुझे कल्याण होईल.'' दीपक म्हणाला, ''मला कांही वर बीर नको. आपले कुष्ठ दूर व्हावे अशी जर गुरुमहाराजांची इच्छा असेल तर मी त्यांना विचारुन येतो.'' रोजच्या रोज गुरुंचे शिव्याशाप कशाला खायचे त्यापेक्षा ते बरे व्हावेत असा वर तो परस्पर मागू शकला असता. पण नाही. त्यांना विचारुन येतो, म्हणाला. पण तसे मनांत नसल्यामुळे, ''गुरुमहाराजांची तशी इच्छा असेल तर वर तसा मागतो,'' म्हणाला.

आंत येऊन गुरुमहाराजांना विचारले, ''विश्वेश्वर वर द्यायला आलेत. तुमचे कुष्ठ बरे व्हावे म्हणून वर मागू कां?'' ते म्हणाले, ''नाही. भोग भोगूनच प्रारब्ध सारायचे असते. मला तसा वर नको. ईश्वराच्या वराने बरे व्हायचे नाही. माझ्या सेवेबद्दल तुला भीती वाटायला लागली की काय? मग आलासच कशाला सेवा करायला?'' शंकरांच्याजवळ येऊन सांगितले, ''गुरुमहाराजांची इच्छा नाहीये. त्यांचे क्लेश शांत करण्याकरता मी वर मागणार होतो. त्यांना तशी इच्छा नाही. मलाही इच्छा नाही.'' विश्वेश्वरांचा हा पहिलाच प्रसंग आहे. सगळे मागणारेच असतात. अर्थार्थी असतात. हा अर्थार्थी नाही. म्हणजे केवढी योग्यता त्या दीपकाची आहे.

खिन्न झाले विश्वेश्वर. निर्वाण मंडपात सगळे विष्णू वगैरे देव बसले होते तिथे आले. त्यांनी सर्वांना सांगितले, ''वेदधर्मा ऋषी अतिशय रागीट आहेत. रोगी झालेले आहेत आणि त्यांचा शिष्य मात्र उत्तम आहे. त्यांची सेवा करण्यात क्लेश मानत नाही. कांही नाही. वर देण्याकरता मी गेलो पण केवळ गुरुंची इच्छा नाही म्हणून मी वर देत असतानाही घेतला नाही. सर्व व्यवहारापासून दूर झालेला आहे. उपरती ज्याला म्हणतात.'' शंकर, विष्णू सगळ्या देवांना कौतुक वाटते आहे. एवढा हा गुरुभक्त कोण आहे असे वाटून त्याला पहाण्यासाठी विष्णू आपण होऊन आलेले आहेत. हे मोठे साधन आहे. कोण आहे हा दीपक, हे पहाण्याकरता आलेत. म्हणाले, ''बाळ मी वर द्यायला



आलोय, वर मागून घे, तप आहे. अष्टांग योग आहे. मानादिक सत्कर्म आहे, उपवास आहे व्रत आहे, अशा कोणच्याही धर्माने मी कांही दर्शन देत नाही. माझे दर्शन, गुरु, सद्विप्र यांचा जो भक्त आहे. माझ्याकडे ज्यांचे अंत:करण लागलेले आहे असा जो निर्द्वंद्व झालेला आणि जी पतिव्रता, पतिनिष्ठ स्त्री आहे तिला मी दर्शन देतो. अत्यंत कष्टाने तूं सद्‌गुरुंची सेवा केलेली आहेस. त्यामुळे माझ्या मनाला संतोष झालेला आहे. तुला काय मागायचा तो वर मागून घे.''

दीपक म्हणाला, ''सद्‌गुरु महाराज हे देवदेव आहेत. सगळ्या देवांचे देव आहेत. त्यांच्यापासून ज्ञान मिळणार आणि मोक्षही तेच देणारे आहेत. तेव्हां दुसऱ्या कोणाकडे मला कांही मागायचे नाही. आपल्यासारखे देव इथे यायला लागले म्हणजे आमची बुद्धी योग्य आहे असेच झाले की नाही.'' मनाचा काय विश्वास आहे! वा, वा. इतकी सेवा मनापासून करीत आहे. पण मनावर विश्वास नाही वाटला. तो म्हणतो, ''ऋषिकेश आपण आहात. इंद्रियांचे अधिपती. विश्वेश्वरांना तसेच परत जावे लागले. तस परत जाणे जर आपल्याला बरं वाटत नसेल तर माझ्या चित्तामध्ये सद्‌गुरुंची स्थिर भक्ती रहावी, त्याशिवाय दुसरा वर मला नको.'' इतकी भक्ती असताना देवांनी आपल्याकडे लक्ष दिले पाहिजे हे सुचविले आहे त्याने. तुम्ही (विष्णू) सगळ्या इंद्रियांचे अधिपति आहात ना! मागितले तेवढाच वर देव देत असतात. आपण होऊन जास्ती कांही देत नाहीत. पण इथे मात्र त्याला आपण होऊन देताहेत. विष्णू म्हणाले, ''गुरुभक्ती तुझ्याकडे आहे. ती काय द्यायची. तूं न मागितलेले मी देणार आहे. तुला भक्ती आणि मुक्ती मिळेल. तुझी उत्तम कीर्ती होईल. तुझ्या चरित्राचे चिंतन करणाऱ्याचाही ताप दूर होईल. देवाच्या वराने ज्याला विषय भोग मिळाले, त्यामुळे त्याला आसक्ती निर्माण होते. अध:पात करते.'' भगवान् म्हणाले, ''जो भक्त सद्‌गुरुंची सेवा करतो, त्यांच्याजवळ ज्ञान मिळवतो त्याच्या संन्निध मी असतो. अशा भक्ताला कालापासूनही भीती नाही. सर्व सिद्धी त्याच्या दासी होतील.'' असे सांगून भगवान श्रीहरी गुप्त झाले.

तो आंत आल्यावर वेदधर्मा ऋषींनी विचारले, ''काय रे, विष्णुंजवळ काय मागितलेस तू? काय दिले त्यांनी?'' तो म्हणाला, '' मी कांहीच मागितले नाही त्यांनी जे जे देतो सांगितले ते मी ऐकले आणि आलो.''

झालं. परीक्षा संपली. सद्‌गुरुंनी त्याच्या मस्तकावर हात ठेवला. त्याला तत्क्षणी सर्व ज्ञान झाले. स्मरण करणाऱ्यांचासुद्धा ताप दूर करण्याची योग्यता दीपकाच्या ठिकाणी आली. तो जीवनमुक्त झाला. वेदधर्मा ऋषींचे पाप शिल्लक होते असे म्हणता येईल का? काशीक्षेत्राचे महात्म्य वाढवण्यासाठी त्यांनी कुष्ठरोग घेतला. काशीक्षेत्राचे महात्म्य इतके आहे की कितीही पाप असले तरी काशीमध्ये ते जाते. प्रारब्ध संपते. शिष्याचा गुरुभाव किती आहे याची परीक्षा करायची, केवढी परीक्षा आहे ही! शिष्याचा भाव पक्का करायचा आहे. त्याकरता वेदधर्मा ऋषींनी कुष्ठरोग घेतला.

ब्रह्मदेव कलीला म्हणाले, ''अशा पुष्कळ गुरुकथा आहेत की ज्या वक्ता आणि श्रोता यांच्या पापांचा नाश करतात. तेव्हां भूलोकावर जा पण अशा गुरुभक्तांकडे नजरसुद्धा टाकू नकोस. तुझी अवस्था काय होईल विचार कर.'' त्याला ताकीद केली.

सिद्ध सांगतात, ''नामधारका, हे वेदधर्मा म्हणजे लौकिक गुरु आहेत. ज्ञानी झालेले आहेत, ईश्वराभिन्न आहेत. पण त्या लौकिक गुरुंचाही महिमा ऐवढा आहे की इतर देवांकडून त्यांचा शिष्य वर घ्यायलाही तयार नाहीयेय. हा परमात्मा (नरसिंहसरस्वती) गुरुस्वरुप घेऊन आलेला आहे. त्रिमूर्ती-स्वरुप आहे. सात्विक वृत्ती धारण करून दृढ भक्तीने सद्‌गुरुंचे जे भजन करतात, ते गुरुभक्त कृतकृत्य होऊन जातात. संशय घेणाऱ्यांना कांहीही मिळत नाही. तेव्हां नामधारका, तुला जर कल्याण व्हावे अशी इच्छा असेल तर दृढ श्रद्धेने आणि संशय मनांत न आणता सद्‌गुरुंचे भजन कर. मनुष्यरुपाने तेच आलेले आहेत. म्हणजे भवसमुद्र पार करुन जाशील.''

○○○



## अध्याय ३

नामधारकाने दोन प्रश्न केले होते. 'गुरु हे देवापेक्षाही श्रेष्ठ आहेत का? त्यांचे महत्व का?' त्याबद्दल वेदधर्मा ऋषींच्या कथेत ब्रह्मदेव व कलीचा संवाद सांगितला. आता हा त्रयात्मा आहे, त्रैरुप आहे, ह्याने मनुष्यरुप कां धारण केले? हा प्रश्न आहे. स्वत: परब्रह्म असताना तो मानवरुप कां झाला? हा नामधारकांचा प्रश्न ऐकून सिद्धांना फार आनंद झाला.

सिद्ध म्हणाले, ''गुरुंची भक्ती तुझ्या चित्तात उत्पन्न झाली. मोठा धन्य आहेस तूं. ईश्वराचा तुझ्यावर अनुग्रह आहे. आत्तापर्यंत कोणीही हा प्रश्न मला विचारला नाही. इतका मी भूमीवर फिरलो पण कोणीही मला सद्‌गुरुंचे चरित्र विचारले नाही. म्हणून माझा बोधाब्धी तुझ्या भक्तीचंद्राने अगदी भरुन आलेला आहे. अनंताच्या लीला अनंत आहे म्हणतात. त्यांचे स्मरण होण्यालाही प्रश्न पाहिजे. आपल्या बुद्धीचे परिमाण जेवढे असेल तेवढे स्मरण होण्यालासुद्धा प्रश्नांची जरुरी आहे. तो प्रश्न तूं केल्यामुळे मला आनंद झाला आहे. कलीयुगामध्ये पुष्कळ नास्तिक मर्त्य आहेत म्हणतात. भगवंतांच्या कथा श्रवण करणे म्हणजे हा भवाब्धी तरून जायला नौका आहेत. हे नास्तिकांना कळत नाही म्हणतात. म्हणून ते या समुद्रात बुडतात.'' समुद्राचे त्यांनी रुपक केले आहे.

अज्ञान म्हणजे हे जग आहे. तृष्णा म्हणजे त्या समुद्राच्या लाटा आहेत. वाढलेली आशा म्हणजे या लाटा आहेत. या समुद्रात असणारे मगर वगैरे जलचर प्राणी म्हणजे कामक्रोधादिक विकार आहेत. भोग म्हणजे ध्वनी. समुद्राचा आवाज म्हणजे ध्वनी. कांही आनंदाचाही शब्द आहे. सुख भोगाच्या वेळेला आनंद शब्द आहे आणि दु:ख भोगामुळे हाय, हाय हाही शब्द आहे. असा ध्वनी आहे. ही गुरुकथा म्हणजे नौका आहे. नावाडी म्हणजे सद्‌गुरु आहे. ईश्वर-कृपा हा अनुकूल वारा आहे.

सिद्ध नामधारकाला म्हणाले, ''तुला ही सगळी साधनं मिळाली. कांही प्रयत्न न करता भवसमुद्रातून तूं लवकरच तरुन जाशील. म्हणून सद्‌गुरुंच्या कथा मी सांगतो,'' असा उपक्रम करुन सांगताहेत. हे गुरुचरित्र भीमा-अमरजा संगमावरील अश्वत्थ वृक्षाखाली बसून सांगितलेले आहे. हे गुरुचरित्र कसे आहे? तीन प्रकारचे लोक आहेत संसारी विषयासक्त, मुमुक्षु आणि मुक्त, हे गुरुचरित्र सर्वांनाही उपयोगी

पडणारे आहे. हे गुरुचरित्र पठण केले म्हणजे जी इच्छा असेल ती पूर्ण होते. म्हणजे विषयी लोकांनाही उपयोगी आहे. मुक्तांना आनंद देणारे चरित्र आहे. म्हणून त्यांचे जीवनआधारभूत आहे किंवा जीवनाचे साफल्य करणारे आहे. वेदांत गुरु आणि ईश्वर हे तिन्ही या गुरुचरित्रात आहेत. त्यांचे सेवन ज्ञानी माणसानेसुद्धा केले पाहिजे. ज्ञान प्राप्त होण्यापूर्वी ज्ञान मिळण्याकरता करायचे. ज्यांच्यामुळे आपण ज्ञानी झाली त्यांची सेवा सोडायची नाही, कृतघ्न होऊ नये म्हणून नंतरही सेवन करायचे. अशा रीतीने ज्ञानी माणसाचेसुद्धा जीवनसाफल्य करणारे आहे. असे हे चरित्र वाणी आणि मन यांच्या पलीकडे आहे. सांगणे कठीण आहे. यथामती थोडेसे मी ते सांगणार आहे. असा उपक्रम करुन सुरवात केली.

लोकांवर अनुग्रह करुन उद्धार करण्याचे कार्य करण्याकरता दत्तप्रभुंचा अवतार झाला आहे. अनंत जीव आहेत आणि त्यांचा उद्धार करण्याचे कार्य संपणारे नाही. म्हणून दत्तात्रेयांनी अवतार समाप्ती न करता आपले सद्‌गुरुस्वरुप तसेच ठेवले आहे.

आता नामधारकाने विचारले, ''देवाने दशावतार कां घेतले ? दुर्वास ऋषींना शाप देण्याचे कारण काय ? शिवाय ज्याला जन्म नाही मृत्यु नाही अशा अव्यक्त श्रेष्ठ परमेश्वराला शाप लागला तरी कसा ?''

सिद्ध म्हणाले, ''अव्यक्त भगवान् भक्ताधीन असल्यामुळे व्यक्त होतात आणि भक्तीने बोलावले की येतात. तसे हे व्यक्तरुपाने आल्यामुळे त्यांना दुर्वासांनी शाप दिला.''

अंबरीष राजा मोठा भगवत् भक्त होता आणि अतिथींची सेवा करणारा होता. तो निर्जला एकादशीचे व्रत करीत असे. त्याचा व्रतभंग करण्याकरता एका द्वादशीला दुर्वासऋषी अंबरीषाकडे सकाळी येऊन, ''मला जेवायला दे'' म्हणाले.

राजा म्हणाला, आपण आपले आन्हिक आटोपून या, मी आपल्याला भोजन देतो. दुर्वासऋषी नदीवर स्नान करण्यासाठी गेले आणि राजाची पारण्याची वेळ टळावी म्हणून तिथेच थांबले. इकडे राजाने विचार केला. दुर्वासऋषी येण्यापूर्वी आपण द्वादशी सोडली तर त्यांचा शाप होईल. बरं पारणे वेळेवर सोडले नाही तर आपला



व्रतभंग होईल. म्हणून त्याने विचार केला की आपण पाण्यानेच पारणे करावे म्हणजे अतिथीच्या अगोदर जेवलो असे होणार नाही आणि पारणेही केल्यासारखे होईल.

दुर्वासऋषी परत आल्यावर त्यांना हे समजले आणि राजाने आपल्या आधी पाणी घेतले म्हणून त्याला असा शाप दिला की, 'तूं प्रत्येक जन्मात फिरत राहाशील तुला गर्भवासाचे दु:ख भोगावे लागेल.'

हे ऐकल्यावर अंबरीषाने भगवंतांचे स्मरण केले. भगवान विष्णू लगेच तिथे येऊन दुर्वास ऋषींना म्हणाले, ''राजाच्या ऐवजी मला शाप द्या.'' दुर्वासांनी विचार केला, 'चांगलं आहे, वैकुंठात राहाणाऱ्या भगवंताला भूमीवर येण्यासाठी कांही तरी निमित्त नको का ! भगवान जर भूमीवर आले तर लोकांचे कल्याणच होईल' आणि त्या प्रमाणे भगवंतांनी अवतार घेतले...

चैत्र शुद्ध तृतीयेला अपराण्हकाळी मत्स्यावतार झाला

वैशाख पौर्णिमेला सायंकाळी कूर्मावतार झाला. राक्षसांनी समुद्रात नेलेले वेद कूर्माने ब्रह्मदेवांना परत आणून दिले. मनुचे रक्षण केले. समुद्र मंथनाच्या वेळेला तो पर्वत आपल्या पाठीवर घेतला. भाद्रपत शु. तृतीयेला वराह अवतार झाला. या अवतारात जलात बुडलेली भूमी वर काढली आणि हिरण्याक्षाचा नाश केला.

वैशाख शुद्ध चतुर्दशीला प्रदोष काळी नृसिंह अवतार धारण करुन हिरण्यकश्यपूचा नाश केला.

भाद्रपद शुद्ध द्वादशीच्या दिवशी मध्यान्ह काळी वामनावतार झाला. या अवतारात त्यांनी बळीला बांधून ठेवले.

वैशाख शुद्ध तृतीयेला मध्यान्ह काळी परशुरामांचा अवतार झाला. या अवतारात त्यांनी एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रीय केली.

चैत्र शुद्ध नवमीला रामावतार धारण करून रावणाचा नाश केला.

श्रावण वद्य अष्टमीला असुरांचा नाश करून भूभार हलका करण्यासाठी कृष्णावतार झाला.

अश्विन शुद्ध दशमीला सायंकाळी बौद्धावतार झाला.

श्रावण शुद्ध षष्ठीच्या दिवशी पुढे कल्की अवतार होणार आहे.

अशा तऱ्हने दुर्वासांच्या शापाप्रमाणे दशावतार झाले.

○○○



## अध्याय ४

नामधारकाने दोन प्रश्न केले होते. गुरु हे देवापेक्षाही श्रेष्ठ आहेत का? त्यांचे महत्व का? त्याबद्दल वेदधर्मा ऋषींच्या कथेत ब्रह्मदेव व कलीचा संवाद सांगितला. आता हा त्रयात्मा आहे. त्रिरुप आहे. ह्याने मनुष्यरुप का धारण केले? हा प्रश्न आहे. स्वत: परब्रह्म असताना तो मानवरुप कां झाला? हा नामधारकांचा प्रश्न ऐकून सिद्धांना फार आनंद झाला.

सिद्ध नाम धारकाला म्हणाले, ''भवसमुद्रातून तूं लवकरच तरुन जाशील. म्हणून सद्‌गुरुंच्या कथा मी सांगतो. हे गुरुचरित्र भीमा-अमरजा संगमावरील अश्वत्थ वृक्षाखाली बसून सांगितलेले आहे. हे गुरुचरित्र कसे आहे? तीन प्रकारचे लोक आहेत जे संसारी विषयासक्त, मुमुक्षु आणि मुक्त. हे गुरुचरित्र सर्वांनाही उपयोगी पडणारे आहे. हे गुरुचरित्र पठण केले म्हणजे जी इच्छा असेल ती पूर्ण होते. म्हणजे विषयी लोकांनाही उपयोगी आहे. मुक्तांना आनंद देणारे चरित्र आहे. म्हणून त्यांचे जीवनाधारभूत आहे किंवा जीवनाचे साफल्य करणारे आहे. गुरु आणि ईश्वर हे तिन्ही या गुरुचरित्रात आहेत. त्यांचे सेवन ज्ञानी माणसानेसुद्धा केले पाहिजे. ज्ञान प्राप्त होण्यापूर्वी ज्ञान मिळण्याकरता करायचे. ज्यांच्यामुळे आपण ज्ञानी झालो त्यांची सेवा सोडायची नाही. कृतघ्न होऊ नये म्हणून नंतरही सेवन करायचे. अशा रीतीने ज्ञानी माणसाचेसुद्धा जीवनसाफल्य करणारे आहे. असे हे चरित्र वाणी आणि मन यांच्या पलीकडे आहे. सांगणे कठीण आहे. यथामती थोडेसे मी ते सांगणार आहे.'' असा उपक्रम करुन सुरवात केली.

सात ऋषींपैकी अत्रीऋषी मोठे बुद्धीमान. ऋग्वेदाच्या ५ व्या मंडलाचे द्रष्टे आहेत. सर्व तपोधन ज्यांना म्हणतात अश अत्रींच्या स्त्रीला पातिव्रत्य हेच भूषण आहे. दुसरे अलंकार तिच्याजवळ नाहीत. पातिव्रत्य हेच अलंकार आहेत. ती त्रैलोक्यामध्ये प्रसिद्ध झालेली आहे. ती अनसूया चालू लागली म्हणजे भूमी सुद्धा मृदु होत असे. सूर्य,अग्नी हे शीतल होत. वारादेखील मंद वाहात असे. म्हणजे या देवांनासुद्धा भीती कां वाटली? याचे त्यांनी थोडे वर्णन केलेले आहे. धर्माकडे तिचे लक्ष आहे. धर्माचा

अंगिकार करून धर्माने ती वागणारी असल्यामुळे हे देव तिलाही भ्यायला लागले. म्हणजे धर्मशील जो आहे त्याची भीती देवांना वाटते मग मनुष्यांना वाटली तर नवल काय ? हिने जर कोणाला सांगितले जा, ''इंद्राची जागा घे.'' तर इंद्राला आपली जागा खाली करावी लागेल. म्हणून सगळे देव भ्यायला लागले आणि विष्णुंना शरण गेले.

एकदा नारदांनी ब्रह्मा, विष्णु, महेशांना अनसूया कशी धर्मशील आहे ते सांगितले. ती साध्वी अतिथींबद्दल अत्यंत आदरभाव बाळगणारी आहे. ब्रह्मा, विष्णु, महेशांच्या ज्या स्त्रिया होत्या त्यांच्याही कानावर ही गोष्ट गेली. त्यांना ते सहन झाले नाही. त्यांच्या मनांत अनसूयेबद्दल अत्यंत मत्सर उत्पन्न झाला. मूर्च्छित पडल्या त्या. आपणच पतिव्रता आहोत असं त्या समजत होत्या. सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती ह्या तिघींना अत्यंत दु:ख झालेले पाहून त्या देवांनी त्यांचे समाधान केले आणि ''आम्ही जाऊन तिचे सत्व हरण करून येतो,'' असे सांगितले. जर ती अतिथी धर्माचे पालन करू शकली नाही तर तिला शाप देऊन यायचे त्यांनी ठरवले. काय आता! अनसूयेने यांचे काय बिघडवले होते ? धर्माचरण करणारी बिचारी साध्वी स्त्री. आले ते तिघे देव अत्री ऋषींच्या आश्रमात. अनसूयेने त्यांचे स्वागत केले. बसायला आसन दिले. त्यांचे पाय धुतले. वारा घातला. वास्तविक कुटुंब प्रमुख जो असेल त्याने अतिथींचे स्वागत करायचे. पण इथे अनसूयाच विचारते आहे. ती म्हणाली, ''अत्री ऋषी तपश्चर्येला गेले आहेत.''

ते देव म्हणाले, ''आम्ही ऋषींची किती वेळ वाट पहायची ? ते केव्हां तप संपवून परत येतात कोणाला ठाऊक! ध्यानाला बसलेले आहेत. ते कांही आमच्यासारख्या जीवांचे ध्यान नाही, एक मिनीट झाले की संपले. जर कुठे दार वाजले लगेच आमचे लक्ष तिकडे जाणार. तसं नाही. तुकाराम महाराज ७-७ दिवस भजन करीत बसायचे. अन्न पाणी कांही नाही.'' त्रैमूर्ती म्हणाले, ''आम्हाला फार भूक लागली आहे. लवकर आम्हाला जेवायला वाढा.'' तिने आंत जाऊन पाने वाढली. आता ही सत्व परीक्षाच पहायची आहे. राग येतो का ? ''आम्हाला नग्न होऊन तूं भिक्षा द्यावीस अशी आमची इच्छा आहे. हे तुम्हाला पसंत नसेल तर आम्ही दुसरीकडे जातो.''

हे ऐकून ती हंसली म्हणे, ''हे बालक म्हणजे अज्ञानी आहेत. अशी मागणी



बालकांप्रमाणे आहे. पण माझ्यावर कांही परिणाम होणार नाही. तपस्वी ऋषींच्या संगतीमुळे मी पवित्र आहे. काम मला कांही करू शकणार नाही.'' म्हणजे इतका कामादी शत्रुंचा जय आहे, इंद्रिय जय आहे. ''आणि या वेळी जर मी माघार घेतली, ह्यांचे ऐकले नाही तर शाप देऊन निघून जातील.'' म्हणजे धर्माधर्माचर विचार किती कठीण आहे! पतिव्रता स्त्रीने असे वागायचे का ? नाही, असे मी करु शकत नाही. पण तिने सांगितले, ''अतिथी हा मुख्य धर्म आहे. माझ्या मनावर कांही परिणाम होणार नाही. या वेळी स्वत:चा निर्णय स्वत:च घेतला पाहिजे. आत्ता धर्मशास्त्र कोणाला विचारायला जाणार ? ह्या त्रैमूर्तींना शाप द्यायला अवसर द्यायचा नाही.''

तिने वस्त्र काढून टाकले. जगाची उत्पत्ती, संरक्षण, संहार करणारे हे तिघेही बालक झाले. तिला आश्चर्य वाटले. पुन्हा वस्त्र परिधान केले. आणि एकदम तिच्या स्तनातून प्रसूती झाल्यानंतर वाहाते तसे दूध वाहायला लागले. मग तिने त्या बालकांना स्तनपान दिले. आनंद झालेला आहे. ते बालकही दुग्धपान करु लागले. परीक्षा घेण्याकरता आले पण त्यांनांच बाल व्हावे लागले. ब्रह्मदेव दमले होते म्हणे. जगाची उत्पत्ती करणे किती कठीण काम आहे ना! त्या त्या जीवांची कर्म पाहून त्या प्रमाणे त्या त्या शरीरामध्ये जन्म द्यायचा. सगळं आणखी व्यवस्थित काम चाललेले आहे. दमल्यामुळेच की काय पण त्या पतिव्रतेचे दुग्धपान करून अत्यंत शांती ब्रह्मदेवांना मिळाली. विश्वाचे रक्षण करण्याची क्रिया किती कठीण आहे. अतिशय दमल्यावर पतिव्रतेचे पवित्र दूध पिऊन त्यांना चांगली विश्रांती मिळाली. विश्व संहार कर्मामुळे दमलेले हर हे सतीचे दुध प्राशन करुन तृप्त झाले.

बरं हे इतकं झालं. अनसूयेची काय एकंदर स्थिती ? हे बालक कोण आहेत हे तिने ओळखले. स्वधर्माचरणाने त्यांचे बल तिला समजले. त्यांना दूध पाजून पाळण्यात निजवले आणि गायनातून त्यांचे चरित्र वर्णन करू लागली. इतक्यात वनांतून अत्री महर्षी आले. म्हणजे अरण्यामध्ये ही एकटीच राहात असली पाहिजे. आसपास आणखी आश्रम असतील नाही असे नाही. अत्री महर्षींनी अनसूयेचे गायन ऐकले. पत्नीच्या मुखातून झालेला सर्व प्रसंग ऐकला. आणि स्वत:च्याही ध्यान प्रभावाने हे तिघे खरे कोण आहेत हे जाणून त्यांची स्तुती केली आहे.

अत्री ऋषी स्तुती करताना ती तीन बालके पाळण्यामध्ये आहेतच पण आपली मूळची रुपं धारण करुन ब्रह्मा, विष्णू, महेशांनी त्यांना दर्शन दिले. ''वर मागा'', म्हणाले त्यांनी अनसूयेला मोठेपणा दिला. ''काय तुझे भाग्य ! मनालासुद्धा न समजणारे ब्रह्मा, विष्णू, महेश तुझ्या भक्तीने आले. तुला काय पाहिजे तो वर मागून घे'' असे अत्री महर्षींनी सांगितल्यावर तिने त्यांनाच पुढे केले आहे. स्वत: वर नाही मागितला. ही तीनही रुपे एकाच परमात्म्याची आहेत याची तिलाही जाणीव आहे हं ! भेददृष्टी तिची नाहीये. ती अत्री महर्षींना म्हणाली, ''आपणच मोठे तपस्वी आहात. सृष्टीकार्य करण्याकरता एकच परमात्मा तीन रुप झाला ब्रह्मदेवांनी आपल्याला उत्पन्न केलेले आहे. तेव्हां पुत्ररुपाने आपण तिघे आमच्याजवळ राहा अशी त्यांना प्रार्थना करा.'' पतिव्रतेचे मागणे योग्य आहे असे समजून त्यांनी तशीच प्रार्थना केली, ''आपण आमचे पुत्र व्हा.''

मग विष्णू म्हणाले, ''मी माझच दान तुला केलेलं आहे.'' म्हणून ''दत्त'' हे नांव पडले. आपणच आपले दान ज्याने केले तो दत्त. त्या पतिव्रतेचा प्रभाव आहे. हे तिघेही बालरुपाने त्या पाळण्यामध्ये आहेत. आणि आपली आपली रुपं धारण करुन आपापल्या स्थानाला गेले. मग अत्रिमुनींनी त्यांची नांवे ठेवली. 'मी संपूर्ण माझे दान तुम्हाला केलेलं आहे.' असे म्हणाले ते. म्हणून दत्त हेच त्यांचे नांव ठेवले. चंद्र म्हणजे आनंद देणारा. ब्रह्मदेवांचे चंद्र हे नांव ठेवले. शंकरांचा अंश अगदी उग्र म्हणून त्यांचे दुर्वास हे नांव ठेवले. दुर्वासऋषी संचाराला निघून गेले. विष्णुरुपी दत्त मात्र आपल्या मातापित्यांजवळ राहिले. ते मुमुक्षुंना निवृत्ती मार्ग दाखवतात. सकाम भक्तांच्या मनोकामना पूर्ण करतात. आणि स्मर्तृगामी आहेत. हेच जगदोद्धाराचे कार्य चालू ठेवण्यासाठी दत्तात्रेयांनी पुढे श्रीपादश्रील्लभ आणि नरसिंहसरस्वती हे दोन अवतार धारण केले.

○○○



## अध्याय ५

आंध्र प्रांतातील पीठापुरात राहाणारे आपळराज व त्यांची पत्नी सुमती हे दोघेही दत्तात्रेयांचे भक्त होते. त्यांच्या भक्तीमुळे प्रसन्न होऊन ज्या दिवशी आपळराजांकडे श्राद्ध होते त्या दिवशी दत्तात्रेय अतिथीरुपाने त्यांच्या घरी आले आणि त्यांनी भिक्षा मागितली. सुमतीनेही ''अतिथी देवो भव'' या भावनेने त्यांना भिक्षा घातली. दत्तात्रेयांनी संतुष्ट होऊन सुमतीला वर मागण्यास सांगितले असता तिने त्यांच्यासारखा तिला मुलगा व्हावा अशी प्रार्थना केली. दत्तात्रेयांनी ''तथास्तु'' म्हटले. त्यांनी विचार केला, माझ्यासारखा दुसरा कोणी नसल्याने मलाच जन्म घेऊन यायला पाहिजे. तिला त्यांनी सांगितले, ''तुला मुलगा होईल तो महापुरुष असेल. तो जे म्हणेल त्याला अनुमती दे. त्याच्या इच्छेविरुद्ध वागू नकोस.''

असा वर देऊन दत्तात्रेय निघून गेले. पुढे तिला मुलगा झाला. ज्योतिष्यांनी त्याचे जातक पाहून तिला सांगितले, ''तुम्हाला पुण्याचा कल्पवृक्ष मिळाला आहे. ही सामान्य जीवाची लक्षणे नाहीत. तुमच्या भक्तीमुळे दत्तात्रेयांनी हा अवतार घेतला आहे.'' श्रीकृष्णांच्या चरणाप्रमाणे चक्र, ध्वज वगैरे लक्षणे या बालकाच्या पायावर पाहून याचे ''श्रीपाद'' असे नांव ठेवण्यात आले. पुढे आठव्या वर्षी श्रीपादांचे उपनयन झाल्यावर त्यांनी वेदाभ्यास करायला सुरवात केली. पंधरा सोळा वर्षांचे झाल्यावर त्यांच्या वडीलांनी त्यांच्या विवाहाचा विचार मांडला. श्रीपादांनी सांगितले, ''माझा योगश्रीबरोबर विवाह होणार आहे. सर्व स्त्रिया मला मातेसमान आहेत.'' हा त्यांचा निश्चय ऐकून मातापिता खिन्न झाले. तेव्हां श्रीपादांनी त्याना त्रिमूर्ती स्वरुपात दर्शन दिले. आईला तिने दत्तात्रेयांना दिलेल्या वचनाची आठवण करुन दिली. श्रीपादांचा एक भाऊ अंध तर दुसरा पंगू होता. श्रीपादांनी त्यांच्यावर कृपाकटाश्र टाकताच मुका बोलू लागला व पंगू चालू लागला. श्रीपादांची अतर्क्य लीला आहे. श्रीपादांनी त्या दोघांना आशीर्वाद दिला आणि ते संचाराला बाहेर पडले.

प्रथम ते काशीला गेले. तिथून बद्रिकाश्रम पाहून गोकर्णाला आले. शुद्ध कीर्तीचे दत्तात्रेय कलीयुगात भक्तांचे इच्छित मनोरथ पूर्ण करण्यासाठी श्रीपादरुपाने राहिले आहेत.

○○○

## अध्याय ६

आता या अध्यायात गणेशांनी शिवलिंगाची प्रतिष्ठापना कां केली ? आणि या गोकर्ण क्षेत्रात सगळी सज्जन मंडळी कां राहातात ? असे नामधारकांनी सिद्धांना विचारले.

सिद्धांनी सांगितले, ''गणेशांनी विष्णुंच्या आज्ञेने रावणाकडून ते लिंग घेऊन त्याची प्रतिष्ठापना केली. त्यामुळे देव आणि सज्जन इथे येऊन राहिले. रावणाची माता कैलास प्राप्ती व्हावी म्हणून मृत्तिकेचे लिंग रोज तयार करुन त्याची पूजा करीत होती, हे रावणाने पाहिले. तो मातेला म्हणाला, ''हे असे रोज मृत्तिका लिंग पूजेकरता करु नकोस. मी त्या ईश्वरालाच कैलास पर्वतासह इथे आणतो.'' त्याप्रमाणें तो कैलास पर्वताजवळ येऊन कैलास पर्वत उचलून घेण्याचा प्रयत्न करु लागला. मग पार्वतीमातेने शंकरांची स्तुती करुन रावणाला आवरायची प्रार्थना केली. मग शंकरानी रावणाला कैलासाखालीच चेपण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा मरणोन्मुख होऊन शंकरांचे ध्यान व प्रार्थना रावणाने केली. मग शंकरांनी त्याला मुक्त केले. शंकर प्रसन्न व्हावेत म्हणून त्याने गायन केलेले आहे. रावणाने सुस्वरात रागरागिणी, तालवाद्यासह गायन केले ते ऐकून शंकर प्रसन्न झाले. ते म्हणाले, ''फार चांगले गायन केलेस तूं. तुला काय हवा तो वर मागून घे.'' रावणाने प्रथम आपले सगळे मागणे शंकरांच्या पुढे मांडले मग आईची इच्छा सांगितली. तो म्हणाला, ''मला दुसऱ्या कोणाजवळही नसेल अशी सुवर्णाची नगरी पाहिजे. लक्ष्मी माझी दासी असावी आणि ब्रह्मदेवांनी माझे विधीलिखीत चांगलेच लिहिले पाहिजे. प्रत्यक्ष मृत्यु हा माझा दास असावा. मला कांहीही दुर्लभ राहू नये.'' आणि मग आईचे मागणे मागितले, ''आपल्यासह कैलास पर्वत घेऊन यायला मातेची आज्ञा आहे. हे सगळे वर मला द्या.''

भगवान शंकरांचा भोळेपणा किती आहे ! ते म्हणाले, ''कैलास पर्वत घेऊन काय करतोस. माझे प्राणलिंग त्याच्यापेक्षा महत्वाचे आहे. ते मी तुला देतो ते घे. म्हणजे माझ्यासारखा तूं ईश्वर-रुप होशील.'' रावण ईश्वर झाला म्हणजे जगाचे काय झाले असते याची कल्पनाच केलेली बरी. रावणाची नगरी कैलासाप्रमाणें झाल्यावर सगळे दैत्य अजिंक्य झाले असते. भगवान शंकर म्हणाले, ''ज्या ठिकाणी तूं हे



प्राणलिंग ठेवशील तिथेच ते स्थिर होईल. तेंव्हा तूं हे आपल्या नगरात जाऊनच खाली ठेव.'' हेही त्याला मुद्दाम बजावले. आणि ''हे प्राणलिंग हातात घेऊन कोणचेही कर्म करायचे नाही. ''रावणाच्या भक्तीने शंकरांचे मन आकृष्ट होऊन त्यांनी ते प्राणलिंग त्याला दिले. रावण आनंदाने लंका नगरीला यायला निघाला. हे सर्व आपल्या योग सामर्थ्याने नारदांनी जाणले आणि ब्रह्मलोकात जाऊन सर्व वृत्तांत ब्रह्मदेवांना सांगितला. ब्रह्मदेव म्हणाले, ''मी यात कांहीच करु शकत नाही.'' आणि ते नारदांसह भगवान विष्णुंकडे गेले. विष्णू म्हणाले, ''आपण शंकरांकडे जाऊ'' आणि सर्वजण भगवान शंकरांकडे आले. म्हणाले, ''आपण कोणालाही कोणताही वर कसा देता ? हे असं कसं केलंत ? 'माझ्यासारखा तूं होशील' असा जर आपण त्याला वर दिलात तर तो आपल्याला तरी जागेवर ठेवील का ? रावणाने सगळे देव बांधून ठेवलेत. लोकांना त्रास देणारा, वाटेल त्याला खाणारा म्हणून तो प्रसिद्ध आहे.''

भगवान शंकर म्हणाले, ''त्याने गायन केल्यामुळे माझे मन त्याच्याकडे आकर्षित झाले. म्हणून त्याला मी आत्मलिंग दिले. तो अजून लंकेला पोहोचलेला नाही. काय करायचे ते करा. त्याच्याशी सामोपचाराने वागून उपयोग नाही.'' मग विष्णुंनी कपटाने ते लिंग मिळवण्यासाठी नारदांना बोलावून गणेशांची मदत घेऊन रावणाला प्रतिबंध करण्यास सांगितले. झालं. नारद निघाले. त्यांनी रावणाला वाटेतच गांठले. त्यांनी रावणाला विचारले, ''इतक्या गडबडीने, वेगाने कुठे निघालास ? कुठून येतोयस ?'' रावण म्हणाला, ''शंकरांना संतुष्ट करुन त्यांचे आत्मलिंग मी मिळवलंय, ते घेऊन मी लंका नगरीला निघालोय.'' नारद म्हणाले, ''रावणा, ह्या आत्मलिंगाचा एक इतिहास ऐक. रेड्यालासुद्धा खाणारा एक मोठा मृग, ब्रह्मा, विष्णू, महेशांनी मारला. त्याच्या शिंगात तीन लिंगे होती ती तिघांनी काढून घेतली. त्या लिंगांना त्यांनी आत्मस्वरुपच मानले. त्या पैकी ईश्वराचे लिंग तुला मिळाले. त्यामुळे भगवान शंकरांचे सायुज्य तुला मिळेल.''

रावण म्हणाला, ''मला हे कांही ऐकायला सवड नाही. मला लंकेला लवकर जायचे आहे.'' नारद त्याला म्हणाले, ''संध्या वंदनाची वेळ झालीये तर संध्या सोडून कुठे जातोस तूं ?'' हे ऐकून रावण थांबला. म्हणजे रावणसुद्धा संध्या बिंध्या करत होता, राक्षस राजा जरी असला तरी.

इतक्यात ब्रह्मचाऱ्याच्या वेषात गणेश तिथे आले. रावणाने त्यांच्या हाताला धरुन विचारले, ''काय रे तूं कोणाचा मुलगा आहेस?'' त्याने सांगितले, ''उमा शंकर माझे माता पिता आहेत. त्यांच्याशी तुझे कांही देणे घेणे आहे का? मला तूं कां धरलेस? मला तुझी भीती वाटते.'' रावण म्हणाला, ''हे लिंग थोडा वेळ हातात धरतोस का? मला तुझ्याबद्दल प्रेम वाटतंय. माझी लंका नगरी सुवर्णाची आहे तिथे येऊन राहा.'' गणेश म्हणाले, ''हे लिंग लहान मुलांना कुठे धरता येते का? आणि मला तुझ्या लंकेला यायचेही नाही. भयंकर राक्षस तिथे राहातात.'' तरीसुद्धा कांही तरी गोड बोलून रावण गणेशांना म्हणाला, ''घे बाबा, हे शिवलिंग घेऊन थोडा उभा राहा.'' गणेशांच्या हातात ते शिवलिंग देऊन रावण समुद्र किनाऱ्यावर संध्या करण्यासाठी गेला. गणेश त्याला म्हणाले, ''मला हे जड झाल्यावर मी तीन वेळा तुला बोलावीन आणि जर तूं आला नाहीस तर मी हे जमिनीवर ठेवीन.''

गणेश थोडा वेळ विश्रांती घेऊन थांबले. वर आकाशात सर्व देव आता त्या शिवलिंगाची स्थापना कशी होते हे पहायला आले. गणेशांनी तीन वेळा रावणाला हांक मारली आणि तो संध्या करत असताना न आल्यामुळे त्यांनी विष्णुंचे स्मरण करुन जमिनीवर शिवलिंग स्थापन केले. म्हणजे मिळालेले शिवलिंग शेवटी त्याच्या नगरापर्यंत गेले नाही. नंतर रावणाने येऊन गणेशांना मारले आपल्या दहा हातांनी ते वर काढायचा प्रयत्न केला तेव्हां भूकंपाप्रमाणे ती भूमी कंपायमान झाली पण ते शिवलिंग मात्र अचल राहिले. पुढे ते महाबलेश्वर या नांवाने प्रसिद्ध झाले. रावणाने ते वर खेचताना त्याला गोकर्णासारखा आकार आला म्हणून गोकर्ण महाबलेश्वर असे नांव पडले. भूमीवरील ह्या कैलासच आहे कारण भगवान शंकर आपल्या सर्व परिवारासह इथे सदैव निवास करतात. म्हणून त्या स्थानामध्ये देव, ऋषी, सज्जन वगैरे सगळे येऊन राहिले आहेत. हे सिद्धांनी श्रीपादांना इथे यायचे कारण सांगितले. देव, ऋषी, गंधर्व, मनुष्य, असुर, राक्षस, पशु वगैरे सर्वांनी या ठिकाणी भगवान शंकरांकडून अभिष्ट वर प्राप्ती करुन घेतली म्हणून याच्यासारखे दुसरे पावन स्थळ नाही.

000



## अध्याय ७

आता दुसरी कथा सांगतात. मित्रसह नांवाच्या एका राजाला, त्याच्या हातून अज्ञानाने एक पाप घडल्यामुळे, वसिष्ठांनी शाप दिला आणि तो राक्षस झाला. आता महापापी लोकांनीसुद्धा श्रद्धा, भक्तीपूर्वक ईश्वराची सेवा जर केली तर त्याला सद्‌गती कशी मिळते हे सांगणारी कथा पाहू. तो मित्रसह राजा बारा वर्षे राक्षस होता. एकदा एका राक्षसाला त्याने मारले. त्या राक्षसाच्या भावाने माणसाचे रुप घेतले आणि मित्रसह राजाच्या दरबारात सेवक म्हणून राहिला. एकदा वसिष्ठ ऋषी मित्रसह राजाकडे आले. राजाने त्यांचे आदरातिथ्य केले आणि तो दुसऱ्या कामाला लागला. इकडे त्या राक्षसाच्या भावाने वसिष्ठ ऋषींचे रुप घेतले आणि राजाला जाऊन सांगितले, ''मला मृग मांस शिजवून दे'' राजाने त्याच्या स्वयंपाक करणाऱ्याला तशी आज्ञा केली. पण ह्या राक्षसाने कपटाने मृग मांसाच्या ऐवजी नरमांस आणून दिल्यामुळे वसिष्ठ ऋषींना राग आला आणि त्यांनी मित्रसह राजाला शाप दिला. राजा म्हणाला, ''तुम्ही जे जे द्यायला सांगितलेत तेच मी दिले ना. मी सुद्धा तुम्हाला शाप देतो.'' पण त्याची पत्नी म्हणाली, ''गुरुंना शाप देऊ नका.'' मग वसिष्ठांनी ध्यानाने राजाने राक्षसाचे कपट जाणले आणि राजाला सांगितले की बारा वर्ष राक्षस योनीत राहिल्यावर पुन्हा तूं राजा होशील. वास्तविक पहाता हेच जर वसिष्ठांनी आरंभालाच ध्यानाने जाणून घेतले असते तर! पण नाही. राजाचे प्रारब्धच तसे होते. पण त्यांनी नंतर उःशाप दिला. जेव्हां प्रत्यक्ष मांस जेवताना वाढले त्यावेळेलासुद्धा ध्यान केले असते तर सत्य परिस्थिती काय आहे हे समजले असते. पण हे पुढचे सगळे व्हायचे होते. त्याशिवाय गोकर्णाचा महिमा कसा वाढला असता.

त्या शापाने राजाचे पाय काळे झाले आणि त्याला कल्मषपाद असे नांव पडले म्हणतात. बुद्धी सगळी राक्षसी झाली. अरण्यात गेला. एक विद्वान ब्राह्मण आपल्या स्त्रीसह प्रवासाला निघाला होता त्याला ह्या कल्मषपादाने मारले मांस खाण्याकरता. त्याच्या स्त्रीने राजाला शाप दिला, ''बारा वर्षानंतर जरी तूं राजा झालास तरी माझ्या शापामुळे स्त्रीसंग केल्यावर तुझा नाश होईल.'' त्याप्रमाणे बारा वर्षे राक्षस योनीत

काढल्यावर पूर्वीसारखा तो राजा झाला. आपल्या राणीला त्याने त्या साध्वीने दिलेला शाप सांगितला. मग तो राजा राणी शापाचा परिहार व्हावा म्हणून तीर्थयात्रेला निघाले असता गौतम ऋषींची भेट झाली. राजाने त्यांना शापाचा सर्व वृत्तांत सांगितला. गौतम ऋषी म्हणाले, ''कांही घाबरू नकोस. गोकर्ण हे महापाप दूर करणारे आणि अर्थार्थी भक्ताला कल्पवृक्षासारखे क्षेत्र आहे. ब्रह्महत्येचे काय घेऊन बसलास. गोकर्ण क्षेत्रातील प्रत्येक जल हे तीर्थ आहे. सगळ्या शिला या शिवलिंग आहेत अशा या दिव्य तीर्थक्षेत्रात दुर्लभ कांहीच नाही.''

नुसती गोकर्ण क्षेत्राची स्तुती करण्याकरता ही गोष्ट सांगतो असे नाही. एक चांडाळीला उत्तम गती कशी प्राप्त् झाली ह्याचे प्रत्यक्ष उदाहरण तिथे घडले आहे. नामधारकाने विचारले, ''ती चांडाली नुसती गोकर्ण क्षेत्रात गेली आणि तिला मोक्ष मिळाला ? ज्ञान झाल्याशिवाय मोक्ष कसा होतो ? अधिकाराशिवाय ज्ञान मिळत नाही. ती चांडाळी तर अनधिकारी आहे.'' सिद्ध म्हणाले, ''ती चांडाळी जरी अनधिकारी असली तरी गोकर्ण क्षेत्राचा प्रभावच असा आहे की तिला तो अधिकार मिळाला, ह्या जन्मात नाही तरी पुढच्या जन्मात मोक्ष मिळतो.'' त्या शिवदूतांनी तिची कथा सांगितली ती ऐका. दैवयोगाने ती बाल्यावस्थेतच विधवा झाली. ती स्वत: सुंदर होती, काम व्याप्त होऊन एका वैश्याच्या घरी जाऊन राहिली. असे तिने जारकर्म केले. तिच्या आप्तेष्टांनी तिचा त्याग केला व स्वत: प्रायश्चित घेतले. विषय वासनेने बुद्धीभ्रष्ट होऊन सुरापान करीत ती राहिली. दारुच्या नशेत उन्मत्त होऊन एकदा तिने गायीचे वासरुच मेंढी समजून मारले आणि त्याचे मस्तक दुसऱ्या दिवशी खाण्याकरता घरात ठेवून दिले. बाकीचे मांस लगेच खाऊन टाकले. दुसऱ्या दिवशी नशा उतरल्यावर आपण गायीचे वासरुच मारल्याचे तिच्या लक्षात आल्यावर ती घाबरली आणि तिने ते वत्साचे मस्तक कोणाला समजू नये म्हणून जमिनीत पुरुन टाकले. वाघाने वासरु नेले असे सर्वांना सांगितले. ''शिव, शिव'' म्हणून शोक केला. अशी असंख्य पापे करून ती दुर्गतीला गेली आणि तिला हा चांडाळीचा जन्म आला. जन्मापासूनच तिला गलत्कुष्ठ होते. धर्मत्याग केल्यामुळे हे तिला गलत्कुष्ठ झाले. गायीच्या वासराची हत्या करुन ते खाल्यामुळे तिला अंधत्व प्राप्त झाले. पुढे तिचे मातापिता मरुन गेल्यामुळे ती अनाथ



झाली. योगायोगाने इतर यात्रेकरुंबरोबर माघ महिन्यात ती गोकर्ण क्षेत्रात आली. नेमकी त्या दिवशी शिवरात्र होती. त्यामुळे ही चांडाळी भुकेने व्याकुळ होऊन जरी अन्न मागू लागली तरी सर्वांचा त्या दिवशी उपवास असल्याने तिला कोणी भिक्षा घातली नाही. गोकर्णातील सर्व शिळा लिंगमयच आहेत. हिला कोणी तरी बिल्वपत्र भिक्षा म्हणून दिले. ते वास घेऊन खायचा पदार्थ नाही हे समजून तिने फेकून दिले ते नेमके एका शिवलिंगावर पडले. अप्रत्यक्षरीत्या ही तिची शंकरांची पूजा झाली. इतर लोकांनी केलेले कीर्तन, भजन अनायासे तिच्या कानावर पडले. दु:खामुळे जागरण घडले. अशा रीतीने शिवरात्रीच्या दिवशी गोकर्ण क्षेत्रात पूजा, उपोषण, जागरण, कीर्तन वगैरे सगळे घडले. अशी ती पवित्र झाल्यामुळे शंकरांच्या आज्ञेने तिला न्यायला आलो असे शिवदूतांनी सांगितले. तिच्या मृत शरीरावर अमृत सिंचन त्यांनी करताच तिचे शरीर दिव्य झाले आणि ते शिवदूत तिला घेऊन कैलास पर्वतावर गेले.

हे सगळे त्या सांगितल्यावर त्या प्रमाणे तो राजा गोकर्ण क्षेत्रात जाऊन दोषमुक्त झाला. अशा ह्या उत्तम गोकर्ण क्षेत्रात श्रीपाद साधुंना मार्गदर्शन करण्यासाठी तिथे जाऊन राहिले.

तीन वर्ष गोकर्ण क्षेत्रात श्रीपादवल्लभ राहिले. अधिकारी जीवांचा उद्धार केला आणि नंतर कृष्णातीरावरील कुरवपूर या स्थानात श्रीपादवल्लभ आले आणि इथे कांही लीला करून अदृष्य झाले.

○ ○ ○

# अध्याय ८

श्रीपादांनी गोकर्ण क्षेत्रात राहून सज्जनांना संसारापासून मुक्त केले. उत्तम अधिकाऱ्याला ज्ञानानेच मुक्ती. पण मंद अधिकाऱ्यांचा मात्र ज्ञानाचे अंतरंग जो भक्तीयोग आहे त्याच्या योगाने उद्धार केला. हे या अध्यायात दाखवणार आहेत. श्रीपादश्रीवल्लभांना साधुंचा उद्धार करायचा आहे.

आता सिद्ध सांगताहेत. भगवान वस्तुत: अतींद्रिय आहेत. म्हणजे इंद्रियांनी त्यांचे ज्ञान होण्यासारखे नाही. पण भक्तांच्यासाठी भक्ती प्रभावाने दृष्य झाले. पुन्हा आता दुसरा अवतार घ्यायचा प्रसंग आल्याने हे रुप त्यांनी गुप्त केले.

कुरवपुरामध्ये एक वैदिक ब्राह्मण, त्याच्या अंबिका नांवाच्या स्त्रीसह राहात होता. दैवयोगाने त्याचा मुलगा मंद-बुद्धी होता. ब्राह्मण वर्णाला अनुसरून त्याचे उपनयन केले. पण गायत्री मंत्राचा उच्चारसुद्धा त्याला करता येईना. तो ब्राह्मण जेव्हां त्या मुलाला मारायचा तेव्हां त्या पत्नीने समजावले, ''हा जन्मापासूनच दगडाप्रमाणे जडवत आहे. मग ह्याला कशाला व्यर्थ मारता ? मारू नका'' कांही काळाने त्या ब्राह्मणाला मृत्यु आला. मग आपल्या मंदबुद्धी मुलाला घेऊन भिक्षा मागून ती अंबिका आपले जीवन कंठू लागली. कांही काळाने गांवातले सगळे ब्राह्मण त्याची निंदा करु लागले. ते म्हणाले, ''पंडितांनी ज्याची पूजा करावी अशा पित्याचा तूं मुलगा आहेस. तुझी ही भिक्षा मागण्याची वृत्ती आम्हाला आवडत नाही. तेव्हां एक तर ह्या गांवातून निघून जा किंवा प्राण तरी दे'' हे ऐकून अतिशय खिन्न होऊन आत्महत्या करण्यासाठी तो कृष्णा नदीवर गेला. ती माताही त्याच्याबरोबर गेली.

तिथे एका शिळेवर श्रीपाद बसले होते. श्रीपादांनी त्या दोघांना आत्महत्या करण्यापासून परावृत्त केले. श्रीपादांनी त्या दोघांना प्रेमाने समजवाले, ''प्रत्येक जन्मात आपल्या संचितानुसार येणारे दु:ख सहन करणे चांगले. आत्महत्या करणे योग्य नाही. तुला दोन दोष लागतील. एक म्हणजे तुझा देह ब्राह्मणाचा आहे. त्यामुळे ब्रह्महत्या हा एक दोष व आत्महत्या हा दुसरा दोष लागेल. आत्महत्या करणाऱ्या जीवाला अंधार असलेल्या लोकात जाऊन पडावे लागते. तेव्हां प्रारब्ध भोग सहन कर.''



अंबिका म्हणाली, ''आम्हाला आता आत्महत्येशिवाय दुसरा पर्यायच नाहीये. पंडितापासून जन्माला आलेला हा कुपुत्र आहे. त्यामुळे सगळे लोक आमचा धिक्कार करतात. आमच्याकडे लक्ष देत नाहीत. आम्ही जगायचे तरी कसे ?'' श्रीपाद पुन्हा म्हणाले, ''सहन करा. आत्महत्येमुळे तुम्ही नरकात जाल. ह्या आधिदैवीक दु:खातून तुम्ही तरुन जाल आणि पुढच्या जन्मांत तुम्हाला चांगला मुलगा मिळेल शंकरांच्या संतोषाने.''

अंबिका म्हणाली, ''ठीक आहे. आपण सांगाल त्या प्रमाणे वागायला मी तयार आहे. पण शंकर कशामुळे प्रसन्न होतील ? पूर्वी कोणावर शंकर प्रसन्न झाले होते ते सगळे मला सांगा.''

श्रीपादवल्लभ म्हणाले, ''उज्जैनी नगरीमध्ये चंद्रसेन राजाचा मणिभद्र नांवाचा मित्र होता. या मणिभद्राला तो मोठा शिवभक्त असल्यामुळे शंकारांनी चिंतामणी दिला होता. इतर राजे लोकांनी तो चिंतामणी मागून वाटेल ती किंमत देतो सांगितले. तरी कांही त्यांना तो मिळाला नाही. मग सगळे राजे लोक एकत्र आले आणि त्यांनी उज्जैनी नगराला वेढा दिला. तरीही राजा एकाग्र मनाने शिवप्रदोष व्रत करुन पूजा करीत होता. तो मणिभद्र आणि राजा शंकरांची पूजा करताना पाहून गांवातल्या कांही गवळ्यांच्या मुलांनी कांही दगड मांडले व त्यांनाच शिवलिंग समजून मनोभावे त्याची पूजा करु लागले. थोड्या वेळाने गोपी तिथे आल्या आणि आपापल्या मुलांना घरी घेऊन गेल्या. एक बालक मात्र राहिला. त्याचीही आई आली आणि तिने त्या बालकाने शिवलिंग समजून पूजन केलेला दगड फेकून दिला. ते पाहून तो बालक अत्यंत दु:खी झाला. त्याचा तो भक्तीभाव पाहून विश्वसाक्षी भगवान शंकर प्रगट झाले. आपले उत्तम रुप त्याला दाखवून वर मागून घेण्यास सांगितले.

त्याने पाहिले मागणे मागितले, ''आपली पूजा माझ्या मातेने मोडली याबद्दल तिला आपण क्षमा करा.'' भगवान शंकर प्रसन्न होऊन म्हणाले, ''माझे सायुज्य स्वरुप तूं होशील.''

''तुझ्या मातेने अज्ञानाने हे कृत्य केले असल्यामुळे तो कांही अपराध नाहीये. ती सुद्धा पुढे विष्णुमाता होईल. मागाहून मोडली असली तरी अगोदर तूं केलेली पूजा

तिने पाहिली हे मोठे पुण्य तिला घडले. पूजा करण्याचे पुण्य असेल पूजा पहाण्याचेसुद्धा पुण्य आहे.'' असे सांगून ते अंतर्धान पावले आणि एक तेजस्वी लिंगाच्या रुपाने प्रगट झाले. त्या लिंगाचे तेज इतके होते की रात्री सुद्धा सूर्यासारखा प्रकाश पडत होता. आलेल्या राजे लोकांनी हे पाहून विचार केला हा मोठा पुण्यवान राजा आहे त्याच्याबरोबर आम्ही युद्ध करणे योग्य नाही. हा चमत्कार पहाण्यासाठी प्रेमाने ते तिथे आले. ते तेजस्वी शिवलिंग पाहून त्यांना आनंद झाला. त्या बालकाला पाहून, सर्व राजेलोक संतुष्ट होऊन मग आपापल्या नगराला निघून गेले. त्या बालकाची माता यशोदा झाली पुढच्या जन्मात आणि शंकरांच्या कृपेने भगवान श्रीकृष्णांनी तिच्या पोटी जन्म घेतला. तेव्हां तूं जर शिवप्रदोष व्रत करुन शंकरांची आराधना केलीस तर तुलाही असे फळ मिळेल. यशोदेप्रमाणें तुलाही चांगला मुलगा होईल.''

अंबिका म्हणाली, ''हा माझा मुलगा मतिमंद असल्यामुळे सगळे त्याची निंदा करताहेत. इतक्या कष्टामध्ये आयुष्य घालवायचे कसे? म्हणून मातृत्वाने माझे आपण संरक्षण करा. (म्हणजे आपणच माझे पुत्र व्हा)'' असे अगदी निष्कपटाने म्हणाली. तिची ही प्रार्थना ऐकून श्रीपादांनी त्या मूर्ख मुलाच्या मस्तकावर आपला हस्त ठेवला. तत्क्षणी तो बृहस्पतीसारखा बुद्धीमान झाला. श्रुती, शास्त्र वगैरे सर्व ज्ञान त्याला झाले. श्रीपादांनी त्याला आईची सेवा करण्याची आज्ञा केली आणि अंबिकेला म्हणाले, ''हा मुलगा आता विद्वान झालेला आहे तेव्हां ह्याच्या योगाने दु:ख विसरून जाऊन ईश्वराच्या पूजा, भक्तीमध्ये आपले उर्वरित आयुष्य घालव. पुढच्या जन्मामध्ये माझ्यासारखा पुत्र होईल.''

विद्वत्मान्य मुलगा तिला देऊन तिचे प्रारब्धसुद्धा पालटवले आहे, हे सदगुरुंचे सामर्थ्य आहे. आनंदाने मुलाला घेऊन ती अंबिका गांवात जाऊन ईश्वराची पूजा, भक्ती करू लागी. श्रीपादांनी विचार केला, 'आता माझ्यासारखा दुसरा कोण असणार? कोणी नाही. म्हणजे मलाच तुझ्या पोटी जन्म घेतला पाहीजे. मी जर हिचा पुत्र झालो नाही तर मी खोटे बोललो असे होईल. म्हणून आपणच अंबिकेचा पुढच्या जन्मात पुत्र होऊन अवतारकार्य करावे.'

❍ ❍ ❍



## अध्याय ९

श्रीपाद कुरवपुरात राहात असताना एक रजक त्यांची नेहमी अत्यंत मनोभावे सेवा करीत असे. एकदा एक राजा आपल्या लवाजम्यासह जलक्रीडा करण्यासाठी आला असता रजकाला त्याचे ऐश्वर्य पाहून आपल्याला असे ऐश्वर्य मिळावे अशी इच्छा झाली. श्रीपादांनी ती जाणून त्याला विचारले, ''आत्ता तुला राज्य हवे की पुढच्या जन्मात?'' तेव्हां रजक म्हणाला, ''महाराज आता मी वृद्ध झालो मला पुढच्या जन्मात यौवनात राज्याचा उपभोग मिळावा आणि त्या जन्मात मला आपले स्मरण राहावे.'' श्रीपाद म्हणाले, ''पुढच्या जन्मात तूं म्लेंच्छ राजा होशील व शेवटी आपली भेट होईल.''

❍ ❍ ❍

# अध्याय १०

एक ब्राह्मण श्रीपादांच्या चरणावर भक्ती ठेवून व्यापार करीत होता. मला जर व्यापारात अधिक लाभ झाला तर श्रीपादांच्या तुष्टीकरता ब्राह्मण भोजन मी घालीन असा त्याने नवस केला. त्याप्रमाणें श्रीपादांचे स्मरण करीत व्यापाराला गेल्यावर त्याला पुष्कळ धन मिळाले. मग नवस फेडण्यासाठी तो कुरवपुरला यायला निघाला. कांही चोरांना ही बातमी लागली, हा पुष्कळ धन घेऊन एकटाच चालला आहे. त्यांनी सांगितले, ''बरं झालं, तुमची सोबत मिळाली. आम्हालाही यात्रेला कुरवपूरला जायचे आहे आणि त्याच्याबरोबर जाऊन एका निर्जन स्थानामध्ये त्या व्यापाऱ्याला ठार मारले. त्यावेळी अचानक श्रीपादवल्लभ दंड कमंडलू त्रिशूल घेऊन तिथे प्रगट झाले आणि तीक्ष्ण धारेच्या त्रिशूलाने त्या चोराला मारले. एक चोर मात्र त्यातून बचावला. त्याने श्रीपादांना सांगितले, मी कांही चोरीच्या उद्देशाने यांच्या बरोबर आलो नव्हतो. वगैरे, त्याचे हे करुण बोलणे ऐकून श्रीपादांना त्याची दया आली आणि त्यांनी त्या चोराला तिथे व्यापाऱ्याच्या रक्षणासाठी थांबायची आज्ञा केली. श्रीपादांनी त्या व्यापाऱ्याच्या धडावर त्याचे मस्तक ठेवले व त्यावर जलमंत्रित भस्म सिंचन केले. त्याला पुन्हा पूर्वीप्रमाणे जिवंत केले आणि स्वत: गुप्त झाले.

त्यानंतर झोपेतून उठावे तसा तो व्यापारी जागा झाला. बाकीचे चोर मरून पडलेले त्याने पाहिले आणि राहिलेल्या एका चोराच्या मुखातून श्रीपादांनी आपल्याला कसें पुन्हा जिवंत केले हे ऐकल्यावर तो अतिशय खिन्न झाला. त्याला वाटले श्रीपाद आपल्याला वाचवण्यासाठी कष्ट घेऊन इथे आले पण त्या चोराला त्यांचे दर्शन झाले नाही. मग नवस केल्याप्रमाणे त्याने कुरवपूरात येऊन अन्नदान केले. चार हजार लोक जेवले म्हणतात. म्हणजे त्यावेळी कुरवपूरात बरीच वस्ती असावी. आसपासच्या गांवातील लोक येत असतील. त्याला सर्व प्रकारच्या सिद्धी मिळाल्या म्हणजे त्याच्या सर्व मनोकामना पूर्ण झाल्या.

सिद्ध म्हणाले, ''अशा अनेक घटना घडल्या आहेत. सज्जनांना श्रीपादवल्लभ



कुरुवपूरात दर्शन देतात मलीन चित्त असणाऱ्यांना मात्र ते अगोचर आहेत. दुसऱ्या रुपाने दुसरीकडे अवतार घेतला तरी ह्या मूळ रुपाने इथे इष्ट काम ते देतच आहेत.''

महापुरुष ज्या ठिकाणी राहिले असतील त्या स्थानाचे महत्व सांगताहेत. वेद, यज्ञ, तप, दान यांची जी शास्त्राने फल सांगितली आहेत त्यापेक्षा अनेक पटीने फल जर श्रीपाद ज्या ठिकाणी राहिले आहेत त्या स्थानात अध्ययन केले, यज्ञ केला, दान केले, तप केले तर मिळते. म्हणजे थोडा जरी गायत्री जप केला, थोडी जरी उपासना केली तरी त्याचे जास्ती फल आहे. रुद्राचे एक आवर्तन केले तरी अतिरुद्र केल्याचे फळ आहे.

○○○

# अध्याय ११

सिद्ध सांगताहेत, ''उत्तर देशामध्ये अवतार धारण केला. ते चरित्र मी थोडंच सांगणार आहे. कारण साधू जे योगी आहेत त्यांनासुद्धा चिंतन करायला हे चरित्र कठीण आहे. तसे विशिष्ट पुण्य असेल, ईश्वराची कृपा असेल तर पुढचा जन्मसुद्धा मनुष्य जन्म येतो, हे ह्या चरित्रावरून दिसतंय. श्रीपादांच्या उपदेशाप्रमाणे त्या ब्राह्मण स्त्रीने शंकरांची प्रदोष व्रताने पूजा केली. तिला पुढचा जन्म उत्तर देशात एका ब्राह्मण कुळात आला. सारासार विवेक मति बुद्धी नुसती सामान्य बुद्धी नाही. चांगले रुप उत्तम शील म्हणजे स्वभाव आहे. चांगले संस्कार आहेत. अशी गुणान्विता! श्रीपादांनी तिला अंबा असे म्हटले होते त्याच नांवाने प्रसिद्ध झाली. त्याच गांवात राहाणाऱ्या धर्मशील अशा माधव ब्राह्मणाबरोबर शास्त्राप्रमाणे तिचा विवाह झाला. पातिव्रत्याने राहून मनोभावे सर्व प्रकारे पतीची सेवा केली. पतीच्या आज्ञेने पूर्व जन्मीच्या संस्कारांनी भगवान शंकरांची प्रदोषकाली पूजा ती करू लागली. त्या पतीपत्नींचे एकमेकांवर चक्रवाकाप्रमाणे प्रेम होते. पुढे ती गर्भवती होऊन तिला उत्तम डोहाळे लागले. येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना ती तत्त्वज्ञानाचा उपदेश करू लागली. माधवानेही शास्त्रात सांगितलेले पुंसवनादि गर्भधान सर्व संस्कार केले. गृहयसूत्रात हे सर्व संस्कार दिले आहेत. सर्व तऱ्हेने अनुकूल ग्रह असताना, फार उष्ण नाही फार थंड नाही अशावेळी ओंकार पठण करीतच जन्माला आले. भगवांताचे प्रणव हे नांव आहे. स्वत:च्या इच्छेने भगवान अवतीर्ण झाले आहेत. आम्ही जीव कर्म परतंत्र असल्यामुळे जन्माला येतो पण ईश्वराला कर्म परतंत्रता नाही. ज्ञान ऐश्वर्य, शक्ती, बल, वीर्य आणि तेज यांनी भगवान जरी संपन्न असले तरी ते अज, अविनाशी, सर्व भूतांचे ईश्वर आणि नित्यशुद्धबुद्ध मुक्त आहेत. असे असूनही आपली त्रिगुणात्मक मूल प्रकृती वैष्णवी मायेला वश करुन आपल्या लीलेमुळे इतर देहधारी जीवांप्रमाणें जन्म घेताना आणि लोकांचा उद्धार करताना दिसतात. हे सगळं भाष्य आहे हं आचार्यांचे! आचार्यांनी हे भाष्य गीताभाष्याच्या आरंभी दिले आहे. जसेच्या तसे (इथे मोठ्या महाराजांनी लिहिले) आहे. आपल्या मायेने दत्तप्रभुंचा देह देहवान झाल्यासारखा दिसतो आहे. वस्तुत: त्यांना देह असण्याचे



कांही कारण नाही. त्यावेळेला चांगले चांगले शकून झाले. लोकांना आश्चर्य वाटले कारण इतर सामान्य बालक जेव्हां जन्माला येतो तेव्हां कफ वगैरेनी त्याचे शरीर माखलेले असते. त्याला श्वाससुद्धा घेता येत नाही. दत्तप्रभु जन्माला येताच ओंकार म्हणू लागले. या वेळचे सगळे ग्रह सुयोग देणारे पाहून ज्योतिषांना सुद्धा आनंद झाला. त्यांनी माधवाला सांगितले, ''तुझ्या सुकृताचे हे फल आहे. श्री आणि सिद्धी ह्यांच्या दासी आहेत. त्यांचे चरण म्हणजे परीसाप्रमाणे आहेत. महापद्म वगैरे सगळे निधी त्यांचे अनुचर आहेत. हे गृहस्थाश्रम न स्वीकारता सर्वांचा उद्धार करतील. पतितांना नुसत्या दृष्टीने पावन करतील, सर्वांना वंद्य असे होतील, तसेच कोणीही मनुष्य ह्यांच्या अनुग्रहाने वंद्य होईल, यांत कांहीच संशय नाही.'' हे जातक ऐकून माधवाने त्यांची यथायोग्य संभावना केल्यावर ते घरी गेले. सगळीकडे ही अद्भूत वार्ता पसरली. ओंकाराचे पठण करीत जन्माला आलेले बालक पहाण्याकरता लोक आले पण त्यांना कांही तो पहायला मिळाला नाही. कारण माधवाने त्या मुलाला कोणाची दृष्ट लागू नये म्हणून एकांतात ठेवले आणि कांही संरक्षक कवचपाठ वगैरे सुरु केले. त्याचे बारसे करुन नरहरी हे नांव ठेवले. हरीप्रमाणे नरताप आणि अघ, दैन्य हरण करणारा होई म्हणून त्याचे नरहरी हे नांव ठेवले. ''आपल्याला ह्या नरहरीची भूक शमेल एवढे दूध येत नाही. तेव्हां एखादी दाई, उपमाता तरी पहा किंवा चांगले दूध देणारी शेळी पहा,'' असे माधवाच्या पत्नीने त्याला सांगितले. पण हे ऐकून नरहरीने आपल्या चिमुकल्या हाताने मातेच्या स्तनास स्पर्श करताच भरपूर दूध वाहू लागले. पण सज्जनांचे दृगदोष ह्याला लागतील या भीतीने माधवाने हे कुठे दिले आहे!

मानवी लक्षणें धारण करून आलेल्या ह्या ईश्वराच्या ठिकाणी बालवय आहे, बाललीला आहेत वगैरे अज्ञानाची चिन्हे दिसायला लागली. मग ह्याला साक्षात परब्रह्म कोण म्हणणार ? कारण त्याने बाह्य चिन्हे इतर बालकांप्रमाणेंच दाखवली आहेत. तीन वर्षे झाली तरी नरहरी बोलले नाहीत म्हणून अंबेने शास्त्रज्ञांना विचारुन मूकत्व दूर करण्याचे उपाय करू लागली. रविवारी अश्वत्थाच्या पानावर त्याला जेवण द्यायला सांगितले, कुलदैवतेचे अर्चन करावे, इतर मुलांप्रमाणे त्याला छोटे छोटे शब्द शिकवावे असे कोणी कोणी सांगितलेले उपाय त्यांनी केले पण त्याचा कांही उपयोग झाला नाही.

ह्याला ऐकायला किंवा बोलायला येत नाही असे नाही. हा अज्ञानी नाही. कारण हा जर मुका असता तर दुसऱ्याचे बोलणे ऐकून ह्याने उत्तरादाखल ओंकार उच्चारलाच नसता, म्हणजे ह्याला ऐकायला येते. अर्थात बोलताही येत असले पाहिजे. म्हणून मातापित्यांना मोह उत्पन्न झाला. प्रदोषकाली शंकरांची पूजा केली पण हा मुलगा मूका झाला. आपले श्रम वाया गेले असे त्या माता पित्यांना वाटू लागले. दैवयोगाने हे फक्त मिळाले. ह्याचा आता उपनयन संस्कार कसा करायचा ? मातापितरांचे असे संभाषण चालू असताना त्यांनी खूण करून सांगितले, ''मौजी बंधन झाल्यावर मी बोलेन'' आणि त्यांचा विश्वास बसण्याकरता लोखंडाचे सोने करून दाखवले. मौंजी बंधन झाल्यानंतर हा बोलेल असा विश्वास उत्पन्न झाला. ज्योतिषशास्त्राप्रमाणे उत्तम मुहूर्तावर त्यांचे उपनयन केले. मातापित्यांनी आनंदाने सगळी तयारी केली आणि उपनयन केले. चांगला संस्कार झाला. पुण्याहवाचन वगैरे सर्व झाले. मातेबरोबर भोजनही केले आणि गुरुंनी सांगितलेल्या गायत्रीचा उच्चार केला. त्यानंतर गुरुंकडून ब्रह्मचारी धर्म दत्तप्रभुंनी समजून घेतले. मातेकडून भिक्षा घेतली आणि सगळे वेद म्हणू लागले. ह्यात आश्चर्य वाटण्यासारखे कांहीच नाही. संपूर्ण वेदज्ञान ज्यांच्यापासून उत्पन्न झाले त्यांना वेद पठण करणे काय अवघड आहे, हे पाहून मातापित्यांना आनंद झाला. एवढ्यात दत्तप्रभू म्हणाले, ''मी आता संन्यास घेतो. कारण शरीर अत्यंत अनित्य आहे. ज्ञान मिळवण्याकरता, श्रवण करण्याकरता मला लवकर संन्यास घ्यायचाय..'' आईने विचारले, ''कर्म सोडून तुम्ही संन्यास घेतला म्हणजे प्रत्यवाय नाही का तुम्हाला ?'' वेदाध्ययन करणे वगैरे ब्रह्मचाऱ्याची कर्मे आहेत. श्रुती स्मृतींचा अभ्यास करायचा. त्याशिवाय ऋषी ऋण फिटत नाही. हा एक प्रत्यवाय आला. शिवाय पूर्ण वैराग्य प्राप्त झाल्याशिवाय संन्यास घेणे होणार नाही.

त्यावर दत्तप्रभू म्हणाले, ''हे दोन प्रत्यवाय (दोष) मला नाहीत. निश्चित बुद्धी ज्याला आहे त्याला हे दोष नाहीत. ही माझी बुद्धी पूर्व जन्मापासूनच आहे. वेदाध्यायन केले नाही म्हणून प्रत्यवाय नाही किंवा वैराग्य नसल्यामुळे संन्यासाश्रमाचा नाश होण्याचाही दोष नाही.''



मातापित्यांनी विचारले, ''तुम्ही निघून गेल्यावर आमची काय गती ?'' दत्तप्रभू म्हणाले, ''तुम्हाला दु:ख करण्याचे कारण नाही. तुम्हाला अजून संतती होणार आहे.'' माता पुन्हा म्हणाली, ''तुम्ही माझे एकुलते एक पुत्र आहात आणि तुम्ही आम्हाला सोडून कसे काय जाता ?'' ब्रह्मचर्याश्रमात अगोदर वेदाध्ययन केले पाहिजे. म्हणजे कर्माचा अधिकार येतो. त्यानंतर गृहस्थाश्रमाचेही सुख भोगले पाहिजे. मग वानप्रस्थाश्रमात जाऊन पुढे संन्यास घ्यायचा. हे सगळे क्रमाने केल्यावर वासनाक्षय, मनोभंग वगैरे श्रुतींनी सांगितलेली फळे मिळतात.

○○○

# अध्याय १२

आता दत्तप्रभू सांगताहेत, ''जिव्हा आणि उपस्थ सुखामध्ये आसक्त झालेले जे जीव आहेत त्यांना हा क्रम आहे. त्यांनी क्रमाक्रमाने तयारी करायची. मग संन्यास घ्यायचा. माझ्यासारखा प्राक संसार विरक्त जो आहे (वैराग्य माझे पूर्व जन्मापासून आहे.) त्याला हा क्रम नाही. कलीयुगात अगोदरच आयुष्य जास्तीत जास्त १०० वर्षे. झोपेमध्ये अर्धे आयुष्य फुकट जाते आणि शिल्लक राहिलेले ५० वर्षांचे आयुष्य, बाल्य, यौवन आणि वृद्धापकाळात जाते. पुरुषही पराधीनच आहे. काल कोणालाही सोडत नाही. गर्भस्थ जे आहेत त्यांचाही नाश करतो. ज्या शरीराकरता ममता, अहंता ठेवायची ते शरीरही जल बुद् बुदवत आहे आणि पुन्हा अत्यंत घृणास्पद आहे. त्यात मांस, अस्थी, रक्त सगळे भरलेले आहे आणि हिंस्त्र प्राण्यांनी त्याच्यावर हल्ला करु नये म्हणून त्यांना फसवण्याकरता त्वचेने झांकले आहे, नाही तर त्यांनी त्याचा केव्हांच नाश केला असता.

वैराग्याला केवढे हे शरीर उपयोगी आहे! असले शरीर धारण करुन आपण जिवंत राहायचे आणि भोग भोगायचे ह्याच्यापेक्षा आणखी दुसरे वैराग्याला कारण कोणते. अर्थात् हे वैराग्य धीमान् मनुष्याच्या चित्तातच उत्पन्न होणार. इतरांना नाही. उलट हे शरीर टिकवण्यासाठी त्याची काळजी घेण्यासाठीच इतरांची धडपड चालू आहे.

आईला सांगताहेत महाराज, ''माझ्या संन्यासमार्गामध्ये तुम्ही विघ्न आणू नका. तुम्हाला मुलगाही होईल आणि माझ्या कृपेने भवसमुद्रही तुम्ही तरुन जाल.'' असे सांगून त्यांना आपले पूर्वीचे रुप दाखवले. तीही पूर्व जन्मात कुरवपुरातच राहाणारी होती. हे सगळे दाखवावे लागले ना! नुसत्या शब्दाने काम झाले नाही. अर्जुनाला विश्वरुप दाखवावे लागले. मग त्याने कबूल केले माझे कांही (म्हणणे) नाही. त्यावेळेला मोह गेला. महाराजांच्या मातेने ज्ञानदृष्टीने पाहिल्यावर तिला पूर्व जन्माचे स्मरण झाले. त्या दत्तात्रेयांनी तिला वर देतानाच सांगितले होते - श्रीपादांच्या शब्दाबाहेर जाऊ नका तुम्ही. ते सांगतील तसे वागा. ते या जन्मातही कायमच आहे. महाराज श्रीपादच



आहेत. ती म्हणाली, ''पूर्व जन्मात पाहिलेलेच श्रीपाद आपण आहात. ब्रह्मदेवसुद्धा आपल्या रुपाला जाणू शकत नाही तर संसाराने मोहित झालेली मी मानुषी आहे. आज मला आपण हे ज्ञान करुन दिले. मी आपल्याला जन्म दिला हे लोक विडंबन झालेले आहे. आपल्या कुक्षीमध्ये संपूर्ण ब्रह्मांड आहे. आपली विडंबनाच झाली लोकांत. आमचं पितृकुल आणि पतीकुल आपण पवित्र केलंत. आपल्या सत्य संकल्पामध्ये मी विघ्न आणणार नाही. आपलं हे रुप माझ्या चित्तामध्ये राहावे. मला मुलगा होईपर्यंत राहावे.'' (तेवढीच त्यांची संगती होईल असे तिला वाटले. कदाचित तिने अविश्वासही व्यक्त केला आहे. लोक निंदा करतील असे झाले तर! पण महाराजांनी राहावे म्हणून तिने असे म्हटले असावे.)

महाराजांनी आईच्या इच्छेप्रमाणे राहायचे कबूल केले. आईवडीलांनी महाराजांची ईश्वरबुद्धीने पूजा केली. ज्यांची वेद वाणी अशा महाराजांनी पुष्कळ विद्वान पंडितांना शिकवले. अंबा पुढे गर्भिणी होऊन योग्य काळी तिला दोन जुळी मुले झाली. तीन महिने झाल्यावर महाराज आईला म्हणाले, ''आणखी दोन मुलगे व एक कन्या तुला होणार आहे. आता मला आज्ञा द्यायला हरकत नाही.'' आणि आईची आज्ञा घेऊन निघाले. ब्रह्मचाऱ्याचाच वेष होता. काषायवस्त्र आहे. कोमल अंग आहे. आपण गेल्यावर कुटुंबाचे कसे होईल असा विचार आला म्हणजे मन तिथेच गुंतून पडणार. आई प्रार्थना करते आहे. आपण बालक आहात ही बुद्धी म्हणजे भ्रांती आहे. आपल्याकडे बालक बुद्धीने पाहून जे अपराध घडले असतील त्याबद्दल आपण मला क्षमा करा.

महाराज तिला म्हणाले, ''तीस वर्षांनी तुला माझे दर्शन होईल. शिवाय जेव्हां तूं माझी अत्यंत तळमळीने, उत्कटतेने आठवण काढशील त्यावेळी मी लगेच येईन'' आणि सगळ्यांचा निरोप घेऊन महाराज निघाले ते प्रथम काशीला आले. तिथे त्यांचे अनुष्ठान सुरु झाले. लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी स्वत: तप करु लागले. गंगेमध्ये रोज त्रिकाल स्नान असायचे. अष्टांगासहित योगाचा अभ्यास चाललेला आहे. त्यावेळेच्या तिथल्या श्रेष्ठ मंडळींनी हे सर्व पाहिलें आत्मस्वरुप एक आहे, या समाधीमध्ये महाराज निमग्न आहेत. समाधीपर्यंत अभ्यास गेलेलाच आहे. हे श्रेष्ठ पुरुष आहेत अशा बुद्धीने त्या सर्व मंडळींनी महाराजांना नमस्कार केला. खेचरीमुद्रा, केवल कुंभक चालू आहे.

अनाहत नाद सुरु होतो पण त्याचा अभ्यास व्हायला पाहिजे ना! त्या अभ्यस्त नादाने निर्विकल्प समाधी सिद्ध झाली आहे. अशा महाराजांची ही मंडळी स्तुती करु लागली. तेही सगळे संन्याशीच होते.

''आपण साक्षात् परमात्मा आहात. आपण मनुष्य नाही. सज्जनांचे आणि धर्माचे संरक्षण करण्यासाठी आपण अवतार घेऊन आला आहात. शंकराचार्यांनी जो पूर्वी संन्यास घेतला तो आता लुप्त झालेला आहे. ह्या कलीयुगामध्ये आपण संन्यास धर्माचा प्रसार करा. संन्यासमार्गाने जाऊन परमानंद असा अध्यात्म आनंद आपण द्यावा.'' अशी त्या सगळ्या संन्यासी मंडळींनी प्रार्थना केल्यानंतर कृष्णसरस्वतीकडून दत्तप्रभुंनी संन्यासदीक्षा घेतल्यावर त्यांचे नृसिंहसरस्वती असे नांव ठेवले.

प्रयागक्षेत्रामध्ये येऊन माधव ब्राह्मणाला संन्यासदीक्षा दिली. त्याला तत्वोपदेश केला आणि नंतर पुन्हा कारंजाला आले.

नामधारकाने विचारले, ''दत्तप्रभुंना गुरुंची काय आवश्यकता होती? त्यांच्या प्रसादाने तर इतर जीवही दत्तस्वरुप होऊन जातात. मग दत्तप्रभुंना सद्‌गुरु करण्याचे कारण काय? हे कृष्णसरस्वती कोण होते?''

सिद्ध म्हणाले, ''जसे राम व कृष्ण स्वत: ईश्वराचे अवतार असूनही वसिष्ठ व सांदीपनी ऋषींना गुरु केले तसे मानवी देह धारण केल्यावर त्या परंपरेप्रमाणे दत्तप्रभुंनी कृष्णसरस्वतींना गुरु केले. लोकांना शिक्षण देण्यासाठी हे केले. मानवी देह धारण केल्यावर मानवी शास्त्राचार त्यांनी पाळला नाही तर संकर होईल. ह्यांनी जर गुरु केले नाहीत तर लोकही म्हणतील गुरु नकोत कांही नकोत. त्यांचे अनुसरण करणाऱ्या लोकांपासून संकर होईल. गुरुशिष्य नात्याचे बंधन मात्र दत्तप्रभुंना नाही. प्रत्यक्षात त्यांचा कशाशीही संबंध नाही. गुरुमहाराजांच्या अध्यक्षतेखाली मायेने हे सर्व जगत् उत्पन्न केले. तो मायेपासून झालेला आहे. मायेच्या कार्याचे त्यांना बंधन नाही. नुसते त्यांच्या सान्निध्यामध्ये मायेपासून कार्य झाले आहे.''

○○○



## अध्याय १३

आता कृष्णसरस्वतींची परंपरा सिद्ध सांगताहेत. शंकरांचे शिष्य विष्णु - त्यांचे शिष्य ब्रह्मदेव - वसिष्ठ - शाक्त - व्यास - शुक: - गौडपाद: - गोविंद: - शंकराचार्य - विश्वरुप - बोधज्ञान - सिंहगिरी - नृसिंह: - विद्यातीर्थ - शिव: - भागीरथीतीर्थ - विद्यारण्य - मलयानंद - देवतीर्थ - सरस्वती यादवेंद्र. त्यांचे शिष्य कृष्णसरस्वती. कांचीचे जे आचार्य आहेत त्यांच्या नांवात इंद्रसरस्वती असे येते. म्हणून ती परंपरा इतरांपेक्षा थोडी वेगळी आहे. तीर्थ, सरस्वती, भारती वगैरे दहा आहेत. कृष्णसरस्वती हे उत्तम परंपरेमधले असल्यामुळे दत्तप्रभुंनी त्यांच्याकडून संन्यासदीक्षा घेतली.

त्यानंतर संचार करीत करीत दत्तप्रभु प्रयाग क्षेत्री आले. तिथे माधव नांवाचा एक अधिकारी ब्राह्मण राहात होता त्याला संन्यास दीक्षा देऊन ते आईला दिलेल्या वचनाप्रमाणे कारंजा नगरला यायला निघाले.

बालसरस्वती-कृष्णसरस्वती-उपेंद्र सरस्वती-ज्ञानज्योती सरस्वती-सदानंद सरस्वती-माधव सरस्वती आणि सिद्ध ह्यांचे ''सिद्ध'' हेच नांव आहे. दुसरे नांव नाही. प्रत्येकाच्या नांवाच्या शेवटी ''सरस्वती'' संप्रदाय आहे. परमगुरु कृष्णसरस्वती या दक्षिण मठाच्या सांप्रदायाचे होते. इतरही अनेक शिष्य होते.

सिद्ध म्हणाले, (कारंजा) जन्मभूमी सोडताना, ''तीस वर्षांनंतर परत तुला भेटायला येईन'', असे दत्तप्रभुंनी आईला सांगितले होते. दिलेला शब्द खरा करण्याकरता ते कारंजाला आले. मातेच्या दर्शनाकरता आलेले आहेत. कारण माता ही संन्याशालासुद्धा वंद्य आहे. ज्ञानी माणसाने नेहमी खरंच बोललं पाहिजे. संन्यास घेतलेल्या पुत्राला पित्याने नमस्कार केला पाहिजे. त्याने पित्याला नमस्कार करायचा नाही. पण माता दिसल्यावर मात्र त्या संन्याशाने मातेला नमस्कार केला पाहिजे, हे मातेचे विशेष महत्व आहे. जन्मभूमीत कांही दुसऱ्या कोणाला भेटायला आले नाहीत.

दत्तप्रभू जन्मभूमीमध्ये आले. आता इथे आल्यानंतर मातापिता, बंधू भगिनी सर्वांची भेट झाली. त्या प्रत्येकाने बोलावल्यावर प्रत्येकाच्या घरी जाऊन पूजा ग्रहण

केली. आपली खरी शक्ती प्रगट केली. कारंज्यामध्ये प्रत्यक्ष पित्यानेच दत्तप्रभुंची पूजा केल्यावर त्यांच्या मातेला पूर्व जन्माचे स्मरण झाले.

मग ती दत्तप्रभुंना म्हणाली, ''आपण श्रीपादवल्लभ आहात. माझे पुत्र नाही. आपण माझा उद्धार करा. लोकांमध्ये माझे पुत्र म्हणून प्रसिद्ध आहात. या लोक व्यवहाराला अनुसरुन जर तुम्हाला वागायचे असेल तर मी तुमची माता आणि तुम्ही माझे पुत्र हा जो संबंध आपला आहे हा संबंध तुम्ही लक्षात ठेवा आणि माझा उद्धार करा.'' तीही मोठी विचारी होती.

दत्तप्रभू म्हणाले, ''ज्या कुळामध्ये संन्यासी झालेला आहे, त्याच्या एकवीस पिढ्या तरुन जातात. दुर्गतीला गेलेल्या पितरांनाही अमृत म्हणजे सद् गती मिळते. या तुमच्या कुळामध्ये ह्या मुलाने संन्यास घेतल्यामुळे आता कांही शिल्लक राहिलेले नाही. सगळे पूर्ण झालेले आहे. संपत्ती आहे, संतती आहे, सगळं आहे. संसारातली कांही काळजी नाही. पुढे तुम्हाला काशीत मुक्ती मिळेल.'' हाही वर देऊन टाकला. ऐहिक, पारमार्थिक, पारलौकिक सगळं कल्याण झालेले आहे.

दत्तप्रभुंच्या भगिनीने येऊन त्यांना विचारले, ''पुढे माझी काय गती होणार आहे? या भवसिंधुपासून मला फार भीती वाटते. आपणच माझे सद्गुरु आहात. आपणच माझा उद्धार करा.''

दत्तप्रभुंनी तिला सांगितले, ''स्त्रीयांना पतिसेवा हीच तारक आहे. दुसरे कांही नाही. म्हणून पातिव्रत्य धारण करुन राहा म्हणजे भवसागर तरुन जाशील. पूर्व जन्मामध्ये तूं एका पतीपत्नीं मध्ये एकमेकांबद्दल द्वेष निर्माण केलास. चहाडखोरपणा केलास. खोटंच, याचे त्याला त्याचे ह्याला केलस. हा एक दोष आहे आणि रागाच्या भरात गाईला लाथ मारलीस. या दोषांचा परिणाम म्हणजे तुझा पती यती होईला आणि तुझ्या अंगाला कुष्ठ होईल.''

आता ह्या जन्मातले हे फळ सांगितले त्यांनी. ते ऐकून ती अतिशय खिन्न झाली. दत्तप्रभू तिला पुढे म्हणाले, ''अगदी शेवटी शेवटी होणार आहे. तुला श्वेतकुष्ठ जरी झाले तरी तुला माझे दर्शन होऊन तुझा तो रोग जाईल. पती तर तुझा संन्यास घेऊन निघून जाईल. तो कांही परत गृहस्थाश्रमात येणार नाही पण तुझे श्वेतकुष्ठ मात्र जाईल.''



मग या सगळ्यांची अनुज्ञा घेऊन दक्षिण दिशेला जायला निघाले. संचार करीत करीत ते गौतमी नदीच्या तटावर आले. गौतमाने तिला भूलोकावर आणले म्हणून तिचे नांव गौतमी पडले. गोहत्या दोष जाण्याकरता त्याला गौतमीला भूलोकावर आणावे लागले. या गोदावरीत स्नान करुन माधव संज्ञक नांवाच्या ब्राह्मणाला जन्ममृत्युच्या फेऱ्यातून सोडवले. म्हणजे हे गोदातटी भेटलेले.

माधवसरस्वती वेगळे आणि प्रयागला भेटलेले माधव विप्र वेगळे. ह्यांना संन्यास कांही दिलेला नाही. पण ह्यांना संसारातून मुक्त केले. ह्यांनी स्तुती केलेली आहे.

ह्या गोदावरी तीरावरुन पुढे निघाले. वाटेत नदीमध्ये आत्महत्या करण्यासाठी आलेला ब्राह्मण दिसला. त्याने आपल्या कंठात बुडून मरण्यासाठी मोठी शिळा बांधली होती. दत्तप्रभुंनी त्याला विचारले, ''कां, बाबा, देहत्याग करण्याचे साहस तूं कां करतो आहेस?'' तो आपल्या रोगाला इतका कंटाळला होता की त्याने विचारले, ''तुम्ही जाणून घेऊन काय करणार आहात? काय माझा रोग बरा करणार आहात कां?'' त्याला काय माहीत आपल्याला विचारणारे कोण आहे? त्रासून गेला होता बिचारा. तो म्हणाला, ''अन्न माझे वैरी झाले आहे. अन्न घेतले की भयंकर पोटशूळ उठतो. आता हे दु:ख सहन करणें अशक्य झाले आहे. तेव्हां मी कसा व कशासाठी जिवंत राहू? म्हणून मी आत्महत्या करण्यासाठी निघालेलो आहे.''

''अन्नाशिवाय जिवंत तरी कसे राहायचे? असे त्याने विचारले. त्यापेक्षा मरण येणं बरं असं मला वाटतं.'' म्हणाला. आता आपल्या कर्माची आठवण त्याला झाली. तो म्हणाला, मी कोणालाही कधी अन्नदान केले नाही. या जन्मातही नाही आणि पूर्वीच्या जन्मातही नाही. गाईचा, विप्राचा घास मी घेतला. मातापिता, गुरुंची निंदा केली. ईश्वराचे अर्चन केले नाही. अतिथींना घालवून दिले. मातापित्यांना सोडून स्त्रीसह मिष्टान्न भक्षण केले. मला इतके कष्ट का आले? जन्म फुकट गेला माझा.''

महाराज म्हणाले, ''भिऊ नकोस. पथ्यकारक अन्न मी तुला औषध म्हणून देतो. मी भिषक आहे.'' एवढं त्याला आश्वासन देऊन महाराज थांबले. एक ब्राह्मण तिथे आला. गाणगापुराकडून इकडे आला. त्या वासर ब्रह्मेश्वरला होता तो. म्हणाला,

मी कौडिण्य गोत्री ब्राह्मण असून माझे नांव सायंदेव आहे.

महाराज सायंदेवाला म्हणाले, ''हा ब्राह्मण पोटशूळाने त्रस्त होऊन आत्महत्या करायला निघाला आहे. त्याला मी दिव्य औषध देणार आहे. ह्याला तूं उत्तम पक्वान्न करुन जेवायला घाल.''

सायंदेव म्हणाले, ''ह्याला जर मी अन्न खायला घातले तर मरेल हा. महिना पंधरा दिवसातून एकदा जरी अन्न खाल्ले तरी आत्यंतिक पोटशूळाची व्यथा ह्याला होते. ह्याला अन्न देऊन ब्रह्महत्येचे पातक लागेल.''

महाराज म्हणाले, ''पाहू या. पुढे काय होतं ते पाहू. जेवायला घाल तू ह्याला. मी उत्तम वैद्य आहे. रोगाची चिकित्सा मला माहिती आहे. खीर, उडदाचे वडे वगैरे कर. अनरसे वगैरे करुन ह्याला जेवायला घाल.''

सायंदेवांने महाराजांना त्यांच्या शिष्य परिवारासह घरी आणले. महाराजांना उत्तम आसनावर बसवून पत्नीसह देवताबुद्धीने महाराजांची पूजा केली. महाराजांच्या पाना भोवती रांगोळ्या काढल्या. सगळे उपचार त्याने केले. कांही कमी केले नाही. रुद्र, पुरुषसूक्ताने महाराजांची पूजा केली. तीर्थाची पूजा केली. सद्गुरुंच्या पायाचे तीर्थ हे पापहारक आहे. सायंदेव कवी होते त्यामुळे गीतानेही महाराजांची स्तुती केली. त्या नंतर त्या गुरु पंक्तीमध्ये जेवल्यामुळे त्या ब्राह्मणाची पोटदुखी दूर होऊन त्याला आरोग्य मिळाले. सिद्ध म्हणतात, ''पोटशूळ जाणे म्हणजे कांहीच नाही. जन्माला येणे हाच मोठा रोग आहे. तोसुद्धा ज्याचे भक्त घालवतात त्यांना पोटशूळ घालवणे सहज शक्य आहे. हा रोग जाऊन त्याचे कल्याणच झाले आणि तो महाराजांचा शिष्य झाला. घरदार सगळे सोडून तो सद्गुरुंची सेवा करु लागला.''

सायंदेवांनीही महाराजांची स्तुती केली. आपल्या चरण कमलाच्या वंदनाने माझा जन्म सफल झाला. माझे पितरही मुक्त झाले. मी कृतार्थ झालो आहे. म्हणजे आदरपूर्वक अतिथीची सेवा कशी करावी हे सांगितले आहे.

○○○



# अध्याय १४

सायंदेवांनीही अशीच प्रार्थना केली आणि आता त्यांच्यावर आलेले संकट ते महाराजांना सांगताहेत. ''मला एक मानसिक व्यथा आहे ती ऐका. ज्याची मी नोकरी करतो तो अत्यंत कठोर यवन आहे. प्रत्येक वर्षी एका ब्राह्मणाला तो ठार मारतो. आणि आज त्याने मला ठार मारण्यासाठीच बोलावले आहे.''

सायंदेवांनी त्या ब्राह्मणाचा पोटशूळ गेल्याचे पाहून महाराजांच्या सामर्थ्याबद्दल त्यांच्या मनांत विश्वास उत्पन्न झाला ना ! आणि तो पोटशूळही लगेच गेला. कांही दिवस औषध घ्या म्हणजे जाईल असे नाही झाले. त्यामुळे आपलीही व्याधी सायंदेवांनी महाराजांना सांगितली. महाराजांची सेवा घडण्याकरता जिवंत राहावे असे म्हणताहेत ते.

महाराज म्हणाले, ''मनांत कोणताही संशय न आणता त्या क्रूर यवनाकडे जा. तो तुझी पूजा करील आणि आनंदाने तूं परत येशील. तूं परत येईपर्यंत आम्ही इथे थांबतो. तूं जा.'' त्याप्रमाणे मनांत कोणतीही भीती न बाळगता सायंदेव यवनाकडे गेले. तिकडे त्या यवनाला अशी भ्रांती झाली की कोणी तरी ब्राह्मण आपल्यावर शस्त्राने प्रहार करतो आहे. मग त्या यवनाने सायंदेवांना वस्त्र, भूषणे वगैरे देऊन आदराने परत पाठवले. सायंदेवांची सगळी मानसिक व्यथा गेली. आनंदाने गुरुमहाराजांच्याकडे आले. गरुडाच्या पिल्लाला सर्प खाऊ शकतो का ? अंतक (मारेकरी) गुरुभक्तांकडे दृष्टीसुद्धा टाकू शकत नाही मग हा यवन काय करणार आहे ? तूं आमचा दास आहेस. पुन्हा सोळा वर्षांनी तुला आमचे दर्शन होईल. असे सायंदेवांना सांगून महाराज परळी वैजनाथला येऊन गुप्त रुपाने राहिले.

○○○

# अध्याय १५

नामधारक म्हणतात, ''तेजस्वी, भक्तवत्सल, सर्व भूतांचे स्वामी, ते गुप्त कसे झाले ? शिष्य मंडळी कुठे राहिली ? ते ऐकण्याची मला इच्छा आहे.''

सिद्धांनी सांगितले, ''सगळेच लोक आता शिष्यत्व पत्करायला येतील त्यापेक्षा आपण एकांतात राहावे असे महाराजांनी ठरवले. शिष्यांची परीक्षाही पहायची आणि परंपराही वाटेल त्याला द्यायची नाही. म्हणून महाराज गुप्त झाले. म्हणून सगळ्या गृहस्थाश्रमी शिष्यांना त्यांच्या घरी पाठवून संन्यासी शिष्यांना महाराज म्हणाले, काशी, प्रयाग, श्रीरंग, श्रीशैल्य, नैमिषारण्य, कुरुक्षेत्र, बद्रीनारायण, गोकर्ण, कांची, अयोध्या, मथुरा, द्वारावती, अवंतिका, करवीरपूर, गंधर्वपूर, हरीहरक्षेत्र, देवकन्यका (कन्याकुमारी) कार्तिक स्वामींचा आश्रम, रामेश्वर पुष्कळ तीर्थ आहेत. नद्यांचे संगम पापहारक आहेत. प्रत्येक बारा वर्षांनी गुरु निरनिराळ्या राशीला जातो त्या त्या वेळी ती तीर्थयात्रा करावी. कन्येला गुरु आल्यावर मलप्रभेत, अशी सर्वत्र तीर्थ जातात. त्या वेळी त्या त्या नद्या गंगास्नानाचे पुण्य देणाऱ्या असतात. सर्व ठिकाणी यथाविधी स्नान इ. करा. नद्या ग्रीष्मकाली रजस्वला असतात नवीन पाणी आल्यामुळे तीरावर राहाणाऱ्या लोकांना त्या नदीशिवाय दुसरा पर्यायच नसल्यामुळे त्यांनी त्याच नदीत स्नान केले पाहिजे पण इतरांनी मात्र करु नये तीन दिवस. विहीरींना एक दिवसाचा विटाळ असतो.

सगळी तीर्थयात्रा करुन बहुधान्य संवत्सरात तुम्ही श्रीशैल्याला या. आम्ही त्या वेळी तिथे येऊ. त्यांच्या आज्ञेप्रमाणे बाकीचे सगळे शिष्य तीर्थयात्रेला गेले. मी तेवढा महाराजांची सेवा करण्याकरता राहिलो,'' असे सिद्धांनी सांगितले.

○○○



# अध्याय १६

नामधारकाने विचारले, ''शिष्यांना तीर्थयात्रेला पाठवून स्वत: महाराज कुठे राहिले ?''

सिद्ध सांगताहेत, ''महाराज एक वर्ष वैजनाथाजवळ राहिले आणि मीही त्यांची सेवा करण्याकरता तिथे राहिलो.'' एक दिवस एक मंदबुद्धीचा ब्राह्मण आला. महाराजांना नमस्कार करुन म्हणाला, ''महाराज, मोक्षाचा उपाय आपण मला सांगा. मोक्षसिद्धीकरता मी पुष्कळ कष्ट केले. तथापि मला मोक्षसिद्धीही प्राप्त झाली नाही आणि सन्मार्ग दाखवणारे गुरुही मिळाले नाहीत.''

महाराज म्हणाले, ''गुरु मिळाले नसताना मोक्षसिद्धीकरता तूं कोणाच्या आज्ञेने कष्ट केलेस ?''

त्या ब्राह्मणाने सांगितले, ''मोक्षसिद्धीकरता मी एक गुरु केले होते. पण ते अतिशय रागीट होते. सेवा करताना त्यांनी मला पुष्कळ त्रास दिला. म्हणून मी त्यांना सोडले.''

महाराज म्हणाले, ''अरे, अरे, गुरु हा आपल्या मातापित्याप्रमाणें असतो त्याचा द्रोह कधीही करु नये. तूं फार वाईट गोष्ट केलीस. तुझा धिक्कार असो. आमच्या समोरुन निघून जा. कारण गुरुद्रोही माणसाचे तोंडही पाहू नये. ते कधीही कल्याण करणारे होत नाही. मुखावलोकनही करायचे नाही मग भाषण वगैरे दूरच राहिले. सेवेच्या इच्छेने त्या गुरुंनी मला फार त्रास दिला. ''सेवार्थी पीडयामास'' असं तूं म्हणालास. म्हणजे सेवा ही पिडा वाटली तुला. तूं सेवा करावीस असें गुरुंना वाटते पण तुला ती पिडा वाटतेय. म्हणजे आळशी आहेस तूं. म्हणजे तुला सेवा करायला नकोय. आळसाने तुझी बुद्धी दूषित होऊन तूं गुरुंचा त्याग केला आहेस म्हणून तुझे मुख पहायचे नाही.''

बरं, त्या ब्राह्मणाने विचारले, ''खऱ्या गुरुंचे ज्ञान कसे व्हायचे आणि गुरुंची खरी सेवा कशी करायची ? ते आपण मला सांगा. अज्ञानाने माझा गुरुद्रोह झालेला आहे. माझा उद्धार करा.''

गुरु साक्षात् ब्रह्मा, विष्णू, महेश रुप आहेत, त्यांना साक्षात् परब्रह्मच म्हणतात आणि आपल्या भक्ताच्या सर्व इच्छा ते पूर्ण करतात. सेवा कठीण वाटली तरी त्या सेवेच्या योगे गुरु आपल्या शिष्याला नेहमीच तारतात. या संबंधात एक कथा सांगतो. द्वापार युगात धौम्य नांवाचे ऋषी होऊन गेले. ते आपल्या शिष्यांचे दोष जाणून ते दूर करुन त्याच्यावर कृपा करणारे होते. त्यांना तीन शिष्य होते. त्यांना ते कठीण सेवा सांगत, वेदार्थ सांगत नसत, विशेष ज्ञान देत नसत. पण परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या शिष्यांवर मात्र कृपा करीत. ही गुरु राहाटीच आहे. एकदा त्यांनी त्यांच्या तीन शिष्यांची परीक्षा पहायचे ठरवले. प्रथम आरुणी नांवाच्या शिष्याला बोलावून शेताला पाणी देण्यास सांगितले. शेत वरच्या बाजूला तर पाणी खालच्या बाजूला ते वर कसे चढणार ? म्हणून आरुणीने आपल्या देहानेच ते पाणी अडवून वरच्या बाजूला नेण्याची व्यवस्था केली. हे पाहून धौम्य ऋषी प्रसन्न झाले आणि त्याच्यावर कृपा केली. गुरुंच्या कृपेने तो अध्यात्म ज्ञानी झाला. मग त्याला घरी पाठवला. दुसरा शिष्य बैद. या बैदाला त्यांनी शेतीकडे लक्ष देण्यास सांगितले. पीक तयार झाल्यावर ते घरी आणण्यासाठी एकच रेडा असलेली गाडी दिली. बैदाने सर्व धान्य गाडीत भरले आणि दुसऱ्या बाजूला स्वत:ला जुंपून घेऊन ती गाडी तो ओढू लागला. त्याला अतिशय कष्ट होऊ लागले आणि एक ठिकाणी चिखलात तो गाडीसह रुतून बसला. मग गुरुंनी येऊन त्याला वर काढला. त्याच्या सेवेवर प्रसन्न होऊन आशीर्वाद देऊन परत पाठवला. गुरुंच्या प्रसादाने त्याला सर्व विद्या आल्या. तिसरा उपमन्यु. त्याची परीक्षा करण्यासाठी त्याला रानात गायी घेऊन जाण्यास सांगितले. तसेच भिक्षा मागून आणून ती आपल्याला आणून द्यायची आज्ञा केली. उपमन्यूला भूक अनावर होत असे. त्याने दोन वेळा भिक्षा मागायला सुरवात केली. एक भिक्षा तो धौम्य ऋषींना आणून देत असे तर एक स्वत:साठी आणी. गुरुंना हे समजल्यावर त्यांनी दोन्ही भिक्षा त्यांनाच आणून देण्यास सांगितले. तेव्हां गुरुंवर न रागावता त्याने दोन्ही भिक्षा त्यांनाच आणून दिल्या व



स्वत:ची भूक भागवण्यासाठी गायीची वासरे पिताना जे दूध सांडे ते पिण्यास सुरवात केली. हे समजल्यावर गुरुंनी त्याला तसे न करण्याची ताकीद देताना सांगितले की असे उच्छिष्ठ पिऊ नये त्याने बुद्धी मंद होते. शेवटी तो भूक अनावर झाल्यावर एका झाडाचा चीक डोळ्यात जाऊन अंध झाला आणि एका विहीरीत पडला. तो संध्याकाळी घरी आला नाही म्हणून गुरु त्याला शोधायला वनात गेले आणि तेव्हां त्यांना समजले, याचे काय झाले ते. आपल्या सामर्थ्याने त्यांनी त्याला वर तर काढलेच पण दृष्टी दिली, सर्व विद्या दिल्या. त्याचे सर्व मनोरथ पूर्ण केले. त्याचे जीवन गुरुकृपेने कृतार्थ झाले. पुढे परीक्षित राजाने सर्प यज्ञ केला तेव्हां उपमन्युने मंत्र सामर्थ्याने इंद्रासह तक्षकाला यज्ञकुंडात आणले होते इतकी त्याची शक्ती होती.

अशी ही गुरुंना संतुष्ट करण्याची कथा महाराजांनी त्या ब्राह्मणाला सांगून त्याच्या गुरुकडे परत पाठवले. त्यांची सेवा करुन त्यांना शरण जाऊन प्रसन्न करुन घेण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे त्या ब्राह्मणासही अनुताप होऊन तो आपल्या गुरुंकडे परत गेला. नंतर महाराज भिल्लवडीला येऊन चार महिने राहिले.

○○○

# अध्याय १७

कोल्हापूरातल्या एका विद्वान ब्राह्मणाचा मुलगा दैवयोगाने अज्ञानी झाला. गांवातली मंडळी त्याला म्हणू लागली की, ''तुझ्यात व पशुंच्यात कांही फरक नाही. तूं विद्याविहीन असल्याने तुझा धिक्कार असो.'' हे सगळे ऐकून त्या मुलाला फार वाईट वाटले आणि तो भुवनेश्वरीच्या मंदिरात येऊन बसला. तीन दिवस अन्नपाणी वर्ज्य केले. तरी देवीचा प्रसाद झाला नाही म्हणून त्याने आपली जीभ तोडून देवीच्या चरणी अर्पण करायचा निश्चय केला. त्याची एवढी तळमळ पाहून देवीने प्रसन्न होऊन त्याला दत्तप्रभुंच्याकडे पाठवले. त्याने नमस्कार केल्यावर दत्तप्रभूंनी आपला वरदहस्त त्याच्या मस्तकावर ठेवताच त्याला जिव्हा तर परत मिळालीच पण सर्व ज्ञानही मिळाले. दत्तप्रभुंच्या आज्ञेने तो घरी गेला आणि महाराजाच्या कृपेने त्याला ऐहिक सुख तर मिळालेच पण आत्मज्ञानाचीही प्राप्ती झाली.

○○○



# अध्याय १८

तिथून दत्तप्रभू दक्षिण दिशेला आले. कृष्णापंचगंगेचा मनोहर संगम असलेले हे क्षेत्र महाराजांना आवडले आणि त्यांनी तिथेच राहायचे ठरवले. पलीकडे अमरापूरमध्ये अमरेश्वरांचे स्थान होते. तिथे ६४ योगिनी राहात होत्या.

रागद्वेशादिक विकार असलेल्या मनुष्यालाही अमर करणारे हे स्थान आहे. दक्षिणाभिमुख वाहाणाऱ्या कृष्णेच्या किनाऱ्यावर महापाप घालवणारी अनेक तीर्थ आहेत. कर्माप्रमाणे पाप करण्याची बुद्धी होते तशी पापकर्माचे फल नष्ट करायची योजनाही ईश्वराने करुन ठेवली आहे. सकाम भक्तांच्या सर्व कामना इथे पूर्ण होतात तर मुमुक्षुला मोक्ष मिळतो. इथे महाराज व्यक्त रुपाने बारा वर्ष आणि त्या नंतर अव्यक्त रुपाने अजूनही महाराज तिथे राहात आहेत. अमरापुरात एक आचारसंपन्न पण अतिशय गरीब ब्राह्मण राहात होता. मागून आणलेल्या भिक्षेवर त्याचा तो उदरनिर्वाह करीत असे. तरीही अतिथीबद्दल त्यांना आदर होता. महाराज जेव्हां त्याच्याकडे भिक्षेला गेले तेव्हां त्यांना देण्यासाठी त्या ब्राह्मणीच्याकडे कांहीच नव्हते. त्यांना परत कसे पाठवायचे म्हणून तिने दारातल्या घेवड्याच्या वेलाला लागलेल्या शेंगांची भाजी त्यांना दिली. ती अत्यंत भक्तीभावाने दिलेली भाजी घेऊन महाराज निघाले. जाताना दारातला तो घेवड्याच्या वेलत्यांनी उपटून टाकला. तो वेल म्हणजे त्या कुटुंबाचे जीवनच होते तोच नष्ट झालेला पाहिल्यावर तिला फार वाईट वाटले. पती घरी आल्यावर तिने सर्व वृत्तांत त्याला सांगितला. तिच्या पतीने तिला समजावले की त्या अतिथीला तिने दोष देऊन त्याची निंदा करु नये. म्हणजे अशावेळी त्या ब्राह्मणाचा ईश्वरावर दृढ विश्वास आहे. महाराजांनी तोडलेल्या वेलाची मूळे उपटून टाकण्यासाठी तो गेल्यावर त्याला सुवर्णमुद्रांनी भरलेला हंडा सांपडला. अतिशय आनंदाने तो पत्नीसह तो हंडा घेऊन महाराजांना दाखवण्यासाठी आला. महाराजांनी त्याला सांगितले, ''ही घटना गुप्त ठेवा. प्रगट केलीत तर हे धन राहाणार नाही.'' आणि पुढे आशीर्वाद दिला, ''तुम्हाला सर्व ऐश्वर्य मिळेल, पुत्र पौत्र प्राप्ती होईल, तुम्ही आरोग्य संपन्न व्हाल आणि शेवटी तुम्हाला मोक्ष मिळेल. आता आनंदाने आपल्या घरी जा.''

○○○

# अध्याय १९

संन्यासाने भिक्षेवर आपला निर्वाह करावा असे शास्त्र सांगते. महाराज स्वत: जरी ईश्वर असले तरी लोक शिक्षणासाठी त्यांनी आपला शास्त्राज्ञेप्रमाणे आचार ठेवला. याला शंभु वृत्ती म्हणतात. शम म्हणजे ज्या वृत्तीने सुख होते ती. भिक्षा मिळाली तरी हरकत नाही, नाही मिळाली तरी दु:ख नाही. दुसरा अर्थ शंकरांप्रमाणे वृत्ती. नृसिंह अवतारात हिरण्यकश्यपुचे पोट फाडल्यावर त्यातले विष नृसिंहांच्या नखात भिनले. त्यांनी जेव्हां ती बोटे औदुंबराच्या फळात खुपसली तेव्हां तो विषप्रभाव शांत झाला म्हणून त्यांनी औदुंबराला वर दिला की तो कल्पवृक्ष होईल आणि ते त्याच्या आश्रयाने राहातील. म्हणून महाराजही त्याच्याजवळ राहिले.

इथे वाडीत मात्र दत्तप्रभू भिक्षा मागत नव्हते. योगिनी त्यांची भिक्षा करीत. गांवातल्या लोकांना अज्ञानाने महाराजांचे सामर्थ्य व योग्यता समजली नाही. महाराज जर भिक्षा मागत नाहीत मग हे जिवंत कसे राहतात असा त्यांना प्रश्न पडला. आणि त्यांनी महाराजांवर पाळत ठेवली. पण मध्यान्ह काली पाळत ठेवणाऱ्या लोकांनाच भीती वाटून ते तिथून निघून गेले.

गंगानुज नांवाचा एक सालस शेतकरी होता. एक दिवस तो महाराजांच्या दर्शनाला दुपारच्या वेळी आला असता त्याला एक विलक्षण दृष्य पहायला मिळाले. दुथडी वाहाणारी कृष्णा एकदम दुभंगली आणि दत्तप्रभू त्या दुभंगलेल्या मार्गाने आंत गेले. हा गंगानुजही त्यांच्या पाठोपाठ आंत गेला. आंत एक दिव्य सर्व ऐश्वर्यसंपन्न नगरी होती. तिथल्या सिंहासनावर महाराजांना बसवून योगिनींनी त्यांची पूजा करुन त्यांना भिक्षा घातली. महाराजांनी त्याला पाहिल्यावर त्याला सांगितले की, 'ही गोष्ट त्याने कुठे जाहीर करु नये.' गंगानुजानेही महाराजांची खूप स्तुती केली. पुढें तो नित्य महाराजांच्या दर्शनाला येऊ लागला. एक दिवस त्याने महाराजांना त्रिस्थळी यात्रा म्हणजे काय असे विचारले. महाराजांनी त्याला सांगितले, ''कृष्णापंचगंगा संगम म्हणजे प्रयाग आहे, नदीच्या खालच्या बाजूला जुगुळ म्हणून जे स्थान आहे ते काशी आहे आणि कोल्हापूर क्षेत्र म्हणजे गया आहे. ते तर तुला दाखवतोच शिवाय उत्तरेकडची ही मूळ स्थानेही दाखवतो. माझ्या पादुका घट्ट धर आणि डोळे मिट.''



त्याप्रमाणे त्याने केल्यावर त्याला दोन्ही त्रिस्थळी यात्रेला नेऊन आणले. पुढे महाराजांच्या कृपेने तोही मुक्त झाला.

आता वाडी क्षेत्राचा महिमा वाढू लागला. येणाऱ्या लोकाची संख्या वाढू लागली. आता सर्व प्रकारचे लोक येऊन उपद्रव होणार तेव्हां आता इथे गुप्तरुपाने राहावे आणि प्रगटरुपाने दुसरीकडे जावे. योगिनींना हे समजल्यावर त्यांना वाईट वाटले. त्यांनी महाराजांना जाऊ नये अशी प्रार्थना केली. महाराजांनी त्यांना आश्वासन दिले की जरी लोकदृष्ट्या मी जात असलो तरी गुप्तरुपाने इथेच राहाणार आहे.

मग महाराजांनी कल्पवृक्षरुपी औदुंबराखाली आपल्या मनोहर पादुकांची स्थापना केली आणि आश्वासन दिले की, 'कोणीही येऊन इथल्या अष्टतीर्थात स्नान करावे आणि पादुकांचे तसेच योगिनींचेही अर्चन करावे म्हणजे त्याच्या सर्व कामना पूर्ण होतील.'

इथून नंतर महाराज गाणगापूरला गेले.

○○○

## अध्याय २०

नामधारकांनी सिद्धांना विचारले, ''महाराज गाणगापूरला गेल्यावर वाडीक्षेत्रात येणाऱ्यांची कार्यसिद्धी कशी झाली ?''

सिद्ध सांगताहेत, ''शिरोळ गांवात राहाणाऱ्या एका विप्रस्त्रीचे पुत्र जन्मून मरण पावले.'' म्हणून तिने गांवातल्या शास्त्रज्ञ मंडळींना याचे कारण विचारले. त्यांनी तिला सांगितले, 'पूर्व जन्मात तूं ज्या शौनक गोत्राच्या ब्राह्मणाचे द्रव्य घेतेले होतेस ते परत केले नाहीस. तो ब्राह्मण पिशाच्च होऊन तुझी मुले मारतो आहे.'

त्यावर तिने त्यांना उपाय विचारला. त्यांनी सांगितले, ''तुझ्या नवऱ्याकरवी त्या पिशाच्चाचे और्ध्वदेहिक तूं कर, कृष्णेत स्नान करुन मनोहर पादुकांचे तूं अर्चन कर व ब्राह्मण भोजन करुन शौनक गोत्रातल्या ब्राह्मणाला तू द्रव्य दे म्हणजे या दोषातून तूं मुक्त होशील.''

ती म्हणाली, ''माझ्या जवळ द्रव्य कांही नाही. पण मी महिना भर पादुकांचे व औदुंबराचे अर्चन करीन तोच परमात्मा माझे रक्षण करील.''

तीनच दिवसात तिला फळ मिळाले. तो पिशाच्च भीती दाखवून द्रव्य मागू लागला आणि त्याच वेळी तिला महाराज औदुंबराखाली बसलेले दिसले. त्यांनी त्या स्त्रीला अभय देऊन त्या पिशाच्चाला सांगितले, ''ही गरीब असल्याने हिला मिळेल तेवढेच द्रव्य तुझ्या गोत्रातल्या ब्राह्मणाला ही देईल म्हणजे तुला मोक्ष मिळेल. मी हिचे रक्षण करणार आहे.''

नंतर महाराजांच्या कृपेने तिला दोन मुले झाली. त्यातला मोठा मुलगा आठ वर्षाचा झाल्यावर त्याला संन्निपात होऊन तो गेला. ती स्त्री म्हणाली, ''पिशाच्च पीडेपासून मला ज्या परमेश्वराने वाचवले त्याचा प्रसाद निष्फल कसा झाला. देवाचे वचन खोटे ठरत असेल तर त्याचे भजन करायचे कशासाठी ?'' आणि शोकमग्न होऊन ती ते प्रेत दहन करण्यासाठी देईना. गांवातल्या सर्वांनी तिला समजावले पण ती कांही ऐकेना. शेवटी अचानक एक जटाधारी ब्रह्मचारी तिथे आला आणि त्याने तिला उपदेश करायला आरंभ केला.

ooo



## अध्याय २१

त्या ब्रह्मचाऱ्यांनी तिला समजावयाला सुरवात केली. ते म्हणाले, ""मुलगा हा शोकाचा विषय होऊ शकत नाही. देह म्हणजेच जर मुलगा असेल तर तो तुझ्या समोरच आहे. जो या देहातून निघून गेलेला आहे तो पुत्र आहे. जीव देहांत असेल तरच देहाला चैतन्य आहे. आणि तो जीव हा परमेश्वराचा अंश आहे. त्याला जन्मही नाही मृत्युही नाही. देह हा पंचमहाभूतांचा बनलेला आहे. त्या देहाचा मायेने संबंध आला व तो देह पडला म्हणून तूं शोक करते आहेस. जर हाच तुझा मुलगा आहे तर गेल्या जन्मी तूं कोणाची कोण होतीस व हाच तुझा मुलगा होता का ? तसेच पुढच्या जन्मात या मुलाचा व तुझा काय संबंध येणार आहे ? नदीच्या प्रवाहात दोन लांकडे एकत्र वाहात येतात कांही काळ एकत्र राहातात परत एकमेकांपासून दूर वाहात जातात. तसे आहे. कर्म बंधामुळे जन्ममृत्युच्या फेऱ्यात जीव सांपडतो आणि त्याला सुखदु:ख भोगावे लागते. असा कष्टप्रद जन्म मिळाल्यावर दु:ख करीत बसण्यापेक्षा पुढचा जन्म तरी येऊ नये म्हणून प्रयत्न करावा.""

तरी तिचा एकच प्रश्न "महाराजांनी मला प्रसाद दिला असताना असे कसे झाले ? आणि असेच होणार असेल तर देवावर विश्वास कशासाठी ठेवायचा ? पुढे कोण ठेवील ?" शेवटी महाराजांनी तिला सांगितले, ""तुला जिथे वर मिळाला तिथे हे शव नेऊन ठेव."" त्याप्रमाणे ती पादुकांजवळ येऊन शिर आपटून घेऊ लागल्यावर महाराज प्रगट झाले व त्यांनी त्या मुलाला जिवंत केले आणि सर्वांना आनंद झाला. या पादुकांच्या ठिकाणी मोठी शक्ती असल्याची सर्वांना कल्पना आली आणि विश्वास, श्रद्धा, भक्ती ठेवणाऱ्याच्या मनोकामना पूर्ण होतात याचाही सर्वांना अनुभव आला.

ooo

# अध्याय २२

नामधारकाने सिद्धांना विचारले, भीमातीरावर आल्यावर श्रीगुरुंनी काय काय लीला केल्या ते मला सांग.

सिद्ध म्हणाले, ''महाराजांचे चरित्र इतके विस्तृत आहे त्याचे वर्णन करणे प्रत्यक्ष ब्रह्मादिकांनाही शक्य नाही मग मी तर एक अति सामान्य जीव आहे. तरीही तुला मी संक्षेपाने सांगतो.''

गाणगापूरमध्ये एक आचारसंपन्न पण दरिद्री ब्राह्मण राहात होता. महाराज त्याच्याकडेच भिक्षेला गेले. तो ब्राह्मण नेमका त्याच वेळी गांवात भिक्षेला गेला होता. त्याच्या बायकोने महाराजांना सांगितले की तिचे पती भिक्षा घेऊन आले की ती महाराजांना भिक्षा देईल. त्यांची एक म्हातारी म्हैस होती. महाराजांनी त्या विप्रस्त्रीला सांगितले, ''आम्हाला त्या म्हशीचे दूध दे.''

ती म्हणाली, ''ही म्हैस वंध्या आहे आम्ही तिचा भार वाहाण्यासाठी उपयोग करतो. ती दूध देत नाही.''

महाराज म्हणाले, ''बाई खोटे बोलू नका. लवकर धार काढून दूध काढून द्या. महाराजांच्या सांगण्यावर पूर्वपुण्याईने तिचा विश्वास बसला आणि तिने म्हशीचे दूध काढायला सुरवात केली आणि आश्चर्य म्हणजे ज्या म्हशीने कधीही दूध दिले नव्हते तिने दूध दिले. ते घेऊन, तुमचे दारिद्र्य कायमचे दूर होईल असा आशीर्वाद देऊन महाराज संगमावर निघूनही गेले.''

○ ○ ○



# अध्याय २३

राजाच्या कानावर ही वार्ता गेल्यावर त्याने त्या ब्राह्मणाला सर्व विचारुन खात्री पटवून घेतली आणि महाराजांची योग्यता समजल्यावर तो आपले चतुरंग सैन्य व सर्व लवाजमा घेऊन महाराजांच्या दर्शनासाठी संगमावर आला. त्याने महाराजांना प्रार्थना केली. आपण साक्षात परमेश्वर आहात, संगम सोडून आपण माझ्या नगरात येऊन राहा व आमचा उद्धार करा.

त्याचा भक्तीभाव पाहून महाराजांनी हे मान्य केले. मग राजाने त्यांना पालखीत बसवून मोठ्या वैभवात गांवात नेले. गांवातल्या मठात जरी महाराज राहात होते तरी संगमावर आपले नित्यकर्म लोकशिक्षणार्थ करीत. एकदा ते तिथे आले असता एक राक्षस झाडावरून खाली आला आणि त्याने महाराजांना, 'मला या योनीतून मुक्त करा' अशी प्रार्थना केली. महाराजांनी दया उत्पन्न होऊन त्याच्या मस्तकावर आपला वरद हस्त ठेवला. त्या बरोबर त्याला मनुष्यरुप प्राप्त झाले. महाराजांच्या आज्ञेप्रमाणे संगमावर जाऊन स्नान केल्यावर त्याला महाराजांच्या कृपेने मुक्ती मिळाली.

कधी कधी राजाबरोबर महाराज वन भोजनास जात असत. आदराने भक्तीभावाने राजा त्यांना पालखीत बसवून नेत असे. हे सर्व त्रिविक्रम भारतींच्या कानावर गेले.

○ ○ ○

# अध्याय २४

गाणगापूर जवळच्या कुमसी गांवात त्रिविक्रम भारती नांवाचे मोठे ज्ञानी संन्यासी होते. ते नरसिंहाचे मोठे उपासक होते. त्यांना असे वाटले, महाराज संन्यासी असून हे असे राजाबरोबर वनांत जाणे, पालखीत बसणे वगैरे संन्यासाश्रमाच्या विरुद्ध आचरण करताहेत. संन्यासाश्रम हा महाराजांचा दांभिकपणा दिसतोय.

सर्व साक्षी महाराजांना त्रिविक्रम भारती आपली निंदा करताहेत हे समजले. एक दिवस त्यांनी राजाला सांगितले, ''आज आपणाला कुमसी गांवाला जाऊन निंदकाला शिक्षा करायची आहे.''

त्यांच्या आज्ञेप्रमाणे राजाने महाराजांना पालखीत बसवून छत्र, चामर ढाळत कुमसी गांवात आणले. तिथे काय झाले की त्रिविक्रम भारती आपल्या उपास्य दैवताचे, नरसिंहाचे ध्यान करीत होते. पण भगवंतांच्या मायेने आज त्यांचे मन कांही स्थिर होईना. वास्तविक पहाता त्यांचा ध्यानाचा चांगला अभ्यास होता पण आज मात्र त्यांचे मन चंचल झाले. मग ते प्रार्थना करु लागले. प्रथम त्यांना ध्यानांत असे दिसले की दत्तप्रभू गांवातल्या नदी तीरावर आलेले आहेत. त्यांच्या चित्ताला अत्यंत ताप होऊन अचिंत्य लीला करणाऱ्या महाराजांना प्रत्यक्ष पहाण्यासाठी ते आले. महाराजांनी आपल्या योगमायेने त्रिविक्रम भारतींचे मन आवृत्त केल्यामुळे त्यांना ते सर्व सैन्य, राजा, महाराज सगळेच संन्यासी दिसू लागले. ते आश्चर्य चकित होऊन पाहू लागल्यावर महाराज त्यांना म्हणाले, ''तूं ज्याचा धिक्कार केलास तोच मी दांभिक संन्यासी. दांभिक कोणाला म्हणायचे हे तुझ्याकडून समजावून घेण्यासाठी मी मुद्दाम आलो आहे. तुझ्यावर नरसिंहांचा प्रसाद आहे. त्यांना स्मरुन सांग.''

त्रिविक्रम भारतींचा क्षणार्धात गर्व हरण झाला आणि शरण येऊन ते महाराजांना म्हणाले, ''मी आपल्याला शरण आलेलो आहे. माझ्या अपराधांची आपण क्षमा करा. आपणच साक्षात् नरसिंह आहात. आपण माझा उद्धार करा. माझे कांही पुण्य उदयाला आले म्हणून मला आपले दर्शन झाले.''



अशी शरणागती पत्करल्यावर ते दृष्य नाहीसे होऊन महाराज वगैरे सर्व मूळ रुपात दिसू लागले. मग महाराजांनी त्यांना उपदेश केला, ''मीच तेवढा कर्माचरण करणारा दंडी संन्यासी आहे दुसरे कोणी आचारधर्माचे पालन करीत नाही असे समजू नका. तुम्हाला काय माहिती आहे, इतर कोण काय अनुष्ठान करतात ते? कोणाची निंदाही नको आणि स्तुतीही नको. सर्व ईश्वराचे स्वरुप आहे हे लक्षात घ्या. जे कर्म कराल त्यातच गुंतून पडू नका. लोक संग्रहाकरता ज्ञान होईपर्यंत निष्काम कर्माचरण करायचे.''

असा उपदेश व मार्गदर्शन करुन क्षणार्धात सैन्य, राजा वगैरे सर्वांना घेऊन महाराज योगगतीने गाणगापूरला परत आले.

○○○

## अध्याय २५

एक ब्रह्मद्वेषी क्रूर यवन राजा होता. आपल्या सभेमध्ये विप्रांना बोलावून अर्थासहित वेदपठण करायला सांगायचा आणि नंतर वैदिक धर्मावर कठोर टीका करायचा. लोभी, द्रव्यलंपट ब्राह्मण राजाकडे जायचे. एकदा त्या यवनाने त्याच्या आश्रितांना त्यांच्याशी वादविवाद करु शकतील असे विद्वान ब्राह्मण घेऊन यायला सांगितले. त्यांच्यातल्या दोघांनी असे सांगितले, 'आमच्याशी वादविवाद करतील असे कोणीच नाही.' राजाने त्यांचा सत्कार केला. आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी ते वादविवाद करुन गांवोगांवच्या लोकांना जिंकून त्यांच्याकडून जयपत्र लिहून घेण्यासाठी बाहेर पडले. ब्राह्मणांचा आपसातच वाद सुरु झाल्याचे पाहून राजाला आनंद झाला. ते दोघे उत्तम वक्ते असल्याने त्यांच्यासमोर कोणी टिकू शकत नसे. ते प्रसंगी आक्रमक पवित्रा घेत, खोटेही बोलत. हे सर्व पाहून जे खरे ज्ञानी होते ते त्यांच्याशी वाद घालणे टाळू लागले. त्यामुळे त्या दोघांना आपला एकतर्फी जय झाला असे वाटू लागले. असे फिरता फिरता ते त्रिविक्रम भारतींकडे त्यांची कीर्ती ऐकून जयपत्र लिहून घेण्यासाठी आले. त्रिविक्रम भारती म्हणाले, ''तुम्ही वेदज्ञ आहात, मी नाही. दुसरे असे की माझ्या सारख्या संन्याशाला जय पराजय दोन्ही सारखेच आहेत.'' तरी ते आपला हट्ट सोडेनात. ते म्हणू लागले, ''तुम्हाला वाद विवाद करायचा नसला तर जयपत्र तरी लिहून द्या.'' त्रिविक्रम भारतींनी विचार करुन त्यांना सांगितले, ''आपण आमच्या गुरुमहाराजांच्याकडे जाऊ, तिथे मी तुम्हाला जयपत्र लिहून देतो.''

गाणगापूरमध्ये ते सगळे आले. त्रिविक्रमभारतींनी महाराजांची पुष्कळ स्तुती करुन येण्याचे कारण सांगितले. महाराजांनी त्या दोघा उन्मत्तांना विचारले, ''संन्याशाला जिंकून तुम्हाला काय मिळणार आहे?''

तेव्हा त्या दोघांनी महाराजांना खोटेच सांगितले, ''आम्ही राजाच्या आज्ञेने इथे आलो आहोत. तुमचा हा शिष्य आम्हाला इथे घेऊन आला. तुम्हा संन्याशांना वेदाचे काय ज्ञान असणार।''

महाराजांनी त्यांना पुष्कळ समजावले, ''तुम्ही किती गर्व करताहात, गर्वामुळे बाण, रावण, कौरवासारखे गेले मग तुमची काय कथा! तुम्ही हे काय आरंभले आहे? वेद अनादि अनंत आहेत, ते संपूर्णपणे कोणीही जाणू शकत नाही.''

○ ○ ○



## अध्याय २६

महाराज पुढे सांगताहेत, ''पूर्व युगात उदंड आयुष्य असताना संपूर्ण वेदज्ञान प्राप्त करणे ऋषीमुनींना कठीण होते मग कलीयुगात अल्पायुषी मानवांची काय कथा? पूर्वी भारद्वाज ऋषी सर्व वेदांचे ज्ञान करुन घेण्याच्या उद्देशाने ब्रह्मचर्याश्रमात तप करु लागले. तेव्हा ब्रह्मदेवांनी त्यांना अत्यंत तेजस्वी अशा वेदांच्या तीन राशी दाखवल्या. भारद्वाजांना भीती वाटली इतके सगळे आपल्याला कसे घेता येतील. मग ब्रह्मदेवांनी आपल्या तीन मुठी भरुन वेद त्यांना दिले. त्या भारद्वाजांचा अभ्यास अजून पूर्ण झालेला नाही. व्यासांजवळ वैशंपायन, जैमिनी, सुमंतू आणि पैल या चार शिष्यांनी ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद या चार वेदांचा अभ्यास केला. त्या काळात काही वेदांचा अभ्यास ऋषींनी केला. कलीयुगात आयुष्य कमी असल्याने एखाद्या शाखेचे अध्ययन करतात.''

आणि महाराजांनी त्या दोघांना थोडक्यात वेदांचे वर्णन सांगितले आणि जयपत्राचा आग्रह कसा निरर्थक आहे हे पटवून दिले तरी ते ऐकायला तयार नाहीत.

○ ○ ○

# अध्याय २७

मग महाराज म्हणाले, ''एवढे असूनही तुम्हाला ऐकायचे नसेल तर तुमची इच्छा पूर्ण करु.''

लांबून एक अंत्यजाला जाताना पाहून महाराजांनी त्याला जवळ बोलावले. त्याच्या डोक्यावर जो भारा होता त्यातले एक लाकूड घेऊन त्यांनी जमिनीवर सात रेषा काढल्या. त्याला एकेक रेघ ओलांडून येण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्याने केल्यावर त्याला आपल्या पूर्व जन्माचे स्मरण झाले. पहिली रेघ ओलांडल्यावर तो म्हणाला, ''मी मातंग आहे. दुसरी ओलांडल्यावर म्हणाला, मी किरात जातीतील आहे. तिसरी ओलांडल्यावर त्याने आपले नाव गांगेय आहे असे सांगितले. चौथी ओलांडल्यावर आपण शूद्र असल्याचे त्याने सांगितले. सहावी ओलांडल्यावर, मी सोमदत्त नांवाचा वैश्य आहे, असे त्याने सांगितले. सातवी रेषा ओलांडल्यावर, मी वेदशास्त्र संपन्न ब्राह्मण आहे,'' असे त्याने सांगितले.

महाराजांनी त्याच्यावर मंत्रित भस्म टाकून या उन्मत्त ब्राह्मणांबरोबर वादविवाद करुन त्यांचा पराजय करायला सांगितले.

महाराजांचे ते शब्द ऐकताच तो अंत्यज संस्कृतमध्येच बोलू लागला. ते पाहून त्या ब्राह्मणांची बुद्धीच भ्रष्ट झाली आणि ते थरथरा कांपत महाराजांना शरण आले. आम्ही पापी आहोत आमचा उद्धार करा, अशी त्यांनी प्रार्थना केली.

पण महाराज म्हणाले, ''यवनांसमोर तुम्ही वेद पठण केलेत, चांगल्या विप्रांचा अपमान केलात तुम्ही राक्षस व्हाल. बारा वर्षानंतर तुम्हाला एक ब्राह्मण भेटेल. तो वेदपठण करीत असताना त्याला काही मंत्रांची विस्मृती होईल त्याची तुम्ही त्याला आठवण करुन दिलीत की राक्षस जन्मातून तुम्ही मुक्त व्हाल.''

पुढे महाराजांच्या शब्दांप्रमाणे घडून आले.

इकडे त्या अंत्यजाने महाराजांना विचारले, ''मी विप्रकुळातला असून माझा असा अध:पात कां झाला ?''

तेव्हा महाराजांनी त्याला ते समजावून सांगितले.

○○○



# अध्याय २८

महाराज त्या अंत्यजाला सांगू लागले, ''यंत्राप्रमाणे पुण्यपाप कर्माने फिरणारा आणि प्रकृतीच्या अधीन ज्याचे कर्म आहे अशा जीवाला त्याच्या कर्माप्रमाणे ऊर्ध्व अथवा अधोगती प्राप्त होते. गुरु, मातापिता, पत्नी, मूल, धर्माचार, कुलाचार, ईश्वर यांना अकारण सोडतो आणि जो जीवाची हिंसा करतो, असत्यप्रिय आहे, कन्या, अश्व, गायींची विक्री करतो, घरामध्ये, गावामध्ये, वनामध्ये आग लावतो, अतिथींचा त्याग करतो, विप्र, देवतीर्थ, वेदशास्त्राची निंदा करतो, विहीरी, तळी यांचा नाश करतो, एकादशीच्या दिवशी भोजन करतो, श्राद्धाच्या दिवशी स्त्रीसंग करतो, दांभिक, कुसंग, स्त्रीसंग करणारा, जारण मारण करणारा, ज्ञान नसताना वैद्यकी करणार मृत्यू नंतर नरकात जाऊन चांडाळ योनीत जातो.''

त्यानंतर महाराजांनी त्याला ब्राह्मणाचे अपराध कोणते व त्यांची फले कोणती हे समजावले.

मग त्रिविक्रम भारतींनी महाराजांना विचारले, ''जीवाने केलेले पाप कसे जाते ?'' महाराज म्हणाले, ''पश्चात्ताप आणि प्रायश्चित्ताने शुद्धी होते. सभेमध्ये आपल्या पापाचा उच्चार करुन ब्रह्मदंड घेतल्याने पापक्षय होतो. एखादा प्रायश्चित्त घ्यायला अशक्त असेल तर त्याने गोदान करावे. अल्प पाप, तीर्थ क्षेत्रात दहा वेळा स्नान केल्याने जाते. किंवा दोनशे वेळा प्राणायाम करावा. सुवर्णदानाने किंवा गुरुंच्या दर्शनाने महापापांचा नाश होतो. कायकृच्छ आहे, ग्रायत्रीकृच्छ आहे. किंवा हवन आहे. प्राजपत्यकृच्छ आहे. उपवास करावा, तीर्थाटन करावे, चांद्रायण व्रत करावे. पंचगव्यानेही अल्प अपराधांची शुद्धी होते. नुसत प्रायश्चित्त करुन उपयोग नाही. त्याच्या जोडीला भक्ती हवी. प्रायश्चित्त घेणारा हरीभक्त नसेल तर त्याची शुद्धी होत नाही.''

महाराज त्याला म्हणाले, ''पूर्वीच्या जन्मात तू मातापित्याचा त्याग केलास म्हणून तुला हा अंत्यजाचा जन्म प्राप्त झाला. इथे संगमात तू महिनाभर स्नान केलेस तर पुढच्या जन्मात तू मुक्त होशील.''

पण तो ऐकेना. तो म्हणाला, ''पुढचा जन्म कशाला? मला पवित्र करा आणि आत्ताच ब्राह्मणांच्यात सामावून घ्या.''

महाराजांनी त्याला समजावले, ''तुझा देह पतित म्हणून वाढलेला आहे, तो अशुची आहे, त्यावर कोणतेच संस्कार झालेले नाहीत. विश्वामित्राने तपोबल मिळवून ब्रह्मर्षी पद मिळवण्यासाठी देवांकडे याचना केली. देवांनी त्याला वसिष्ठांकडून ते घेण्यास सांगितले पण वसिष्ठांनी ते दिले नाही तेव्हा त्याने वसिष्ठांची शंभर मुलं मारली. शेवटी तो वसिष्ठांनाचा मारायला निघाला. पण त्याच वेळी त्याच्या मनांत विचार आला की आपण जर यांना मारले तर आपल्याला ब्रह्मर्षी कोण म्हणेल? पुढे त्याने उग्र तप करुन आपले क्षत्रिय शरीर दग्ध केले आणि नवीन देह धारण केल्यावर वसिष्ठांनी त्याला ब्रह्मर्षी म्हटले.''

तरी तो अंत्यज आपला हेका सोडेना. त्याने विचारले, ''एकदा परीसामुळे लोखंडाचे सोने झाले की पुन्हा सोन्याचे लोखंड होते का? तसेच माझे झाले आहे. मी आता ब्राह्मण झालो आहे.''

त्याची बायका मुले आली तर तो त्यांना, मला शिवू नका, दूर रहा, असे सांगू लागला. म्हणजे त्याला विप्रभ्रांती झाली. महाराजांनी त्याचे ते सगळे पांडित्य ऐकले आणि आपल्या शिष्यांना एका लोभी ब्राह्मणाला बोलावून त्याच्या हाती त्या अंत्यजाला लगेच स्नान घालायला सांगितले. स्नान घातल्यावर त्याचे ते सगळे ज्ञान गेले आणि आपल्या बायकोमुलांबरोबर तो निघून गेला.

त्रिविक्रम भारतींनी महाराजांना विचारले, ''तो एवढा पतित असून केवळ आपण कृपा दृष्टीने त्याला ज्ञान दिलेत आणि नुसते स्नान घालताच ते ज्ञान नाहीसे कसे झाले?''

○○○



## अध्याय २९

महाराज म्हणाले, ''त्याच्या अंगावर आम्ही जे भस्म टाकले त्यामुळे त्याला ज्ञान प्राप्ती झाली. भस्म धुतल्यावर ते ज्ञान गेले. या भस्माचा काय महिमा आहे ते ऐक.'' एकदा वामदेव नांवाचे महामुनी वनातून जात असताना एक ब्रह्मराक्षस त्यांना खाण्यासाठी आला. पण वामदेवांच्या शरीराचा स्पर्श होताच तो शांत झाला. आपल्या पूर्व पंचवीस जन्मांचे त्याला ज्ञान झाले. तो सांगू लागला, ''मी मोठा राजा होतो, निरनिराळ्या जातीतील अनेक स्त्रियांचा मी भोग घेतला. मग शत्रुंनी माझे राज्य ताब्यात घेतले. मृत्युनंतर मी पिशाच्च झालो. पुढे वाघ, कुत्रा, लांडगा, डुक्कर वगैरे जन्म मला मिळाले आणि या जन्मात मी राक्षस झालो. या योनीत माझी भूक शांतच होत नाही. पण तुम्हाला स्पर्श होताच मी एकदम शांत कसा झालो?''

वामदेव त्याला म्हणाले, ''हा सर्व भस्माचा महिमा आहे. माझ्या शरीरावरील भस्माचा तुला स्पर्श झाल्याबरोबर तुला पूर्व जन्मांचे स्मरण झाले. एकदा जारकर्मी माणसाला जारकर्म करताना मृत्यू आला. स्मशानात फिरून आलेला एक कुत्रा त्याच्या प्रेतावर बसला. त्या कुत्र्याच्या अंगाचे भस्म त्या प्रेताला लागले. त्याला नेण्यासाठी यमदूत आल्यावर केवळ त्याच्या अंगाला भस्म होते म्हणून शिवदूतही आले आणि त्याला शिवलोकाला घेऊन गेले.''

तेव्हा त्या राक्षसाने वामदेवांना भस्मधारणविधी समजावून सांगण्यास सांगितले.

वामदेव म्हणाले, ''हाच प्रश्न एकदा सनत्कुमारांनी शंकरांना विचारला होता. त्यांनी विचारले, मुक्तीची इतर साधने दुष्कर आहेत आम्हाला एखादा सोपा उपाय सांगा. त्या वेळी शंकर म्हणाले, यथाविधी भस्मधारण करणारा सर्व सुख प्राप्त करुन जीवनमुक्त होतो. भस्म अग्निहोत्रातून, यज्ञकुंडातून घ्यावे. त्याने त्रिपुंड्र काढावेत. हे त्रिपुंड्र म्हणजे ब्रह्मा, विष्णु व शिवाचे प्रतीक आहेत. त्याचप्रमाणे विश्व, तैजस व प्राज्ञ ही आत्मस्वरुपे आहेत. इच्छा, द्रव्य आणि क्रिया या शक्ती आहेत. भूः, भुवः व स्वः या तीन लोकांचे प्रतीक आहे. ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद हे तीन वेद आहेत.

प्रात:काळ, मध्यान्ह काळ व सायंकाळ असे तीन काळ आहेत. या सर्वांचे त्रिपुंड्र धारण करताना अनायासे स्मरण होते.''

असे वामदेवांनी राक्षसाला सांगितले. त्यानेही विधिवत् भस्म धारण केले. त्याचे ते राक्षस शरीर पडले. दिव्य शरीर त्याला प्राप्त झाले आणि शिवदूतांनी आणलेल्या विमानात बसून तो शिवलोकाला गेला.

ooo



# अध्याय ३०

श्रीदत्तात्रेयांच्या वास्तव्याने पवित्र झालेल्या माहूर गांवात गोपीनाथ नांवाचा एक ब्राह्मण राहत होता. त्याची मुले जगत नसत. पुढे दत्तात्रेयांच्या वराने त्याला एक मुलगा झाला आणि तो वाचला. योग्य वयात गोपीनाथाने आपल्या मुलाचे मोठ्या आनंदाने लग्न लावले. त्याला पत्नीही मोठी सुंदर व अनुरुप आणि पतिव्रता मिळाली. ती सतत पतिसेवेत रत असायची. त्यांचा सुंदर संसार पाहून गोपीनाथाला आनंद होत असे. पण अचानक काही दुर्दैव उद्भवले आणि त्या मुलाला क्षय रोग झाला. त्याचे शरीर कृश झाले. तो काही खात नाही म्हणून त्याच्या पत्नीनेही अन्न वर्ज्य केले. गोपीनाथाला तिचे हे कष्ट व मुलाचे भोग पाहून त्यांचा विवाह केल्याचा पश्चात्ताप झाला. त्या मुलालाही आपण उगीचच आपल्या पत्नीचे आयुष्य फुकट घालवले असे वाटू लागले. त्याने पत्नीला सांगितले, ''हे भोग भोगण्यापेक्षा माहेरी जा आणि सुखात राहा.'' पतीचे हे शब्द ऐकून तिला अतिशय वाईट वाटले. ती म्हणाली, ''मी तुमची अर्धांगिनी आहे. जिथे तुम्ही तिथे मी. काही झाले तरी मी तुम्हाला सोडून कुठे जाणार नाही.''

तिला ज्ञानी ब्राह्मणांनी सांगितले की तिने आपल्या पतीला गाणगापूरला घेऊन जावे. तिथे दत्तात्रेयांच्या कृपेने काही गुण आला तर येईल. त्याप्रमाणे सासूसासऱ्यांची परवानगी घेऊन आपल्या पतीला घेऊन ती गाणगापूरला आली. महाराज कुठे आहेत असे विचारल्यावर तिला सांगितले ते संगमावर आहेत. प्रथम त्यांचे दर्शन घेण्यासाठी संगमावर जायचे तिने ठरवले. महाराजांच्यावर तिचा पूर्ण विश्वास आहे. त्यांच्या दर्शनाने आपल्या पतीचे प्राण वाचणार आहेत अशी खात्री आहे. पण परत तिचे दुर्दैव आड आले. गाणगापुरमध्ये पोहोचल्यावर लगेचच तिच्या पतीला मृत्यू आला. ते पाहून ती स्त्री आत्महत्या करायला उद्युक्त झाली. पण तिचे लहान वय लक्षात घेऊन गावातल्या लोकांनी तिला तसे न करण्यास सांगितले. आपल्या पतीचे गुण आठवून ती फार आक्रोश करुन शीर आपटून घेऊ लागली. माझ्यावर भगवान शंकर रागावले का ? माझ्या सौभाग्याला कोणी हिरावून घेतले ? असे तिला वाटू लागले. ज्या प्रमाणे

शरण आलेल्या गायीची यवन हत्या करतो किंवा आपण मोठ्या विश्वासाने मंदिरात जावे आणि त्या मंदिराची भिंतच पडून मृत्यू यावा तसे झाले आपले असे तिला वाटू लागले. इतक्या लांबून मोठ्या विश्वासाने आपण गाणगापूरला आलो पण ज्या देवाला आपण शरण आलो त्याने आपले रक्षण केले नाही. त्याला आपली कीव आली नाही या विचाराने तिला अतिशय दु:ख झाले.

आणि तिचा असा विलाप पाहून दीनांचा मायबाप दत्तप्रभू रुप पालटून एका तपस्वी वेषात तिथे आला. दत्तप्रभुंनी तिची समजून काढायचा प्रयत्न केला. ते म्हणाले, ''कशासाठी तू शोक करतेस? मायेमुळे जीव काही काळापुरते एकत्र येतात आणि नंतर त्यांचा वियोग होणे अटळ असते. आणि तू कसली म्हणतेस पती गेला? देव जिथे काळाच्या अधीन आहेत तिथे मनुष्याचा काय पाड? तसा जर विचार करायला गेले तर कोण जन्मला आणि कोण गेला? हे सगळे देहाशी संबंधीत विचार आहेत. पंचमहाभूतांपासून जो उत्पन्न झाला तो देह जाणारच आहे. आणि त्या देहालाच तू पती समजते आहेस. त्या देहाच्या आधाराने राहणारा आत्मा मात्र अमर आहे. तो निर्विकार आहे, असंग आहे, तो ईश्वराचा अंश असल्याने सर्वत्र भरून राहिलेला आहे. त्यामुळे तो येतही नाही आणि जातही नाही. नदीत काही काळ दोन ओंडके प्रवाहामुळे एकत्र येतात. काही काळ एकत्र वहात जातात. पुढे अलग होऊन कुठे जातात कळत नाही. तसे जीव काही कर्म बंधनामुळे काही काळापुरते एकत्र येतात आणि तो ऋणानुबंध संपला की निघून जातात. आपल्या कर्माप्रमाणे आपल्याला देह मिळत असतो. हे सर्व कार्य अविद्येने झालेले आहे. या शरीराकरता शोक करु नकोस. नीट विचार कर आणि चांगले धर्माचरण करुन संसार सागर तरुन जाण्याचे साधन तू कर. महत्प्रयासाने मिळालेला मनुष्य जन्म फुकट घालवू नकोस.''

महाराजांचा हा सगळा उपदेश ऐकल्यावर तिचे दु:ख थोडे कमी झाले. मग स्वत:ला सावरून तिने महाराजांना विचारले, "आपण मला उपदेश केलात परंतु असे दु:ख किती जन्म भोगावे लागणार? या दु:खसागरातून आपण माझा उद्धार करा. आपणच माझे सर्वस्व आहात. आपणच मला मार्गदर्शन करा."

○○○



# अध्याय ३१

त्यावेळी महाराजांनी तिला उपदेश केला. पतिव्रता धर्म सांगताना त्यांनी लोपामुद्रेची कथा सांगितली. एकदा नारद मुनी विंध्य पर्वतावर गेले असता त्यांनी त्याची स्तुती करताना त्याला म्हटले, "तुझ्याकडे सर्व समृद्धी आहे पण एकच उणीव म्हणजे तुझी उंची इतर पर्वतांच्या मानाने अगदीच कमी आहे." हे ऐकल्यावर विंध्य पर्वताला राग आला आणि त्याने आपली उंची वाढवायला सुरुवात केली. तो इतका वाढला की पृथ्वीवर सर्वत्र अंध:कार पसरला. लोकांना स्नानसंध्या करता येईना. ब्रह्मदेवांच्या आज्ञेने सर्व देव हे संकट दूर करण्यासाठी अगस्ती मुनींच्याकडे गेले. कारण विंध्य पर्वत अगस्तींचा शिष्य होता. सर्व जण अगस्ती ऋषींच्या आश्रमात आले. तिथे अगस्तींची पत्नी लोपामुद्रा होती. तिने त्यावेळी या सर्वांना पतिव्रतेचे धर्म समजावले.

पतीबद्दल पत्नीच्या मनात इतके प्रेम हवे की तिने छायेप्रमाणे पतीबरोबर राहून त्याची सर्व प्रकारे सेवा केली पाहिजे. तिने पती उठण्यापूर्वीच उठून स्नान केले पाहिजे. ती पतीपूर्वी कधी जेवत नाही किंवा त्याच्यासमोर ती बसतही नाही. त्याच्या आज्ञेशिवाय ती घराबाहेर जात नाही. जे काही संसारात मिळत असेल त्यातच संतुष्ट असते. जे आपल्याकडे नाही त्या दागिन्यांसारख्या गोष्टींबद्दल दु:ख करत बसत नाही. आपली कधी श्रीमंतांशी तुलना करीत नाही. आळसामुळे आचारधर्म ती सोडत नाही. सासूसासरे व इतर वडीलधाऱ्या मंडळींच्या आज्ञेत राहते. उगीचच आपल्या बुद्धीने व्रत वैकल्ये करीत बसत नाही. पतीलाच परमेश्वर, गुरु वगैरे समजून त्यांच्याशी वाद घालत नाही. ज्या पतीशी भांडतात त्यांना कुत्रीचा जन्म येतो. ज्या पतीपूर्वी भोजन करतात त्यांना वटवाघूळाचा जन्म येऊन स्वत:चीच विष्ठा, मूत्र खायची वेळ येते. जर पती गेला त्याचबरोबर ती सती जाते, वैधव्यात राहात नाही.

○○○

# अध्याय ३२

लोपामुद्रेने पुढे सांगितले, ''पती गेला असता पत्नीने सती जाऊन त्याच्याबरोबर पतीलोकाला जावे. असे केल्याने अनेक यज्ञांचे फल तिला मिळते. किंवा विधवाधर्माचे पालन करून सुख प्राप्त करावे. जर पतीच्या मृत्यू समयी ती गर्भवती असेल किंवा पतीचे शव मिळाले तरी तर मात्र तिने सती जाऊ नये. मुलांचे पोषण करावे. वैधव्य काळात ज्या बायका केस ठेवतील त्यांना व त्यांच्या पतीलाही दुर्गती प्राप्त होते. म्हणून पती गेला तर केशवपन करावे. तसेच तिने खाटेवर शयन करू नये. जमीनीवर निजावे. एक भुक्त राहावे. अलंकार घालू नये. तांबूल सेवन करु नये. शुभ्र वस्त्र नेसावे. मंगल स्नान वर्ज्य करावे. शक्य असेल तर चांद्रायण व्रत करावे. विधवेला सांगितलेली इतर व्रते करावीत.

जी स्त्री अशी वागेल तिला सहगमन केल्याचे फळ मिळून उत्तम गती मिळेल.''

हे सर्व महाराजांच्या मुखातून ऐकल्यावर त्या स्त्रीने विचार केला 'आपण तरुण आहोत, आपल्याला विधवा म्हणून जगणे कितपत शक्य होईल सांगता येत नाही. त्या पेक्षा आपण पतीबरोबर सहगमन केलेले बरे.' तिने तसे जेव्हा त्या योग्यांना सांगितले तेव्हा ते म्हणाले, "अवश्य सहगमन कर. पण तत्पूर्वी इथे ज्यांच्या दर्शनाला आली आहेस त्यांचे दर्शन मात्र घे. मी हे रुद्राक्ष देतो ते तुझ्या पतीच्या कानावर ठेव, त्याला हे भस्म लाव." असे सांगून ते योगी निघून गेले. मग त्या साध्वीने शास्त्रोक्त पद्धतीने दानधर्म वगैरे केला. गावातल्या लोकांनी तिच्या पतीच्या देहाला अग्नीसंस्कार करायची तयारी केली आणि ती स्वत: महाराजांच्या दर्शनाला संगमावर येण्यासाठी निघाली. जाताना वाटेत तिला योग्यांनी केलेल्या उपदेशाचे स्मरण होत होते. ब्राह्मणांनी तिला लवकर दर्शन घेऊन येण्यास सांगितले. जाता जाता महाराजांचे ती स्तवन करीत होती. तिच्या मनाची ही तयारी पाहून सर्वांना मोठे कौतुक वाटत होते. ज्याप्रमाणे पहाटे पक्ष्यांची किलबिल चालू असते तसे हे लोक तिच्या या धैर्याची चर्चा करीत होते.

महाराजांना पाहताच तिने साष्टांग नमस्कार घातला. महाराजांनी तिला, "पंच पुत्रा सौभाग्यवती भव" असा आशीर्वाद दिला. हे ऐकल्यावर बाकीचे लोक हंसू लागले. त्यांनी महाराजांना सर्व वृत्तांत सांगितला. तो ऐकल्यावर महाराजांनी तिच्या पतीचे शव त्यांच्या समोर आणण्यास सांगितले. ते शव आणल्यावर महाराजांनी ती तिरडी सोडायला सांगितले. इकडे महाराजांनी ब्राह्मण मंडळींना रुद्रपठण करण्याची आज्ञा केली आणि त्या तीर्थाने त्याचे ते शव आणल्यावर त्याच्यावर ते तीर्थ प्रोक्षण केले महाराजांनी आपल्या अमृत दृष्टीने पाहिले मात्र आणि जणु काय झोपलेला माणूस जागा व्हावा तसा तो मृत झालेला मनुष्य उठून बसला. नग्न म्हणून तो लाजला. सर्वांना अतिशय आनंद झाला. त्या साध्वीचा आनंद तर गगनांत मावेना. जसा एखाद्या निष्कांचन माणसाला सुवर्णाने भरलेला घट मिळावा तसे झाले. मग त्या दोघांनी महाराजांची पूजा करून पुष्कळ स्तुती केली. तिचे प्रारब्धकर्म जरी प्रबल असले तरी महाराजांच्या कृपेने तो दोष जाऊन ज्याप्रमाणे परीसाचा स्पर्श होताच लोखंडाचे सुवर्ण होते तसे झाले. त्या दोघांना उत्तम गती मिळाली.

दुसऱ्या दिवशी तिथल्या एका धूर्त माणसाने कुत्सित बुद्धीने महाराजांना विचारले, "महाराज, पुष्कळ दिवस रोगाने पिडीत होऊन याला महामृत्यु आलेला आहे. हा काही अपमृत्यु नाही. मृत्यू तर कोणाला टाळता येत नाही मग हा कसा जिवंत झाला?"

"ब्रह्मलिखित खोटे कसे ठरले?" वास्तविक या माणसाने गाणगापूरातच राहात असल्याने महाराजांच्या कृपेचे अनेक चमत्कार पाहिले होते.

सर्वांच्या बुद्धीला प्रेरणा करणारे श्रीगुरु म्हणाले, ''ब्रह्मदेवांचे बरोबर आहे. ब्रह्मदेवाने याचे या जन्मात आयुष्य तीस वर्ष ठरवले होते व पुढच्या जन्मात शंभर वर्ष. आम्ही ब्रह्मदेवांना एवढेच म्हटले की पुढच्या जन्मातले काही आयुष्य याला या जन्मात द्या. बस्. म्हणजे ब्रह्मदेवांच्या लेखाप्रमाणे झाले की नाही!''

सर्व लोकांनी महाराजांचा जयजयकार केला. दंपतीने संगमात स्नान करुन महाराजांची पूजा केली व मग महाराज मठात परत आले.

○○○

## अध्याय ३३

दुसऱ्या दिवशी ते दोघे महाराजांच्या परत दर्शनाला येऊन म्हणाले, "महाराज, मला एका पुरुषाने उपदेश केला, रुद्राक्ष आणि भस्म दिले. पतिव्रता धर्म सांगितला आणि इच्छा असल्यास सहगमन करुन उत्तम गती प्राप्त करुन घेण्यास सुचविले. तीर्थाचा व रुद्राक्षाचा काय महिमा आहे तो आपण आम्हाला सांगा."

महाराज हंसून म्हणाले, "तुला पती निधनाचे अतिशय दु:ख झाले होते म्हणून तुझ्या मनाचे समाधान करण्यासाठी मीच वेष बदलून आलो होतो. तुझे पतीबद्दलचे प्रेम पाहिले. तुला सहगमन करायला सांगितले तेही तू मान्य केलेस. तुझ्या भावाची मी परीक्षा घेतली. नंतर रुद्राक्ष मीच तुला दिले आणि रुद्रतीर्थ प्रोक्षण करुन याचे प्राण वाचवले."

नंतर महाराजांनी रुद्राक्ष महिमा सांगायला सुरुवात केली. काश्मीर देशाचा राजपुत्र व प्रधानपुत्र दोघे चांगले मित्र होते. पूर्व संचितानुसार त्यांना रुद्राक्ष धारण करण्याची आवड होती. इतर अलंकार आवडत नसत. एकदा पराशर ऋषी राजाकडे आले असता राजाने त्यांना विचारले, "हे दोघे राजघराण्यातले असूनही अलंकार न घालता रुद्राक्ष का घालून बसतात?"

याचे उत्तर देताना पराशर ऋषींनी या दोन्ही मुलांच्या पूर्व जन्माची कथा सांगितली. महत्त्व कशाला आहे? अलंकारांना की रुद्राक्षांना? व्यवहारात ज्याला महत्त्व आहे त्यालाच आपण महत्त्व देतो. एका गावात एक शिवभक्त वेश्या राहात होती. तिला धर्माचे चांगले ज्ञान होते. तिच्या नृत्य मंडपात तिने एक मर्कट व एक कुक्कुट पाळला होता. त्या दोघांच्या गळ्यात तिने रुद्राक्ष बांधले होते. एकदा भगवान शंकर तिची परीक्षा घेण्यासाठी वेष पालटून आले. त्यांनी आपल्याबरोबर एक मोठे तेजस्वी लिंग आणले होते. ती वेश्या शिवभक्त असल्याने तिच्या मनात ते लिंग मिळवण्याची इच्छा झाली. त्यासाठी हवे तेवढे धन द्यायची तयारी दाखवली. एवढेच काय पण वाटल्यास तीन दिवस त्यांची पत्नी म्हणूनही राहायची तयारी दाखवली.



शंकरांनी ते एका अटीवर मान्य केले. ते म्हणाले, ''जर त्या लिंगाचा नाश झाला तर मी प्राणत्याग करीन.'' त्या वेश्येने हे मान्य केले आणि शंकराबरोबर ती आपल्या अंत:पुरात गेली. इकडे त्या मंडपाला अचानक आग लागली आणि त्यात ते मर्कट, कुक्कुट व शिवलिंग जळून गेले. ते पाहून आधी सांगितल्याप्रमाणे शंकरांनी त्या अग्नीत उडी टाकली.

आपल्या पतीचा नाश झालेला पाहून ती वेश्याही सहगमन करण्यास निघाली. तिला सर्वांनी समजावले, 'पतिव्रता हा काही तुझा धर्म नाही. कुठला कोण वैश्य आणि कोण पती! असा अविचाराने आत्मघात करु नकोस.' पण ती ऐकेना आणि तिने पुष्कळ दानधर्म करून त्या अग्नीत उडी टाकली. पण असा चमत्कार घडला की भगवान शंकर तिथे प्रगट झाले आणि तिला वरचेवर झेलले. ते म्हणाले, "तुझी परीक्षा पहाण्यासाठी मी आलो होतो. हा अग्नी, शिवलिंग वगैरे मी मायेनेच निर्माण केले होते. वेश्या असूनही तू सहगमन करायला तयार झालीस त्यामुळे मला अतिशय संतोष झाला आहे तुला काय हवा तो वर माग."

तिने तिला आपल्या दासदासी, आप्तेष्टांसह कैलास पर्वतावर शंकराच्या सान्निध्यात राहाता यावे असा वर मागितला व शंकरांनी 'तथास्तु' म्हटले.

तेव्हा राजा, हे दोघे म्हणजे पूर्व जन्मातले तिच्या दरबारातले मर्कट व कुक्कुट आहेत. तेव्हापासून यांना रुद्राक्ष धारण करण्याची आवड आहे.

○○○

# अध्याय ३४

राजाने हे सर्व ऐकून विचारले, "हे सर्व ठीक पण यांचे भविष्य काय ? यांचे पुढील आयुष्य कसे जाणार ? हे राज्य करणार की नाही ?"

तेव्हा पराशर ऋषी म्हणाले, "यांचे भविष्य ऐकून तुला वाईट वाटेल."

तरीही राजाने ते सांगण्याचा आग्रह केल्यावर पराशर म्हणाले, "यांना आजपासून सातव्या दिवशी मृत्यू येणार आहे."

राजाला अतिशय दु:ख झाले. त्याने हा मृत्यूयोग टाळण्याचा उपाय विचारल्यावर ऋषींनी सांगितले. "हा अपमृत्यू टाळण्यासाठी तू सात दिवस अखंड रुद्राभिषेक कर आणि त्याचे तीर्थ या मुलांना दे म्हणजे याचे आयुष्य वर्धन होईल. भगवान शंकर हे मृत्युंजय आहेत. जगत् सृष्ट्याने जगाचे संवर्धन होण्याकरता धर्म व अधर्म निर्माण केले. त्यापैकी धर्माचा स्वामी म्हणजे इंद्र व अधर्माचा स्वामी म्हणजे यम होय. जे भगवंताला शरण गेले आहेत त्यांना यमदूत काही करु शकत नाहीत.'' ब्रह्मदेवाच्या दक्षिण मुखातून रुद्राध्याय निर्माण झाला आहे. त्याच्या पठणामुळे सर्वही पातकांचा नाश होतो. जेव्हा सर्वच रुद्राध्याय पठण करु लागले तेव्हा सर्वांचीच पापे नाहीशी होऊ लागली. यमाला लोकांना यमलोकाला नेता येईना. नरक ओस पडायची वेळ आली. ही सर्व स्थिती यमाने ब्रह्मदेवांना जाऊन सांगितली. तेव्हा ब्रह्मदेवांनी सांगितले, ''निजल्या निजल्या, उभ्याने, चालताना, भक्ती नसताना जे रुद्रपठण करतील किंवा ज्यांची इतर पातकेही पुष्कळ आहेत त्यांना तू घेऊन जा. पण जे भक्तीने यथाविधी पठण करणारे आहेत त्यांना मात्र तूं नेऊ शकणार नाहीस."

सातव्या दिवशी ते दोघे मूर्च्छित पडले पण ऋषींच्या सांगण्याप्रमाणे राजाने श्रद्धाभक्तीने यथाविधी रुद्राभिषेक करुन ते तीर्थ या दोघांना दिल्यामुळे शिवदूत तिथे प्रगट होऊन त्यांनी यमदूतांना पिटाळून लावले. मग हे दोघे सावध होऊन सर्वांना आनंद झाला. इतक्यात नारद तिथे आले. ते म्हणाले, जेव्हा शिवदूतांनी यमदूतांना परत



पाठवल्यावर यमधर्म चित्रगुप्ताकडे गेले आणि विचारले. तेव्हा चित्रगुप्ताने सांगितले, जरी या दोघांचे नियत आयुष्य बारा वर्ष असले तरी जर रुद्राभिषेक झाला तर मात्र यांना दहा हजार वर्ष आयुष्य आहे. त्याप्रमाणे सर्व घडले आहे.

याप्रमाणे महाराजांनी त्या स्त्रीला रुद्राक्षाचा महिमा सांगितला.

○○○

# अध्याय ३५

त्या स्त्रीने महाराजांना त्यांचे स्मरण राहावे म्हणून मंत्रोपदेश करण्याची प्रार्थना केली तेव्हा तिला महाराज म्हणाले, ''स्त्रिया शास्त्राप्रमाणे मंत्रोपदेशाला पात्र नाहीत. त्यांना त्याऐवजी पतिसेवा सांगितली आहे. त्या संबंधातली कथा अवश्य ऐक असे म्हणून महाराजांनी तिला ती कथा सांगायला सुरुवात केली. एकदा दैव दैत्यांचे युद्ध झाले. दैत्यांचे गुरु शुक्राचार्य मेलेल्या दैत्यांना संजीवनी मंत्राच्या सहाय्याने पुन्हा जिवंत करु लागले त्यामुळे देवांचा पराभव होऊ लागला. मंत्रशक्ती अचिंत्य आहे. इंद्राने हे शंकरांना सांगितल्यावर त्यांनी शुक्राचार्यांना गिळून टाकले पण ते शंकराच्या मूत्रद्वारे बाहेर पडले आणि पुन्हा दैत्यांना वाचवू लागले. तेव्हा देवगुरु बृहस्पतींनी इंद्राला सांगितले की जर संजीवनी मंत्र षट्कर्णी झाला तरच त्याचे तेज कमी होईल. तेव्हा तो षट्कर्णी होण्याची व्यवस्था कर. इंद्राने आपल्या मुलाला कचाला तो संजीवनी मंत्र शिकून घेण्याकरता शुक्राचार्यांकडे पाठवले. कच शुक्राचार्यांकडे गेला आणि म्हणाला, "हे गुरुमहाराज, मी आपला शिष्य आहे. मी नम्रपणे आपल्याला शरण आलेलो आहे. आपण माझे संरक्षण करा. मी शत्रू-पक्षाचा आहे वगैरे समजू नका."

शुक्राचार्यांची मुलगी देवयानी कचाच्या सौंदर्याने मोहित झाली आणि तिने आपल्या पित्याला कचाला शिष्य म्हणून स्वीकारण्यास सांगितले. ते ऐकून शुक्राचार्यांच्या मनात कचाबद्दल प्रेम उत्पन्न झाले आणि त्यांनी कचाचा शिष्य म्हणून स्वीकार केला. कचाने सर्वतोपरी सेवाभाव धरुन शुक्राचार्यांना संतुष्ट केले. पण कचाचे हे कपट इतर दैत्यांच्या लक्षात आले आणि कच एकदा समीधा आणण्याकरता वनात गेला असता त्यांनी कचाला ठार मारले. तो घरी परतला नाही म्हणून देवयानीने शुक्राचार्यांना, 'कच का अजून परत आला नाही असे विचारले.' तेव्हा शुक्राचार्यांनी ध्यानाने सर्व जाणून मृत कचाला पुन्हा जिवंत करुन घरी आणले. कचाला पाहून देवयानीला आनंद झाला. दैत्यांनी पुन्हा एक दिवस त्याला ठार मारले आणि त्याचे मांस तुकडे करुन पशुंना खायला दिले. कच न दिसल्यामुळे देवयानीने पुन्हा पित्याची पहिल्याप्रमाणे प्रार्थना केली. शुक्राचार्यांनी आपल्या मंत्र सामर्थ्याने पुन्हा त्याला जिवंत केले.



आता मात्र दैत्यांनी त्याला मारुन जाळला आणि त्याची राख शुक्राचार्यांना मद्यातून पाजली. दैत्यांवरच्या प्रेमामुळे सावधानता न बाळगून शुक्राचार्यांनीसुद्धा ते मद्य पिऊन टाकले. परत देवयानीला दु:ख झाले. शुक्राचार्यांनी ध्यानाने सर्व जाणले आणि ब्रह्महत्या केल्याबद्दल दैत्यांना शाप दिला. देवयानीला सांगितले की आता तो त्यांच्या पोटातच असल्यामुळे त्याला जिवंत करता येणे शक्य नाही. त्याला जिवंत केले तर माझा मृत्यू होईल. माझ्या शिवाय तो दिव्य मंत्र कोणीच जाणत नाही. पण देवयानीने आग्रह की, ''तो मंत्र मला सांगा आणि तुम्ही त्याला जिवंत करा. यात जरी तुमचा मृत्यू झाला तरी मी मंत्र सामर्थ्याने तुम्हाला जिवंत करीन. तुम्ही माझे ऐकले नाहीत तर मी प्राणत्याग करीन.'' तिच्यावरच्या प्रेमामुळे शुक्राचार्यांनी तो दिव्य मंत्र तिला दिला. शुक्राचार्यांनी कचाला जिवंत करताच त्यांना स्वत:ला मृत्यू आला व त्यांना देवयानीने मंत्र सामर्थ्याने जिवंत केले. त्यामुळे मंत्राचे सर्व सामर्थ्य नष्ट झाले. कचाचे काम झाले. तो शुक्राचार्यांना म्हणाला, "माझ्यामुळे तुम्हाला वारंवार त्रास होतो, हे दैत्य काही मला जिवंत ठेवत नाहीत तेव्हा आपण मला घरी जायची अनुमती द्या."

पण देवयानी म्हणाली, "तुझ्याशी लग्न करण्याच्या इच्छेने मी तुला तीन वेळा जिवंत केले तेव्हा तू माझ्याशी विवाह कर." कच म्हणाला, "गुरुकन्या ही बहीण आहे आणि माझा प्राण तू मला परत मिळवून दिल्याने तू माझी माता झाली आहेस. त्यामुळे मी तुझ्याबरोबर विवाह करु शकत नाही. तेव्हा हा विपरीत आग्रह तू सोडून दे."

हे ऐकल्यावर देवयानीने त्याला शाप दिला, "तू मिळवलेली विद्या विसरुन जाशील." त्यानेही तिला शाप दिला, "तुझा क्षत्रियाशी विवाह होईल. तुझ्या मुर्खपणामुळे तुझे मंत्र ज्ञान नष्ट होईल. तो मंत्र तेजहीन झाला आहे." शुक्राचार्यांचेही तेज लोप पावले. स्त्रियांना मंत्र देऊ नये, असे सांगून श्रीगुरु पुढे म्हणाले, एखादे व्रत करावे.

त्या सीमंतिनीने प्रार्थना केली, "महाराज, जर स्त्रियांनी मंत्र घेऊ नये असे आहे तर कल्याणकारी आणि आपले स्मरण करुन देणारे असे एखादे व्रत सांगा मला." श्रीगुरु म्हणाले, "हे साध्वी, सोमवार व्रत हे सुलभ आणि तारक आहे. सर्व व्रतात उत्तम असे व्रत आहे. ते आपल्याला चांगले स्थान प्राप्त करुन देते. हे व्रत

कोणीही करु शकतो. सीमंतिनीने या व्रताच्या प्रभावाने नाहीसा झालेला पतीसुद्धा परत मिळवला. ती कथा ऐका."

आर्यावर्तामध्ये इंद्रिय निग्रह केलेला, बुद्धीमान्, शूर राजा होता. ईश्वराच्या सेवेने सुलक्षणी पत्नी त्याला मिळाली. ज्योतिषांनी सांगितले, शांती, शीलवान वगैरे गुणांनी युक्त अशी ती स्त्री आपल्या पतीसह दहा हजार वर्षे राज्य भोग घेईल. त्यातल्या एकाने सांगितले, 'हिला बालपणी वैधव्य येईल.' राजा प्रथम आनंदी झाला होता पण हे ऐकून खिन्न झाला. पुढे शुक्लपक्षातल्या चंद्राप्रमाणे ती वाढू लागली. बाराव्या वर्षी पुढे आपल्याला वैधव्य येणार आहे हे ऐकून दु:खी झाली. एकदा ऋषीपत्नी मैत्रेयी त्यांच्याकडे आली असता आपल्याला बालपणीच वैधव्य येऊ नये म्हणून काय करावे, असे तिने मैत्रेयीला विचारले. मैत्रेयीने तिला सांगितले, "तू जर सोमवार व्रत केलेस तर शंकर तुझे रक्षण करतील. प्रत्येक सोमवारी मन, इंद्रिये आणि शरीराने शंकराची सेवा कर. सोमवारी क्षणभर देखील निजू नये. दिवसा उपोषण करुन रात्री भोजन करावे. असे केल्याने कोणतेही संकट येणार नाही. व्रत जर सोडले तर शंकर रागावतील. शंकरांना अभिषेक केला म्हणजे पापक्षय होतो." असे सोमवार व्रताचे माहात्म्य सांगून मैत्रेयी गेली.

या मुलीचे पुढे काय व्हायचे असेल ते होईल आपण हिचा विवाह करुन टाकावा असे ठरवून नळ गोत्रातील चंद्रांगद राजाला त्याने आपली कन्या दिली. तो जावई पुढे एकदा कालिंदी नदीत क्रीडा करीत असताना बुडाला. हे वृत्त त्याच्या सेवकांनी राजाला येऊन सांगितले. राजा नदीवर आला पण पुष्कळ प्रयत्न करुनही राजपुत्राचा शोध लागला नाही. सर्वजण दु:खी झाले. राजकन्येने पतीप्रमाणेच जलसमाधी घ्यायचे ठरवले परंतु ब्राह्मणांनी तिला समजावले की तुझ्या पतीचे प्रेत मिळालेले नाही तेव्हा तू असे करु नकोस. चित्रवर्म राजाने तिच्या मनाची समजूत काढली आणि तो तिला आपल्या राजधानीत घेऊन आला.

तिला जरी पती वियोगाचे दु:ख झाले तरी ती मैत्रेयीने सांगितलेले सोमवार व्रत करु लागली. त्यां इंद्रसेन राजाला त्याच्या शत्रुंनी पकडून कारागृहात ठेवले. इकडे चंद्रांगदाला पाण्यात बुडाल्यावर नाग स्त्रियांनी त्यांच्या राजाकडे आणले. राजाने



त्याला अमृत पाजून जिवंत केले. ते अलौकिक नगर, ते नाग लोक पाहून चंद्रांगद आश्चर्यचकित झाला.

नागराज वासुकीने चंद्रांगदाला विचारले, ''तू कोण, कोणाचा भक्त आहेस ?'' चंद्रांगदाने सांगितले, सत् कीर्तीमान नल राजाच्या वंशात जन्मलेल्या इंद्रसेनाचा मी मुलगा आहे. माझे नाव चंद्रांगद आहे. चित्रवर्मा राजाचा मी जावई आहे. कालिंदी नदीत बुडालो असता मला इथे कोणी आणले मला समजले नाही. दैवयोगाने आपले दर्शन झाल्यामुळे माझे जन्म, कर्म सफल झाले. सृष्ट्यादिकांना कारण असलेला सर्वेश्वर चिन्मय परमात्मा, कैलास पर्वतावर मूर्तीमान असणारा शंभू आमचे कुलदैवत आहे.

वासुकी म्हणाला, तू पवित्र झालास या नगरात मानवांना दुर्लभ अशा सुखाचा उपभोग घे. हे नगर अमृत आणि कल्पवृक्षांनी परिपूर्ण आहे. या नगरात रोगराई नाही, शोक नाही, भीती नाही, निद्रा नाही, अशा या नगरात तू राहा. चंद्रांगद म्हणाला, मी नदीत बुडून मेलो असे समजून माझ्या मात्यापित्यांना अनावर शोक होऊन ते मृत्यूही पावतील. याच वर्षी माझा विवाह झालेला आहे. त्यामुळे माझ्या वियोगाने शोकार्त होऊन माझ्या वधुलाही मृत्यू येईल.

हे ऐकल्यावर वासुकीने सांगितले, असं असेल तर जा. आणि त्याला नाना रत्नालंकार व मनोवेगाने जाणारे दोन घोडे दिले. सोबतीला आपला मुलगा बरोबर दिला. हे सगळे घेऊन चंद्रांगद तिथून निघाला आणि कालिंदी नदीच्या तीरावर प्रगट झाला. तो सोमवारचा दिवस होता. निस्तेज झालेली सीमंतिनी आपल्या सखींसह कालिंदीच्या किनाऱ्यावर आली होती. तिला पाहून चंद्रांगदाने विचारले, ''तू कोणाची कन्या आहेस ? इतकी शोकार्त का झाली आहेस ?'' सीमंतिनीने आपल्या मैत्रिणींना आपला सगळा वृत्तांत कथन करण्यास सांगितला. त्यांनी सांगितले, ही चंद्रांगदाची पत्नी आहे. चित्रवर्मा राजाची मुलगी आहे. तिचा पती नाहीसा झाल्यामुळे दु:खी होऊन सोमवार व्रत करते व स्नान करण्यासाठी इथे आली आहे. हिच्या सासुसासऱ्यांना तुरुंगात ठेवून त्यांचा शत्रु राज्य करतो आहे. सर्व पीडा जावी म्हणून ही सोमवार व्रत करते आहे.

चंद्रांगदाला पाहून सीमंतिनी गोंधळली. तिला वाटले हा तर आपल्या पतीप्रमाणे वाटतोय पण पती कसा परत येईल ? मग पतीचे रुप घेऊन एखादा धूर्त, यक्ष वगैरे तर नाही ना आला. तिला दुःख झाले. चंद्रांगदाने तिला सांगितले, तुझा पती तुझ्या पुण्याईने तीन दिवसांनी परत येईल आणि तो आपल्या नगराला निघून गेला. मी परत आलोय असे शत्रुला कळविले. त्याच्या पित्याची शत्रुच्या कारावासातून मुक्तता केली. शत्रुचा पराभव करून राज्य परत मिळवले.

आपला नाहीसा झालेला मुलगा परत आलेला पाहून त्याच्या मातापित्यांना अत्यंत आनंद झाला. त्यांच्या डोळ्यात प्रेमाश्रू आले. चंद्रांगदाने त्यांना सर्व वृत्तांत सांगितला. प्रजेलाही आनंद झाला. त्यांनी सगळे नगर सजवले. त्यात चंद्रांगदाने प्रवेश केला. नंतर वासुकीच्या पुत्राचा योग्य तो आदरसत्कार करुन त्याला नागलोकाला परत पाठवला. आपल्या सासऱ्याच्या राष्ट्रात जाऊन आपल्या भार्येचाही शोक दूर केला. वासुकीने दिलेली बहुमोल रत्ने, अलंकार सीमंतिनीला दिली आणि पुढे पुष्कळ काळ इंद्राप्रमाणे राज्याचा उपभोग घेतला. हा व्रताचा प्रभाव आहे. तेव्हा तू हे व्रत कर, असे श्रीगुरुंनी त्या सावित्रीला सांगितले. त्याप्रमाणे तिने व्रत केले. दरवर्षी येऊन श्रीगुरुंचे दर्शन घेतले आणि त्यांच्या कृपेने व त्या व्रत प्रभावाने सावित्रीला सर्व सुखं मिळाली.

○○○



# अध्याय ३६

सिद्ध म्हणाले, ''विष्णू म्हणजे व्यापक. अशा सद्गुरुंच्या विषयी तू जागृत आहेस. ऐकणाऱ्याची सुद्धा तृप्ती होत नाही. तुझ्यावर श्रीमत् भगवंतांचा, हरीचा प्रसाद आहे.'' एका ब्राह्मणाने प्रतिग्रहाने परान्न घेणे सोडले आहे. दैवाने मिळेल त्याचा उपभोग घेत असे. तो शांत, सत्यवादी, अनासक्त होता. त्याची स्त्री राक्षसी प्रवृत्तीची होती. सगळे लोक आपापल्या स्त्रियांसह दुसऱ्यांच्या घरांमध्ये पक्वान्न भोजन करुन उत्तम वस्त्र धन प्राप्त करुन घेतात. त्याची स्त्री आपल्या पतीची निंदा करु लागली. एका धनिकाने पतीसह तिला भोजनाला बोलावले. काम, क्रोध, लोभ रहित अशा त्या पतीने, तिला जेवायला येत नाही असे सांगितले. मग तिने हे श्रीगुरु महाराजांना जाऊन सांगितले, “मी दीन आहे, माझ्याकडे धड वस्त्रही नाहीत, पतीसह तो धनिक मला जेवायला बोलावतो आहे. पती यायला तयार नाही. त्याला आपण माझ्याबरोबर त्या धनिकाकडे यायला सांगा.” त्या स्त्रीच्या इच्छेप्रमाणे जेव्हा दत्तप्रभुंनी त्या ब्राह्मणाला जेवायला सांगितले तेव्हा तो म्हणाला, तो परान्न घेत नाही. पण महाराजांची आज्ञा असेल तर तो जायला तयार आहे. त्याप्रमाणे तो जेवायला गेला. पण प्रत्यक्ष जेवायला बसल्यावर त्या स्त्रीला असे दृष्य दिसले की कुत्री आणि डुकरे त्यांच्या पंगतीत येऊन पानातले अन्न खात आहेत. हे पाहून त्या स्त्रीचे अन्नावरील मन उडाले. खिन्न होऊन ते दोघे महाराजांच्याकडे आले.

महाराजांनी तिला विचारले, “परान्न खायचे सुख तुला मिळाले का ?” ती म्हणाली, “महाराज माझ्या पतीचा माझ्यामुळे नियम मोडला. माझ्यामुळे त्यांना त्रास झाला. आपण मला क्षमा करा.” महाराज म्हणाले, “तुझ्या अज्ञानाने पतीचा विनयभंग झाला. यापुढे तू पतीची आज्ञा कधी मोडू नकोस.” त्या ब्राह्मणाने विचारले, “महाराज, या दुष्ट पत्नीने माझा परान्न न घ्यायचा नियम मोडला. मी यापूर्वी कधीही परान्न घेतले नव्हते. हे माझे पाप कशाने जाईल ?” महाराजांनी सांगितले, “ह्या परान्न सेवनाचा तुला दोष लागणार नाही. आपल्या स्त्रीचे चित्त कधी दुश्चित्त करु नये. आता यापुढे ती कधीही परान्नाची इच्छा करणार नाही. आणि तूही या पुढे कुठे जाऊ नकोस.”

यावर या ब्राह्मणाने महाराजांना विचारले “कोणाकडे अन्न घ्यावे व कोणाकडे

घेऊ नये हे आपण मला समजावून सांगा."

महाराजांनी त्याला सांगितले, "एखाद्या शास्त्रीय कर्मासाठी ब्राह्मणच मिळाला नाही म्हणून जर ते कर्म बंद पडण्याची वेळ आली तर आपण अवश्य जावे. उलट अशा वेळी भोजनाला न गेल्याने कर्मलोप होण्याचा दोष येईल. उदाहरणार्थ श्राद्धादि कर्माला ब्राह्मण मिळाला नाही म्हणून ते श्राद्धच राहात असेल तर मात्र अवश्य भोजनास जावे. इतर वेळी केवळ पक्वान्न मिळते आहे या रसासक्तीने जर भोजन केले तर दोष येईल पण कर्मलोप टाळण्याच्या उद्देशाने जेवण केले तर तो दोष नाही."

सदाचारी वैदिक ब्राह्मण, श्वशुर, स्वजन, आपले आजोबा वगैरेंच्या घरी भोजन केले तर दोष लागत नाही.

आचारहीन, स्वधर्म सोडलेला, संकटग्रस्त, कृपण, लोभी, अशौच असलेला, आपल्या गुरुजनांना दु:ख देणारा, अशा माणसाचे अन्न घेऊ नये.

सतत परान्न सेवन केले तर सेवन करणाऱ्याचे सगळे पुण्य अन्नदात्याला जाते. आणि त्याचे पाप परान्न सेवन करणाऱ्याकडे येते. त्याचप्रमाणे आमंत्रणाशिवाय जाऊन परान्न सेवन करणाऱ्याचे पुण्य यजमानाला जाते आणि यजमानाचे पाप ह्याला लागते. अमावास्येच्या दिवशी परान्न घेतले असता सगळ्या महिन्याचे पुण्य अन्नदात्याला जाते. विवाहित कन्येला मुलगा झाल्यानंतरच तिच्याकडे अन्न घ्यावे.

सज्जनांकडून दान घेण्यास हरकत नाही. तीर्थक्षेत्री किंवा ग्रहणाच्या वेळेस दान घेऊ नये. ते दान अति निंद्य समजले जाते. उदाहरणार्थ - महादान, तुलादान वगैरे यज्ञ करुन शिल्लक राहिलेले अन्न घ्यायला हरकत नाही. आपत्काली दान घेतले तर जपाने त्याचा परिहार होतो, दोष दूर होतो.

आपत्ती आणि अनापत्तीमध्ये योग्य आचार ठेवणाऱ्याला रोग, दारिद्र, ऋण यांच्यापासून कधीच पीडा होत नाही. याउलट स्वाचार सोडणारे लोक इह आणि परलोकात दु:ख भोगतात. आचार हाच आद्य धर्म आहे. श्रुती, स्मृती आणि पुराण या तिन्ही प्रमाणांनी सांगितलेल्या आचारधर्माचे पालन करणे मनुष्याला हितावह आणि सुख देणारे आहे. कर्माचरणाने श्रेष्ठत्व प्राप्त होऊन नंतर ज्ञान आणि शेवटी मोक्ष प्राप्ती



होते. देश, कालोचित अशा आचार धर्माचे नेहमी पालन करावे. त्रैलाक्य स्थापन करणाऱ्या ब्रह्मदेवांनी सुद्धा लौकिक आचाराप्रमाणे वागावे. मनाने सुद्धा त्याचे उल्लंघन करु नये. पंचमहायज्ञादि नित्यकर्मे कधीही सोडू नयेत.

ज्यांच्या मनांत पुष्कळ इच्छा आहेत त्यांनी काम्य कर्मे करावी. पण ज्ञानी महात्मे कशाचीच इच्छा न करता शास्त्राने सांगितलेली कर्मे करीत असतात. ब्रह्मीभूत जे ज्ञानी महात्मे आहेत त्यांच्या व्यतिरिक्त इतर सर्वांनी नित्य नैमित्तिक कर्म कधी सोडू नयेत. वैराग्यसंपन्न महात्मे काम्यकर्म करायची इच्छाच करणार नाहीत आणि त्यांना त्याची आवश्यकताही नाही. बुद्धीपूर्वक आणि दु:संगाने ज्याने कर्मत्याग केला आहे तो प्रायश्चित्त घेऊन शुद्ध होतो.

यजन, याजन म्हणजे पौरोहित्य करणे. अध्ययन आणि अध्यापन करणे. अध्यापन, याजन आणि प्रतिग्रह हे उपजीविकेकरता आहेत. ब्राह्मणांनी स्नान, संध्या, जप, होम, वगैरे सगळे आचरण करुन याजन, अध्ययन, अध्यापन करावे. तीन क्रिया सांगितल्या आहेत. वैदिक क्रिया, तांत्रिक क्रिया किंवा वैदिक-तांत्रिक क्रिया, क्रिया किंवा अशी मिश्र क्रिया करावी.

जानवे जर खाली पडले असले, तुटलेले असेल तर ते टाकून यथाविधी नवीन यज्ञोपवित ग्रहण करावे. किंवा चार महिने झाल्यावर नवीन यज्ञोपवित धारण करावे. ते धारण करताना ब्रह्मा, विष्णू आणि महेश्वर यांना नमन करावे. आपेहिष्ठा... या मंत्राने मार्जन करुन गायत्री जपाने प्रोक्षण करावे.

अग्नि, मंत्र, दर्भ, आसन आणि द्विज हे एक कर्म झाल्यावर विसर्जित करावेत. तेच दुसऱ्या कर्मासाठी वापरु नयेत.

ऋषी, छंद आणि देवता यांचे ज्ञान करुन घेऊन जप करावा.

रात्रीचा शेवटचा प्रहर म्हणजे ब्राह्म मुहूर्त. त्या ब्राह्म मुहूर्तावर उठावे. करदर्शन, भूमी पूजनाचा श्लोक म्हणून प्रात:स्मरण करावे. नैऋत्य दिशेला वर्जित स्थळ सोडून शौचास जावे. आल्यावर मृत्तिकेने हात धुवावेत. चूळा भराव्यात. दात घासावेत. प्रात:स्नान पाणी आणि गोमयाने करावे. मध्यान्ह स्नान मृत्तिकेने करावे. संन्यासी आणि

ब्रह्मचारी यांनी त्रिकाल स्नान करावे. सुवासिनी स्त्रियांनी रोज मस्तकावर पाणी घेऊन स्नान करु नये. गृहस्थांनी घरी स्नान करताना आपल्यापेक्षा वयाने लहान असलेल्या व्यक्तीला नमस्कार करु नये. पण जर ती वयाने लहान असलेली व्यक्ती ज्ञानाने थोर असली तर नमस्कार करायला हरकत नाही. अशौच असलेल्या व्यक्तीला नमस्कार करु नये. त्याचप्रमाणे आपल्याला अशौच आल्यावरही कोणाला नमस्कार करु नये. जे यज्ञ यागादि कर्म करताहेत त्यांना नमस्कार करु नये. विवाहानंतर स्मार्ताग्नि घ्यावा. गृहयसूत्रात सांगितल्याप्रमाणे होम करावा. पंचमहायज्ञ नित्य करावेत. काही तरी दान नेहमी करावे. अमूक एकच दान द्यायला पाहिजे असे नाही. एखादे फल किंवा साधी सुपारीही चालते. नित्य कर्म झाल्यावर विष्णूचे स्मरण करावे म्हणजे आपल्या कर्मातील न्यूनता दूर होते.

○○○



# अध्याय ३७

देवाचे सान्निध्य ३ कारणांनी होते.

१. भक्ताच्या तपयोगाने, अर्चकाच्या तपामुळे - २. उत्तम प्रकारे अर्चन केले तर आणि - ३. मूर्ती अथवा प्रतिमा सुंदर असली तर.

पूजेला देवाच्या समोर बसावे. उजव्या हाताला पाण्याचा कलश ठेवावा. थोडे पाणी शंखात घेऊन पूजा स्थानात सर्वत्र शिंपडावे. आपल्या अंगावर तसेच पूजा सामग्रीवरही प्रोक्षण करावे. यामुळे भूशुद्धी आणि भूतशुद्धी होते. त्यानंतर न्यास करावे - समंत्रक. कर, अंघ्रि, नाभि, हृदय, ग्रीवी, द्रोहो, मुखाक्षी हे, पुरुष-सूक्त मंत्राने न्यास करावेत. न्यास केल्यामुळे अर्चक देव होतो, असे म्हणतात. पाद्य, अर्घ्य, आचमनीय हे तीन आपण त्या त्या वेळेस पळीने घालतो. पण ह्या त्रि पात्रात अगोदर पाणी घालून ठेवावे. पाद्याकरता एक पत्र असावे. अर्घ्याचे पात्र प्रसिद्ध आहे आणि आचमनाकरता एका भांड्यात पाणी घ्यावे, असे वस्तुत: आहे. नंतर ती प्रतिमा देवरुपच आहे असे समजून अर्चन करावे. सध्या मंत्र आणि तंत्र अशी संमिश्र पूजा आहे. सोळा मंत्रांनी सोळा उपचार भक्तीने अर्पण करायचे. स्त्री, शूद्र वगैरेंनी पौराणिक मंत्रांनी पूजा करावी. जर शक्य असेल तर स्नान झाल्यावर पंचामृत द्यावे. गंध अर्पण केल्यानंतर निरनिराळे अलंकार, भोग वगैरे द्यावे. आसनाकरता चतुर्विध अन्न द्यावे. आरंभाला घंटानाद करावा, स्नानाच्या वेळेस करावा, धूपदीप अर्पण करताना घंटानाद करावा. स्नान केल्यावर आचमन द्यावे. नैवेद्य दाखवल्यावर आणि वस्त्र अर्पण केल्यावर ही आचमन द्यावे. स्नानाच्या वेळेस शिवलिंग सोडून इतर देवांना शंखजल घातले तरी चालेल. महादेवांना मात्र घालायचे नाही. आपल्या घरातल्या बागेतून आणलेले पुष्प हे उत्तम. अरण्यातले मध्यम आणि विकत घेऊन आणलेले हे अधम. निळे, लाल आणि शिळे फूल पूजेला वर्ज्य. तसेच सच्छिद्र व किड्यांनी खाल्लेले फूलही वर्ज्य आहे. आपोआप झाडावरुन गळून पडलेली फूले घेऊ नयेत. डाव्या पायाचा किंवा डाव्या हाताचा स्पर्श फुलाला झाल्यास पाण्यात भिजवून घ्यावीत. कोभिदार, अर्क, धत्तु: कूटजै: ही फुले विष्णूंना वाहायची नाहीत. देवीला दुर्वा वाहायच्या नाहीत. शंकरांना

लाल फुले, केवडा, बिल्व आणि श्वेत पुष्पे प्रिय आहेत. गणेशांना दुर्वा तर विष्णुंना तुळस प्रिय आहे. श्रद्धेने केलेल्या पूजेने देव संतुष्ट होतो.

पूजेमध्येच पुरुष सूक्ताने हवन करावे. प्रत्येक ऋचेने फूल अर्पण करावीत आणि प्रार्थना करावी. नंतर यथाशक्ती गुरु मंत्राचा जप करावा. ब्राह्मणेतरांनी नाम संकीर्तन, श्रवण करावे. देवाचे चरण तीर्थ घ्यावे. ते प्रथम मस्तकावर धारण करावे. मग प्राशन करावे. मग अध्ययन करावे. अध्ययन, अध्यापन, तदर्थ विचार आणि प्रवचन असे चार प्रकारचे अध्ययन आहे. पुन्हा काही मंत्रांची आवृत्ती करायची. त्याच्या अर्थाचा विचार करावा आणि प्रवचनाद्वारा स्पष्टीकरण करायचे. आपल्या वर्णाप्रमाणे उपजीविकेचे साधन सांगितले असेल त्याप्रमाणे उपजीविका करून आपल्या पोष्य वर्गाचे पोषण करावे. पोष्य वर्ग म्हणजे अग्नी, धेनू, अतिथी, पितर, पुत्र आणि भार्या.

नंतर मध्यान्ह संध्या, ब्रह्मयज्ञ करताना डाव्या मांडीवर उजवा पाय ठेवावा. हातामध्ये कुश आणि पाणी घेऊन डाव्या मांडीवर ठेवायचा. पाणी न घेता दर्भ घेऊनही ब्रह्मयज्ञ करता येतो. ओंकार आणि व्याहृतीसह गायत्रीजप करावा. नंतर सांगवेदाचे पठण करावे. नंतर तर्पण करावे. अक्षता घेऊन देव आणि ऋषी यांच्या नावे तर्पण करावे. - आपल्या गृह्यसूत्रात सांगितल्याप्रमाणे.

कर्म म्हणजे संध्यावंदन. अशौचामध्ये संध्या, अग्नि उपासना वगैरे सोडून मानसिक कर्म करावे. यम, अग्नी आणि पितृ-भरणीस कृत्तिका, मघा नक्षत्र, प्रतिपदा, षष्ठी, एकादशी, रविवार, आपली जन्मतिथी, घरात मंगलकार्य असेल त्या वेळेला तसेच विवाह झाल्यावर वर्षभर तिलतर्पण करु नये. श्राद्ध वगैरे सोडून इतर वेळेला मात्र तिलतर्पण करावे. उपनयन झाल्यावर सहा महिने तिलाने तर्पण करावे. नरक चतुर्दशीच्या दिवशी यमतर्पण करावे. यमतर्पण आणि भीष्मतर्पण जीवत्पिता असला तरी करायला हरकत नाही. अमा, युग, क्रांती - संक्रांत - वैधृति, व्यतिपात, महालय, अष्टका, अनष्टका, उर्वेद्य अशी शहाण्णव श्राद्ध आहेत आणि नैमित्तिक श्राद्ध म्हणजे गया वगैरे क्षेत्री गेल्यावर करायची श्राद्धे.

पुत्राला पुत्रत्व तीन कारणांनी येते. जिवंत असेपर्यंत त्यांची आज्ञा मान्य



करणे, श्राद्धाच्या वेळेस भूमी भोजन देणे आणि गयेला पिंडदान करणे, ही पुत्राची तीन कर्म आहेत. देवयज्ञ, भूतयज्ञ असे वैश्वदेवामध्ये तीन यज्ञ असतात. अग्नीमध्ये आहुती टाकून देवयज्ञ होतो. बली आहुतींनी भूतयज्ञ होतो आणि पितरांना आहुती देऊन पितृयज्ञ होतो. स्वाध्यायामध्ये ब्रह्मयज्ञ केला जातो. मनुष्य यज्ञ धरुन पंचमहायज्ञ होतात. जाते, उखळ, घागर आणि झाडणे यांच्या पांच हिंसा होतात. या हिंसामुळे जीवाला स्वर्ग प्राप्ती होत नाही. त्यांचा परिहार व्हावा आणि आपल्यावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून वैश्वदेव करावा. भूतांसाठी घराच्या बाहेर बलीचे घास काढून ठेवावेत. कोणाही अतिथीला ईश्वर समजून यथाशक्ती अन्न द्यावे. यतीला भिक्षा देताना प्रथम अंबु द्यायचे नंतर भिक्षा घालायची, परत अंबु द्यायचे. अतिथीला अन्न थोडे दिले तरी अग्नीप्रमाणे असते तर थोडे जल दिले तरी सिंधुप्रमाणे असते. वैश्वदेवाच्या अग्निकुंडासमोर दिलेले बलीचे घास उचलून बाहेर नेल्याशिवाय जेवू नये. ते बलीचे घास आपण स्वत:च्या हाताने काढू नये. घरातल्या कोणाला तरी काढून बाहेर नेऊन ठेवण्यास सांगावे. हे सर्व झाल्यावर आपल्या पोष्यवर्गासह भोजन करावे.

आता भोजन विधी सांगितला आहे. गायत्री मंत्राने अन्नावर प्रोक्षण करावे. हात, पाय आणि अस्य हे आर्द्र असावेत. उजव्या हाताला चित्राहुती द्याव्यात. 'अहं वैश्वानरोभूत्वा' या मंत्राचे स्मरण करावे. आपोशन घ्यावे. प्राणमंत्राने भोजनाला सुरुवात करावी. हे सर्व मंत्र शास्त्रात सांगितले आहे. एकादशीच्या दिवशी दोन वेळेस तर रविवार, अमावस्या वगैरे दिवशी रात्री जेवू नये. चतुर्दशी व अष्टमीच्या दिवशी दिवसा जेवू नये. प्राणाहुती घेतल्यानंतर पात्र धरावे आणि मौन धरावे. शेवटपर्यंत धरले तरी हरकत नाही.

आता भोजनाला पात्र कोणते असावे हे सांगताहेत. सुवर्ण, ताम्र, पत्रावळ वगैरे जेवण्यास घ्यावे. भूमीवर मंडल करुन त्यावर भोजन पात्र ठेवावे. विधवा, ब्रह्मचारी आणि संन्यासी यांनी तैजस पात्रात जेवावे. वल्ली, पलाश, पत्र, अर्क या पात्रात जेवण करु नये. जेवताना पाय पसरुन जेवू नये. बालकाला घेऊन जेवू नये. विवाहाशिवाय वधुला घेऊन जेवू नये. विवाहाच्या वेळेस ते बरोबर असले तरी चालतात. दुर्जनांच्या पंगतीला बसून जेवू नये. अपरिचिताबरोबर भोजनाचा प्रसंग आलाच तर आपल्या आणि त्यांच्या मध्ये पाणी शिंपडून पंगती भेद करावा. पाकगृहामध्ये

जेवू नये म्हणतात. तसेच अग्नीगृहात, देवघरात व असत् घरात जेवू नये. रात्र फार झाली असतानाही जेवू नये. रजस्वला स्त्रीची दृष्टी पडलेले अन्न, केस पडलेले अन्न सेवन करु नये. बांग, वाईट स्थानात पिकवलेले धान्य, भाजी वगैरे असत् अन्न असते ते घेऊ नये.

गाय, म्हैस यांचे दूध सत् म्हणजे चांगले असते. शेळी, वगैरे प्राण्यांचे दूध मात्र असत् असते. ते घेऊ नये. कांचेच्या भांड्यातून पाणी किंवा इतर द्रव पदार्थ सेवन करु नये ते सुरापानासमान आहे. तांब्याच्या भांड्यात गाईचे दूध ठेवले तरी ते अशुद्ध होते. दही आणि गूळ एकत्र घेऊ नये. केवळ मीठ वाढायचे नाही. म्हणून शेवटी वाढतात. श्वान, रजस्वला, पतितादिंचा शब्द कानावर पडल्यानंतर किंवा त्यांचे दर्शन झाल्यानंतर जेवण सोडून उठावे. तसेच पंगतही मध्ये सोडून कोणी उठला तर बाकीच्यांनी भोजन करु नये. उखळ, जाते वगैरेंचा ध्वनी ऐकल्यावर जेवू नये. तो थांबल्यावर जेवावे. आपले उच्छिष्ट ताटात सोडू नये. जेवताना प्रसन्न चित्त असावे.

संन्याशाने आठ घास भोजन करावे. वानप्रस्थाश्रमी लोकांनी सोळा, गृहस्थाश्रमी लोकांनी बत्तीस घास घ्यावे. ब्रह्मचाऱ्याने आपल्याला पाहिजेत तेवढे घास घ्यावेत.

मधुर आणि द्रव प्रथम घ्यावे. आम्ल व कठीण पदार्थ जेवणाच्या मध्ये घ्यावेत आणि द्रव आणि पित्तादि पदार्थ शेवटी घ्यावेत. सर्व अन्नातला थोडा शेष ठेवावा. खीर, तूप आणि मीठ मात्र शिल्लक ठेवू नये. ते सर्वच्या सर्व खावे किंवा हाताला चोळावे. ते सोडून बाकी सर्व शेष ठेवावे. एकादशीच्या दिवशी भोजन करायचे नाही. रविवारी, अमावास्या किंवा पौर्णिमेला रात्री जेवायचे नाही. चतुर्दशी, अष्टमीला दिवसा जेवायचे नाही. उच्छिष्ट शेष राहिलेले अन्न भूमीवर एका बाजूला ठेवायचे, (ताटाच्या बाजूला किंवा ताटात). अगोदर आपोशन घ्यायचे आणि त्या आपोशनातले राहिलेले थोडे पाणी त्या काढून ठेवलेल्या भागावर अंगठ्याने (?) सोडावे. त्यावेळी रौरवे. हा मंत्र म्हणावा. (हा मंत्र द्विसाहस्त्रीत दिला आहे). आमच्या गोत्रातल्या कोणाला अन्न मिळाले नसेल त्याला हे, अन्न मिळावे असा या मागचा संकेत आहे.

हस्त, मुख आणि पाय हे धुवून हातात पाणी घेऊन ते चोळायचे ते डोळ्यांना लावायचे म्हणजे दृष्टी चांगली राहाते. (हे मंत्रही द्विसाहस्त्रीत दिले आहेत).



तांबूल सेवन करायला सांगितले आहे. विडा तयार करण्यासाठी पाच, तीन किंवा एक पान घ्यावे. विधवा आणि संन्याशाने तांबूल भक्षण करु नये. पानाचे देठ आणि शिरा काढाव्यात.

त्यानंतर दिवसभरात जो वेळ मिळेल त्यात पुराणादिकांचे मनन करावे. जेवण झाल्यावर एक प्रहराने निजावे. दोन प्रहर झोप घ्यावी. सर्व कर्मे विष्णुना अर्पण करावीत.

सुमुहूर्तावर केलेल्या खाटेवर निजावे.

हा श्लोक म्हणून रात्री झोपावे. सकाळी, मध्यान्ह काली आणि संध्याकाळी निजू नये. भस्मावर, धान्यावर, देवालयामध्ये आणि गोठ्यामध्ये निजू नये. स्मशान, रस्ता, वारुळ किंवा भयानक प्रदेश असेल त्या ठिकाणी निजू नये. उत्तरेकडे डोके करुन निजू नये. देवगुरुंच्यापेक्षा उच्च स्तरावर निजू नये. प्रवासात पूर्वेकडे पाय करुन निजू नये.

सकाळचे किंवा दिवसाचे जर एखादे नित्यकर्म काही अडचणींमुळे राहिले असेल तर ते रात्रीच्या पहिल्या प्रहरात करावे आणि रात्रीचे कर्म मध्य रात्री १२ वा. पर्यंत करायला परवानगी नाही.

सौरजप आणि ब्रह्मयज्ञ रात्री करु नये. संकटकालामुळे एखादे दिवशी एखादे वेळेला कर्मच घडले नाही तर प्रायश्चित्त घ्यावे. कर्म वैगुण्यादिक दोष असताना म्हणजे एखादे वेळी कर्म पूर्ण झाले नाही, संक्षेपाने झाले किंवा कर्म अजिबातच झाले नाही तर यथावत् प्रायश्चित्त घ्यावे. त्याशिवाय शुद्धी नाही.

ऋतू दर्शनानंतर चार दिवसांनी शुद्ध झालेल्या पत्नीबरोबर चांगल्या नक्षत्रावर समागम करावा. पहिल्या चार रात्री, श्राद्धाच्या आधीचा आणि श्राद्धाचा दिवस, एकादशी वगैरे दिवशी समागम करु नये. जन्मतिथी, चतुर्दशी, अष्टमी, रेवती, मघा या दिवशीही करु नये. दहा वर्षानंतर मुलगी रजस्वला होऊ शकते म्हणून त्यापूर्वी तिचा विवाह करावा. ऋतु (म्हणजे शास्त्राने सांगितलेल्या दिवशी) गमन करणारा नेहमी ब्रह्मचारीच राहातो. मनामध्ये द्वेषादिक ठेवून जो समागम करणार नाही आणि ऋतो समागम

करणार नाही तो भ्रूण हत्या करणारा म्हणतात. ऋतुकालात बाहेरगांवी जाणाराही भ्रूणहत्या करणारा ठरतो. वंध्या स्त्री किंवा जिला लहान मूल आहे तेव्हा प्रवासाला जायला हरकत नाही. सोळा दिवस ऋतू असतो. असम दिवशी गमन केल्यास कन्या आणि सम दिवशी गमन केल्यास मुलगा होतो. गमन करण्याच्या वेळेस स्त्रीपुरुषांच्या राजस, तामस, सात्त्विक भावना जशा असतील त्यांच्याप्रमाणे बालकाचे चित्त तयार होते. म्हणून गमन काली शुद्ध सात्विक भावना असावी. मातापित्यांचे संरक्षण करणारा तो सत्पुत्र आणि ज्यांना पुत्र नाही त्यांचा अध:पात होतो - अज्ञानी मातापित्यांचा - हा सिद्धांत ज्ञानी माणसाला लागू नाही. पितरांना तारणारा एकच पुत्र सत्पुत्र असतो, ध्रुवादिकांप्रमाणे. धृतराष्ट्राला शंभर दुष्ट मुले झाली. त्यांच्यासारखी प्रजा वाढून उपयोग काय ?

○○○



# अध्याय ३८

या अध्यायात, भास्कर ब्राह्मणाची कथा आली आहे. गाणगापूरमध्ये असताना एकदा गुरुंना रोज एका शिष्याने भिक्षा केली. एके दिवशी भास्कर नांवाचा भक्तीमान ब्राह्मण तिथे आला. तीन माणसांना पुरेल एवढा शिधा घेऊन भास्कर गुरुंना भिक्षा देण्याच्या उद्देशाने आला. पण तीन महिने इतर कोणा कोणा भक्तांच्या भिक्षांचे दिवस लागले असल्याने या भास्करला मोकळा दिवस मिळाला नाही. पण रोज त्याला गुरु महाराजांच्या बरोबर प्रसाद भोजन मिळत असे. पण तो काही जेवण्याच्या उद्देशाने आलेला नव्हता. पण बाकीचे लोक उपहासाने म्हणू लागले की भास्कर ब्राह्मण सांगताना जरी सांगतो की तो श्रीगुरुंना भिक्षा करायला आला आहे तरी प्रत्यक्ष भिक्षा न करता फुकटचे खाऊन स्वत:चे पोषणच करतो आहे. ही गोष्ट महाराजांच्या कानावर गेली. श्रीगुरुंना भक्तीयोग सर्वांना दाखवायचा आहे. एक दिवस महाराजांनी भास्कराला सांगितले, "आज सर्व शिष्यांसहित आम्हाला भिक्षा करा." ते ऐकून भाजी, दूध, साखर वगैरे आणून तो स्वैंपाक करु लागला. त्याच दिवशी दुसरा एक श्रीमंत माणूस भिक्षा करण्यासाठी आला. त्याला दुसऱ्या दिवशी भिक्षा करण्यास सांगितले.

महाराजांनी भास्कर ब्राह्मणाला गांवातल्या सर्व माणसांना प्रसाद-भोजनाला बोलावण्यास सांगितले. भास्कराने त्याप्रमाणे गांवातील सर्वांना आमंत्रण दिले. ते लोक म्हणाले, ''तू तिघांचा शिधा आणून स्वैंपाक केला आहेस त्यातील अन्नाचा एकेक कण तरी आमच्या वाटेला येईल का ? एवढा बोलावतो आहेस तो.''

भास्कराने महाराजांना येऊन सांगितले, "ब्राह्मण माझे आमंत्रणच घेत नाहीत." आणि काय म्हणाले ते सांगितले. ही अगदी सरळ बुद्धी आहे त्याची, ऋजुता ज्याला म्हणतात. हा मोठा गुण आहे. त्या गावातल्या लोकांनी निंदा केल्याचे महाराजांना येऊन सांगितल्यावर महाराजांनी त्या लोकांना बोलावून आणले. महाराजांनी जबाबदारी घेतली. सगळ्यांना स्वत: जेवायला बोलावले. महाराजांनीच सांगितल्यामुळे ते सगळे स्वस्थ राहिले. त्यांनी जेवणाच्या पत्रावळी तयार केल्या. स्नान करुन सगळे आले. ईश्वराच्या आज्ञेने ते सिद्धान्त छाटीने झाकलं. तीर्थाने अभिमंत्रित केलं. मग इतर ब्राह्मणांबरोबर भास्कराने ते अन्न गुरुमहाराजांना अर्पण केलं. भक्त, शिष्य, द्विज,

इतरही मंडळी सहपरिवार तिथे भोजनाला आली. खीर वगैरे सहा पक्वान्नं होती. वरण, भात, भाजी वगैरे सर्व पदार्थ होते. तीन माणसांसाठी केलेला स्वैंपाक असंख्य लोकांना पुरला. त्या स्वैंपाक पात्रातून अन्न काढून नेऊन पंगतीत वाढले तरी ती पात्रं पुन्हा पूर्ववत् भरलेली असत. ते संपले नाही. कमी पडले नाही. षड्विध ऐश्वर्ययुक्त जे भगवान् आहेत त्यांची लीला आहे.

ब्राह्मण मंडळींचे आकंठ भोजन होऊन ते तृप्त झाल्यावर गावातले इतर शूद्र वगैरे मंडळींना बोलावून त्यांना भरपूर अन्न दिले. त्यांनाही अन्न कमी पडले नाही. पशूपक्षांनाही अन्न दिले. कोणीही शिल्लक नाही याची खात्री पटल्यावर महाराजांच्या आज्ञेने आपण स्वत: भोजन करुन शिल्लक राहिलेले अन्न जलचर प्राण्यांना दिले. त्यावेळी सगळे अन्न संपले.

○○○



# अध्याय ३९

सोमनाथ नावाचा ब्राह्मणाची वृद्ध वंध्या स्त्री मनोभावे महाराजांची सेवा करीत असे. एक दिवस तिला महाराजांनी तिची काय इच्छा आहे असे विचारले. ती मोठ्या कष्टाने म्हणाली, मला मूल न झाल्याने माझा जन्म व्यर्थ गेला आहे. उगीचच मी अश्वत्थाची पूजा केली. पुढच्या जन्मात तरी मुलगा व्हावा. महाराज तिला म्हणाले, ''पुढचा जन्म कोणी पाहिलाय आता तुला तुझ्या इच्छेप्रमाणे मुलगा व मुलगी होईल. आणि तू पिंपळाची निंदा करु नकोस. ब्रह्मदेवाने नारदाला पिंपळाचे महत्त्व सांगताना सांगितले आहे की सर्व देव अश्वत्थ वृक्षावर राहतात. श्रृतीस्मृतींनी त्याचे महत्त्व गाइले आहे. त्याला मंदगतीने लक्ष प्रदक्षिणा कर आणि शेवटी तीळ व सुवर्ण अश्वत्थ दान देऊन, ब्राह्मणभोजन करुन उद्यापन कर म्हणजे तुला नक्की मुलगा व मुलगी होईल.'' तेव्हा ती म्हणाली, ''महाराज मी विटाळशीच होत नाही.'' पण महाराज म्हणाले, ''तू सांगितल्याप्रमाणे अश्वत्थाची सेवा कर.'' त्याप्रमाणे तिने केल्यावर लवकरच विटाळशी झाली. पुढे तिला गर्भ धारणा होऊन शुभ दिवशी मुलगी झाली.

मोठ्या आनंदाने ती त्या मुलीला घेऊन महाराजांच्या दर्शनाला आली. या मुलीला उत्तम विद्वान पती लाभेल असा महाराजांनी तिला आशीर्वाद दिला. आणि तिला विचारले, तुझ्या पोटी शतायुषी पण मूर्ख मुलगा यावा की बुद्धीमान पण अल्पायुषी मुलगा यावा. तेव्हां ती म्हणाली. दीर्घायुषी पण मूर्ख मुलगा घेऊन मी काय करु? बुद्धीमान मुलगा व्हावा व त्याला पांच मुले व्हावीत. महाराजांनी 'तथास्तु' म्हटले. आनंदाने ती त्या मुलीला घेऊन ती घरी आली. पुढे तिला मुलगा तर झालाच पण त्या मुलालाही महाराजांच्या आशीर्वादाने पांच मुले झाली. हे पाहून सर्वांना विस्मय वाटला. त्या मुलीलाही उत्तम पती मिळून त्याची सर्वत्र कीर्ती पसरली, अशी श्रीगुरुंची दया आहे.

○○○

## अध्याय ४०

एके दिवशी एक कुष्ठी ब्राह्मण महाराजांच्याकडे येऊन म्हणाला, ''दैवयोगाने मला कुष्ठ झाल्याने माझे आप्तेष्ट वगैरे कोणी माझं तोंडसुद्धा पहात नाही. आपण याचं शमन केले नाही तर मी प्राणत्याग करीन. शास्त्राने सांगितलेले पुष्कळ उपाय मी केले. पण रोग न जाता उलट वाढला. तेव्हां आपण हा माझा भोग दूर करा.''

महाराज त्याला म्हणाले, ''तुझ्या पूर्वकर्मानुसार तुला हा रोग झाला आहे पण तो जाईल काळजी करु नकोस.'' एक शेतकरी त्याच्या शेतातील वाळलेल्या औदुंबराचे एक काष्ठ तोडून खांद्यावर ठेवून चालला होता. महाराजांना अपूर्व चमत्कार करण्याची इच्छा झाली. त्यांनी त्या कुष्ठी ब्राह्मणाला सांगितले, ''त्या शेतकऱ्याकडून ते वाळलेले काष्ट घे आणि संगमावर जाऊन ते रोव. त्याला आळं करुन रोज पाणी घाल, ज्या दिवशी त्या कष्टाला नवीन पाने फुटतील त्या दिवशी तुझे कुष्ठ जाईल.''

महाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्या ब्राह्मणाने संगमावर ते काष्ट रोवून त्याला रोज भक्तीभावाने पाणी घालायला सुरवात केली. पण गांवातले जे बुद्धीभेद करणारे लोक होते त्यांनी त्याला सांगितले, ''तुझा रोग जाणार नाही म्हणूनच महाराजांनी हा असंभवनीय उपाय म्हणून वाळलेल्या लांकडाला पाणी घालायला सांगितले.'' वाळलेल्या फांदीला कधी नवीन पालवी फुटते का? पण त्याचा महाराजांच्या शब्दावर अढळ विश्वास होता. तिथे कांही बुद्धीभेद करणाऱ्यांचे कांही चालेना पाहिल्यावर ते महाराजांच्याचकडे आले आणि म्हणाले, ''महाराज काय सांगितलंत त्या ब्राह्मणाला तुम्ही? वाळलेले लांकूड जमीनीत रोवून तो रोज पाणी घालतोय.''

महाराज त्यांना म्हणाले, ''श्रद्धा भावनेला निश्चित फळ मिळते.'' त्यासाठी महाराजांनी त्यांना एक कथा सांगितली.

सिंहकेतु राजाचा मुलगा धनंजय कांही शबरांसह रानात शिकारीला गेला. त्यातल्या एका शबराला फिरता फिरता रानांत एक शिवलिंग मिळाले. त्याने राजपुत्राला सांगितले, ''मला हे शिवलिंग मिळाले आहे व त्याची पूजा करायची इच्छा आहे. मला तुम्ही त्याचे पूजा विधान सांगा.'' त्याप्रमाणे राजपुत्राने त्याला पूजाविधान सांगितले व



तो तशी रोज शिवलिंगाची पूजा करु लागला. त्यात चिताभस्माचा नैवेद्य दाखवणे हा एक भाग होता. एकदा त्याला कुठेच चिताभस्म मिळेना त्यामुळे तो विवंचनेत पडला. आणि आज आपली पूजा यथासांग झाली नाही याचे त्याला फार वाईट वाटले. त्यावेळी त्याच्या पत्नीने त्याला सांगितले की, 'त्याने तिचे दहन करुन त्या चिता भस्माने नैवेद्य दाखवावा नाही तरी या क्षणभंगुर देहाचा काय भरवसा? कधी तरी तो पडणारच आहे.' त्याप्रमाणे त्या शबराने तिचे दहन केले आणि त्या चिताभस्माने शंकरांना नैवेद्य दाखवला. आपण आपल्या पत्नीचे दहन केले आहे याचे त्याला पूर्ण विस्मरण झाले आणि त्याने रोजच्याप्रमाणे तिला प्रसाद घ्यायला हांक मारली आणि आश्चर्य म्हणजे ती प्रसाद घ्यायला रोजच्याप्रमाणे आली. मग याला आठवण झाली. घरासकट मी तुला दग्ध केले असताना तूं आलीस कशी? ती म्हणाली, ''घरात गेल्यावर मला झोप लागली आणि आता तुमची हांक ऐकून मी जागी झाले.'' एवढ्यात भगवान शंकर प्रगट झाले आणि त्या दोघांना त्यांनी इष्ट वर दिला.

त्या बुद्धीवादी लोकांना ही कथा सांगून महाराज त्या सगळ्यांना घेऊन संगमावर आले आणि त्या कुष्ठरोग्याला जाऊन भेटले. त्या ब्राह्मणाचे शरीर कृश होऊन तो कधी पडेल हे सांगता येत नाही अशी परिस्थिती असूनही त्याचे अंत:करण मात्र प्रसन्न आहे. उपवास करुनही तो समाधानी आहे. महाराजांच्या शब्दांबर त्याचा अढळ विश्वास आहे. महाराजांनी आपल्या कमंडलूतले तीर्थ त्या वाळलेल्या लागडावर प्रोक्षण करताच त्याला पालवी फुटली. आणि इकडे याचे कुष्ठ जाऊन देह सुवर्णमय झाला. त्याबरोबर कृतज्ञतेने अष्ट-सात्विक भाव जागृत होऊन त्याने महाराजांची पुष्कळ स्तुती केली. महाराजांनी संतुष्ट होऊन त्याला आशीर्वाद दिला, ''तुझी कीर्ती वाढेल, तुला धनधान्यादि पुत्रपौत्रादि संपत्ती मिळेल. तुला उत्तम योगशास्त्राचे ज्ञान होईल आणि तुझ्या कुळात माझी भक्ती अखंड राहील.'' त्याला महाराजांनी ''विद्या सरस्वती'' मंत्राचा उपदेश केला. पुढे तो कुटुंब घेऊन गाणगापुरातच महाराजांची सेवा करीत राहिला.

○○○

# अध्याय ४१

सिद्धांनी नामधारकाला महाराजांचे चरित्र सांगताना, ''तुझे पूर्वजही असेच भक्त होऊन गेले'' असे म्हटले. म्हणून शेवटी नामधारकांनी सिद्धांना विचारले, ''माझे पूर्व कोण होते व त्यांनी महाराजांची कशी सेवा केली ते मला सविस्तर सांगा.''

तेव्हां सिद्धांनी सांगायला आरंभ केला. ते म्हणाले, फार पूर्वी तुझ्या पूर्वजांची म्हणजे सायंदेवांची आणि महाराजांची गोदावरीच्या तीरावर भेट झाली व पुढे महाराजांच्या आज्ञेने ते गाणगापूरमध्ये येऊन राहिले होते. एकदा त्यांनी महाराजांना त्यांच्याकडून सेवा घ्यायची इच्छा प्रगट केली. महाराज त्याला म्हणाले, ''अरे आमची सेवा फार कठीण आहे. आम्ही एका ठिकाणी थोडेच असतो? कधी गांवात राहातो तर कधी अरण्यामध्ये. तुला आमची सेवा करायची म्हटलं तर फार सायास होतील. कशाला त्या भानगडीत पडतोस?'' पण सायंदेवांचा निश्चय झालेला होता. त्यांनी, महाराजांनी गुरुसेवेबद्दल जे कांही सांगितले ते मान्य करुन त्यांच्याबरोबर राहू लागले. एक दिवस महाराजांनी त्याला संगमावर नेला. जो संकटातून आपल्या शिष्यांना पापकर्म करण्यापासून वाचवतो तो त्यांना संकटात टाकील का? पण शिष्यावर कृपा करण्यापूर्वी त्याची परीक्षा केली पाहिजे ना। महाराजांनी आज सायंदेवाची परीक्षा करायची ठरवली. अचानक आकाशात प्रचंड मोठे मेघ जमा झाले आणि मुसळधार पाऊस पडू लागला. सगळीकडे अंधार पडला. सोसाट्याचा वारा सुटला. विजांचा कडकडाट होऊ लागला. महाराजांना त्रास होऊ नये म्हणून सायंदेवांनी त्यांच्या भोवती वस्त्रांचा आडोसा निर्माण केला. महाराज सायंदेवांना म्हणाले, ''आम्हाला फार थंडी वाजते आहे. कुठून तरी शेकायला विस्तव घेऊन ये.'' विस्तव आणण्यासाठी सायंदेव गांवात जायला निघाल्यावर महाराजांनी त्याला सांगितले, ''जाता येताना इकडे तिकडे पाहू नकोस.''

विजांच्या प्रकाशात सायंदेव गांवात जायला निघाले. अतिशय वेगाने ते गांवात आले आणि एका भांड्यात विस्तव घेऊन संगमावर यायला निघाले. महाराजांनी त्याला इकडे तिकडे बघू नकोस असे सांगितले होते त्याप्रमाणे त्यांनी केले असते तर काय हरकत होती? पण त्यांच्या मनांमध्ये चिकित्सा उत्पन्न झाली आणि महाराजांनी आपल्याला असे कां सांगितले असेल या विचारांनी त्यांना अस्वस्थ केले. त्यांनी न



राहवून बाजूला पाहातात तो काय, दोन मोठे सर्प त्यांच्या दोन्ही बाजूंनी बरोबर धांवताहेत. कसे तरी दत्तप्रभुंचे स्मरण करीत ते संगमाच्या दिशेने अजून जोराने पळत सुटले. जवळ आल्यावर त्यांना संगमावरच्या मंदिरातून वेदध्वनी ऐकू आला. सगळा अंधार दूर झाला. चंद्रोदय झालेला होता. सगळे कसे प्रसन्न दिसत होते. महाराजांचे दर्शन झाल्यावर महाराजांनी त्याला विचारले, ''सायंदेवा, तुम्ही घाबरलात? आम्ही तर तुमच्या संरक्षणासाठी हे सर्प पाठवले होते. गुरुसेवा फार कठीण आहे. कोणच्या वेळेस मनामध्ये काय विकल्प येईल, वाणीने काय बोलले जाईल आणि शरीराने काय घडेल सांगता येत नाही. गुरुसेवा अंगीकारल्याचा तुम्हाला पश्चाताप तर होत नाही ना'' सायंदेवाने सांगितले, ''महाराज, आपण माझे मन जाणता. मी आपल्याला काय सांगणार? आपण मला सांभाळून घ्या. आपण साक्षात् परब्रह्म आहात आपण मला ज्याच्या योगाने माझे मन स्थिर होईल असे गुरुसेवेचे विधान सांगा.''

ही त्याची प्रार्थना ऐकल्यावर महाराज सांगू लागले, ब्रह्मदेवांचा पुत्र त्वष्टा आपल्या गुरुंच्या आश्रमात राहून गुरुंच्या आज्ञेप्रमाणे मनोभावे सेवा करीत होता. एक दिवस त्यांचा आश्रम पाऊसाने गळू लागला. गुरुंनी त्वष्ट्याला सांगितले, बाबा, दर वर्षी हा त्रास होतो ज्या घरात कधी पाणी गळणार नाही, जे कधी जुने दिसणार नाही, नेहमी नवीनच दिसेल असे एक घर मला बांधून दे. मग गुरुपत्नीने त्याला सांगितले, मला एक उत्तम चोळी पाहिजे. ती कोणी तयार केलेली असता कामा नये. आणि माझ्या अंगाला बरोबर बसणारी असली पाहिजे. गुरुपुत्राने सांगितले, माझ्या पायाला येतील, ज्या घातल्यावर मला पाण्यावर चालता येईल आणि मनांत येईल त्या स्थानात जाता येईल अशा पादुका आणून दे. गुरुकन्येने सांगितले, मला हस्तिदंताची उत्तम कुंडले आणून दे. तसेच खेळण्यासाठी सचेतन बाहुल्या पाहिजे आहेत. ज्या भांड्यामध्ये ठेवलेले अन्न कधी गार होणार नाही, तसेच ती जर विस्तवावर ठेवली तर त्यांना खालच्या बाजूने काजळी धरणार नाही अशी भांडी मला आणून दे.

कार्यसिद्धी झाल्याशिवाय परत यायचे नाही असा निश्चय करुन त्वष्टा निघाला. खिन्न होऊन जंगलात बसला असताना एक अवधूत तिथे आले आणि त्यांनी ह्याची चौकशी केली. ह्यानेही गुरुमहाराज, गुरुपत्नी, कन्या व पुत्र यांनी काय मागणी केली आहे ते अवधूतांना सांगितले. तेव्हां अवधूतांनी त्याला काशीक्षेत्रात जाऊन विश्वेश्वरांची

प्रार्थना करण्यास सांगितले तसेच पुढे असेही म्हणाले, ''अत्यंत पुण्यकारक असे ते क्षेत्र आहे. काशीक्षेत्रात राहाणाऱ्याचे जरी दर्शन झाले तरी पापक्षय होतो. मोक्ष देणारे विश्वश्वर तिथे राहतात. ते तारक मंत्राचा उपदेश करतात. त्यामुळे जीव मुक्त होतो. त्यांच्या कृपेने हे सर्व तुला मिळेल.''

त्वष्टाने त्यांना विचारले, ''ही काशीनगरी आहे कुठे ?'' अवधूत म्हणाले, ''चल, तुझ्या निमित्ताने मलाही दर्शन होईल. मी तुला काशीला घेऊन जातो.'' आणि त्याला घेऊन योगसामर्थ्याने ते काशीला घेऊन आले. त्याला यथाविधी काशीयात्रा करण्यास सांगितले. तो म्हणाला, मला ती कशी करतात ते माहीत नाही.

तेव्हां ते म्हणाले, प्रथम मणिकर्णिकातीर्थात स्नान करुन विश्वश्वरांचे दर्शन घे. त्या नंतर अंतर्गृह यात्रा कर. मग दक्षिणमानस यात्रा करुन स्नान, पूजा, श्राद्ध वगैरे कर.

○○○



## अध्याय - ४२

'मग पंचकोशीयात्रा, शुक्लकृष्णपक्षयात्रा वगैरे भक्ती भावाने कर. प्रत्यक्ष विश्वेश्वरांचे, भवानी धुंडीश्वर, दंडपाणी, भैरव, विघ्नेश्वराचे दर्शन घे. एका शिवलिंगाची स्थापना कर म्हणजे तुझ्या सर्व कामना पूर्ण होऊन तूं मुक्त होशील.' असे सांगून अवधूत गुप्त झाले.

याची खात्री पटली की आपल्या गरुमहाराजांनीच आपल्याला अवधूतांच्या रुपाने सर्व मार्गदर्शन व सहाय्य केले आहे. अवधूतांच्या आज्ञेप्रमाणे त्याने काशीयात्रा केली. स्वनामांकित शिवलिंगाची स्थापना केली. शिवलीलेचे वर्णन वाणीने करणे अशक्य आहे. त्याला साक्षात विश्वेश्वरांनी दर्शन देऊन त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतील असा आशीर्वाद दिला. त्यामुळे त्याचे गुरुही संतुष्ट झाले आणि त्याला सर्वतोपरी कल्याण होईल असा आशीर्वाद देऊन घरी पाठवले. पुढे तो विश्वकर्मा म्हणून प्रसिद्ध झाला.

महाराजांच्या मुखातून हे सर्व ऐकल्यावर सायंदेवांना अतिशय आनंद झाला आणि त्यांनी महाराजांची पुष्कळ स्तुती केली आहे. ते म्हणतात, ''महाराज, आपणच साक्षात उमापती आहात. आपणच मला काशीक्षेत्राचे या निमित्ताने दर्शन घडवलेत.''

महाराजांनी त्यांनी आशीर्वाद दिला, ''तुला अहेतुकी भक्ती प्राप्त होईल. तुझ्या वंशोवंशी माझी भक्ती राहील. तुला उत्तम लोकाची प्राप्ती होईल. आता या पुढे म्लेंच्छराजाची सेवा करु नकोस. तुझ्या स्त्रीपुत्रांना इथे घेऊन ये आणि आमची सेवा करीत राहा.''

महाराजांची आज्ञा मानून त्यांना नमस्कार करुन सायंदेव गेले आणि आपल्या कुटुंबाला गाणगापुरात घेऊन आले. त्या दिवशी अनंत चतुर्दशी होती म्हणून महाराजांनी त्यांना अनंतव्रताचा महिमा सांगून ते व्रत करण्यास सांगितले. नंतर त्यांनी कानडी भाषेत महाराजांचे एक स्तोत्र केले आहे. त्यांचा पुत्र नागनाथ यांच्यावरही महाराजांची मोठी कृपा होती.

○○○

# अध्याय ४३

सायंदेवांनी मी कोणते व्रत करु असे महाराजांना विचारले असता महाराजांनी त्याला अनंताचे व्रत करण्यास सांगितले. हे व्रत जीवाला चारही पुरुषार्थ साधून देणारे आहे. कृष्णांच्या उपदेशाप्रमाणे धर्मराजांनी हे मोठे व्रत केले आणि सार्वभौम सुख ह्याच्या प्रसादाने मिळून धर्मराज सदेह स्वर्गलोकाला गेले.

सायंदेव म्हणाले, "आपण मला हे व्रत पूर्वी कोणी केले, त्याला काय फळ मिळाले याची माहिती सांगा.

दत्तप्रभू म्हणाले, "सूड म्हणून दुर्योधनाने कपटद्युत खेळून पांडवाचे राज्य हरण करुन त्यांना वनवासात पाठवले. त्यावेळी धर्मराजही अत्यंत दु:खित झाले. श्रीकृष्ण त्यांना भेटायला एकदा वनांत आले असता त्यांनी श्रीकृष्णांना विचारले, "आमचा त्राता तूंच आहेस असं असताना आमचं दु:ख तुला कळत नाही का?"

श्रीकृष्ण म्हणाले, "तूं अनंताचे व्रत कर म्हणजे हे संकट दूर होऊन तुला परत राज्यप्राप्ती होईल." तेव्हा धर्मराजांनी विचारले, "हे अनंत व्रत काय आहे, पूर्वी कोणी केले होते? ते सर्व मला सांगा."

श्रीकृष्ण सांगू लागले, "मी विभू म्हणजे व्यापक आहे. संबंध चराचर विश्व, कालस्वरुप मी आहे. तरीही कर्म, प्रयोजन, गुणांनी मी इतर सर्वांपेक्षा वेगळा आहे. मी अनंत, ब्रह्म आहे. भाद्रपद शुध्द चतुर्दशीच्या दिवशी हे अनंत व्रत करणाऱ्यांना हे व्रत अनंत फल देणारे आहे. ते तू कर. म्हणजे तुला इष्ट प्राप्त होईल.''

पूर्वी सुमंतु नावाचे वसिष्ठ गोत्रातले एक ऋषी होते. त्यांच्या पत्नीने एका कन्येला जन्म दिल्यावर मृत झाली. मग सुमंतुंनी दुसऱ्या स्त्री बरोबर विवाह केला. प्रारब्ध त्यांनाही चुकले नाही. त्या दुसऱ्या पत्नीला भांडण आणि द्वेष अत्यंत प्रिय होते. त्या ऋषींची कन्या सुशीला रांगोळी वगैरे काढण्यात हुशार होती. सुमंतुंनी कौडिण्य ऋषींना सुशीला ब्राम्हविवाह पध्दतीने दिली. कौडिण्य ऋषी सासऱ्यांच्या आग्रहास्तव दोन महिने सुमंतुंच्या घरी राहिले. पण त्यांना सासूचा फार त्रास झाला. मग एक दिवस आपल्या सासऱ्यांची आज्ञा घेऊन सुशीलेला घेऊन कौडिण्य ऋषी



आपल्या घरी जायला निघाले. सुशीलेच्या सावत्र आईने तिला बरोबर प्रवासात नेण्यासाठी काही दिले नाही. मग सुमंतु ऋषीनीच सुशीलेला गव्हाचा कोंडा बिंडा काही तरी बरोबर दिला. मध्यान्ह काळी एका नदीच्या किनाऱ्यावर ते जरा थांबले. तिथे काही सुवासिनी स्त्रिया कोणती तरी पूजा करीत होत्या. ते पाहून सुशीला तिथे गेली आणि त्या स्त्रियांना त्या कसली पूजा करताहेत ते विचारले. त्या स्त्रिया म्हणाल्या, आज भाद्रपद शुध्द चतुर्दशी आहे त्या निमित्ताने आम्ही अनंता व्रताची पूजा करतो आहोत.

त्यानंतर सुशीलेला त्यांनी अनंताची पूजा कशी करायची ते सविस्तर सांगितले. आणि अनंताचा दोरा दिला. तो हातात बांधून ती पतीजवळ आली. पुढे अनंताच्या प्रसादाने त्यांना खूप ऐश्वर्य मिळाले. अचानक एक दिवस सुशीलेने त्यांना वश करण्याकरताच तो बांधला आहे असा गैरसमज करुन तो अग्नीत टाकला. सुशिलेने त्यांनी हर प्रकारे विनवून पाहिले पण त्यांना ऐकले नाही. पुढे लवकरच त्यांचे सर्व ऐश्वर्य गेले तेव्हा ते वेडे पिसे होऊन अरण्यात फिरु लागले. गायी, सरोवर, आम्रवृक्ष वगैरेंना अनंत कुठे भेटेल असे विचारु लागले. एवढ्यात अनंतांनी एक वृध्द विप्राच्यारुपाने येऊन एका स्थानात नेले आणि आपले मूळ स्वरुप दाखवले. मग कौडिण्यांनी अनंतांची स्तुती केली. पुढे अनंताच्या वराने ऋषींना आपले गेलेले ऐश्वर्य मिळाले. म्हणून श्रीकृष्णांनी हे व्रत पांडवांकडून करुन घेतले. आणि अनंताच्या प्रभावाने पांडव सार्वभौम राजे होऊन अंती सदेह स्वर्गाला गेले.

म्हणून सायंदेवाला महाराजांनी हे व्रत करण्यास सांगितले. पुढे सायंदेवांनी ते व्रत करुन यवनाची नोकरी सोडून देऊन महाराजांच्या सेवेत सहकुटुंब येऊन राहिला. आणि शेवटी मुक्त झाला.

सिध्द नामधारकाला सांगतात, सायंदेवांच्याच वंशातला तू आहेस म्हणून तुझे मन महाराजांच्या भक्तीत रंगले आहे. योगयागादि न करता त्यांच्या कृपेने हे विधान तुम्हाला लाभले आहे. तेव्हा त्यांचीच भक्ती करुन त्यांना तू आपलासा करुन घे.

○○○

## अध्याय ४४

सिध्द नामधारकाला सांगताहेत, मागील कथा संदर्भ लक्षात घेऊन आता पुढचे कथानक ऐक. गाणगापुरात राहणारा एक तंतुक रोज एक प्रहर महाराजांची सेवा करीत असे. महाशिवरात्रीच्या निमित्ताने गावातले सगळे लोक श्रीशैल यात्रेला जायला निघाले. त्यांनी तंतुकाला बरोबर चलण्यास सांगितले. तो म्हणाला, ''महाराज हेच माझे श्रीशैल्य मल्लिकार्जून आहेत. तेच सर्वत्र भरुन राहिले असता अचेतन मूर्तीच्या दर्शनाला कशाला जायचे ?'' हे त्याचे विचार ऐकून त्या लोकांनी त्याला मूर्खात काढले आणि ते श्रीशैल्याला निघून गेले. मग तो महाराजांच्या दर्शनाला आला. महाराजांनी त्याला विचारले, ''कां रे यात्रेला गेला नाहीस ?'' महाराजांना तेच उत्तर दिले. पुढे चतुर्दशी आली. महाराजांनी त्याला आपल्या योगसामर्थ्याने आकाशमार्गाने श्रीशैल्याला नेले. त्याच्या गांवातल्या लोकांनी त्याला पाहिल्यावर विचारले, आम्ही जेव्हा चल म्हणत होतो, तेव्हा आला नाहीस पण शेवटी आलासच ना! वगैरे. तिथे तो मंदिरात जाऊन पहातो तो शिवलिंगाच्या ऐवजी महाराजच तिथे बसले आहेत. मग महाराजांनी त्याला स्थान महात्म्य सांगितले.

फार पूर्वी विमर्षण नावांचा एक राजा होता. तो जरी अत्यंत स्त्रीलंपट असला तरी मोठा शिवभक्त होता. त्याच्या बायकोला हा विरोधाभास काही उलगडत नव्हता. तिने एक दिवस त्याला धीर करुन विचारले. तेव्हा त्याने आपल्या पूर्व जन्मांचा सर्व वृत्तांत सांगितला, पूर्व जन्मी मी श्वान होता. एकदा मला भूक लागली म्हणून मी शिवमंदिरात गेलो. त्या दिवशी नेमकी शिवरात्र होती आणि तिथे पूजा व आरती चालू होती. ती अनायासे मला पहायला मिळाली. सगळ्या लोकांनी मला हाकलून दिले. पळताना अभावितपणे शिवलिंगाला प्रदक्षिणा घडली. म्हणून मरताना मला शंकराचे दर्शन झाले म्हणून मला शिवभक्ती मिळाली. पण श्वानयोनीचे संस्कारही त्याचबरोबर माझ्या चित्तावर राहिले आहेत.

मग राणीने विचारले, मी पूर्व जन्मी कोण होते ? तो म्हणाला, ''तूं एक कपोत पक्षिणी होतीस. आकाशात उडत असताना एका घारीने तुला मारले व तूं ही श्रीशैल्य पर्वतावरच पडलीस. त्यामूळे तूं माझी पत्नी झालीस. मग त्याने तिला त्या



दोघांना पुढचे कोणते जन्म येणार आहेत ते सांगून म्हणाला शेवटी आपण शंकरांच्या कृपेने मुक्त होणार आहेत असे सांगितले. मग महाराजांनी त्याला परत गाणगापुरात आणले. त्याला गावात सोडून महाराज संगमावर आले. गांवातल्या लोकांनी त्याला क्षौर कां केले विचाल्यावर त्याने सांगितले, "महाराज मला श्रीशैल्यावर घेऊन गेले. तिथे मी क्षौर वगैरे करुन पूजा केली आणि आता त्यांच्याबरोबरच परत आलो." प्रथम त्या लोकांचा विश्वास बसेना पण जेव्हा गांवातली श्रीशैल्यामला गेलेली मंडळी परत आली तेव्हा त्यांनी तंतुकाला श्रीशैल्यमवर पाहिल्याचे सांगितले तेव्हा या लोकांची खात्री पटली. श्रीमहाराजांच्या कृपेने अज्ञान दूर होऊन त्याला पुढे मुक्ती मिळाली. महाराजांचा फार मोठा अधिकारी भक्त तो होऊन गेला.

○○○

# अध्याय ४५

सिध्द म्हणाले, "नंदीशर्मा नावाचा एक कुष्ठी ब्राह्मण तुळजापुरला जाऊन तीन वर्षे तप करीत होता. मग तुळजाभवानीने त्याला चंदला परमेश्वरीजवळ जाण्यास सांगितले. तिथे जाऊन नंदीशर्माने सात महिने तप केले. तिनेही मग त्याला सांगितले. "भीमअमरजा संगमावर रहाणाऱ्या यती महाराजांकडे तूं जा." नंदीशर्मा म्हणाला, "माणसाकडे मला जा म्हणतेस तुला काही लाज वाटत नाही का? तुझा काय प्रभाव त्याची या वरून परीक्षा झाली. माणसाकडेच पाठवायचे होते मग मला इतके कष्ट कां दिलेस?" असे म्हणून तो तिथेच पुन्हा तप करु लागला. शेवटी पुजाऱ्यांनी देवीच्या आदेशाप्रमाणे त्याला तिथून घालवून दिले. नंदीशर्माने विचार केला, आजपर्यंत आपण इतके कष्ट भोगले. आता देवीच्या आज्ञेने अजून कांही कष्ट भोगायचे असतील तर भोगू. असा विचार करून देवीला नमस्कार करून स्वामी महाराजांच्याकडे आला.

गाणगापूरात येऊन त्याने ''स्वामी महाराज कुठे आहेत?" असे विचारले. कुष्ठी झालेला हा पापी मनुष्य आहे असे समजून त्याला कोणी उत्तर दिले नाही. मग एकाने सांगितले, ''आज शिवरात्री व्रताचे पारणे करण्याकरता देव मठात येत आहेत. तूं इथंच थांब.'' इतक्यात प्रभू मठात आलेच. त्यांना कोणीतरी सांगितले, अगदी अर्जुन वृक्षाप्रमाणे ज्याचा देह झाला आहे असा कोणी तरी ब्राह्मण आलेला आहे. विश्वसाक्षी महाराज त्या ब्राह्मणाला बोलावून म्हणाले, ''देवांना सोडून माणसाकडे कशाला आलास तूं, बाबा?''

नंदीशर्माने विचार केला आपल्या मनांतले विचार ह्यांनी ज्याअर्थी जाणले त्या अर्थी हे मानव नसून परमात्मा आहेत. आणि त्याने दत्तप्रभुंची क्षमा मागितली. त्याने प्रार्थना, केली - महाराज, मी पापी असून आपण शरणागताचे रक्षण करणारे आहात. मी आपल्याला शरण आलेलो आहे. आपण भक्त वत्सल आहात. मला विवाह झाल्यावर हा कुष्ठ रोग झाला. पित्याने, पत्नीने, सर्वांनी माझा त्याग केला. कोणीही माझ्याकडे पाहात नाही. देवसुद्धा माझा स्वीकार करीत नाहीत. त्यापेक्षा मृत्यु बरा असे मला वाटतयं. आपण परमात्मा आहात. आपणही माझा स्वीकार केला नाही तर मी इथेच प्राणत्याग करीन.



महाराज म्हणाले, "भिऊ नकोस. तुझा हा रोग तुझ्या पूर्व पापापासून झालेला आहे आणि इतका काळ तुला तो भोगावा लागला आहे. म्हणून तुझ्या मनांत स्थिर, शुद्ध भक्ती उत्पन्न झाली. ह्या संगमावर तीर्थराज आहे. इथे सर्व पापे नष्ट होतात. त्या ठिकाणी जाऊन तूं स्नान कर" मग महाराज सोमनाथ ब्राह्मणाला म्हणाले, ''ह्याच्याकडून यथाविधी संगमावर षटकुल तीर्थात सचैल स्नान करवा, मग अश्वत्थाचे पूजन करून घ्या आणि नंतर इथे घेऊन या." त्याप्रमाणे सोमनाथांनी सर्व केले आणि नंदीशर्माला महाराजांच्या जवळ आणले. महाराज म्हणाले, ''तुझे शरीर कुष्ठरहित झालो की नाही ते एकदा पाहून घे. " त्याचे शरीर सुवर्णाप्रमाणे झाले होते. नंदीशर्माने आपले शरीर नीट न्याहाळले. तोही विस्मित झाला. फक्त जांघेमध्ये किंचित कुष्ठ राहिले होते तो महाराजांना म्हणाला, "हे थोडे कुष्ठ कसे राहिले?" महाराज हंसून म्हणाले, ''तुझ्या मनांत आमच्याबद्दल संशय आला होता म्हणून ते राहिले." तो म्हणाला, अमृत हे पाणी आहे असा समजुतीने प्यायले तर त्याने काय मरण येईल काय? दावाग्नीला चुकून अज्ञानाने जरी स्पर्श केला तरी तो दाह केल्यावाचून राहील का? आपला स्वभाव जो पूर्णत्वाचा आहे यामुळे परिपूर्णत्वाला जाईल काय? हा दोष ज्या अर्थी राहिला त्या अर्थी आपल्या ठिकाणी पूर्ण शक्ती दिसत नाही.

महाराज म्हणाले, ''ज्याचा जो मूळ स्वभाव असतो त्याचा तो स्वभाव कायम असतो. परंतु सदोषत: तो निराळा वाटतो. कसा? सूर्य उदयाला आला असतानासुद्धा जन्मांध जो आहे तो सूर्याचे अस्तित्वच मान्य करीत नाही. हा काय सूर्याचा दोष आहे काय? हा त्या जन्मांधाचा दोष आहे. मी मर्त्य आहे माझ्या हातून तुझा रोग कसा बरा होणार अशी तुझ्या मनांत शंका आली की नाही? त्याच (संशयाचे) हे फल आहे. तूं आणि मी सगळेच देव आहेत. ती अमर्त्यला सिद्ध होण्याकरता उपनिषदांमध्ये प्रतिपादन केल्याप्रमाणे सर्वच ब्रह्मरुप आहे अशी स्तुती तूं कर. म्हणजे तूंही ब्रह्म होशील आणि आम्हालाही ब्रह्म समजशील. आणि तुझी शुद्धी होऊन कृतार्थ होशील.''

नंदीशर्मा गद् गदित स्वराने म्हणाले, ''आपली स्तुती इतकी थोर आहे की मी काय करणार? लिपीसुद्धा मला कळत नाही. दुसरी कांही सेवा करायची आपण मला आज्ञा करा.'' महाराज म्हणाले, ''एकदा मुखातून निघालेले शब्द पुन्हा मागे घेता

येत नाहीत. हत्तीचा सुळा एकदा पडला कि तो परत आपल्या जागेवर बसत नाही. तू स्तुतीच केली पाहिजेस.'' असे म्हणून महाराजांनी त्याच्या मुखात अभिमंत्रित भस्म टाकले. आणि विविध प्रकारच्या उक्तीने स्तुती करण्यास सांगितले. मग प्रेम भक्तीमुळे ज्याचे शरीर नम्र झालेले आहे, स्वर गद्‌गदित झाला आहे अशा नंदीशर्माने श्रुतीमध्ये वर्णन केल्याप्रमाणे स्तुती करण्यास आरंभ केला.

''आपण साक्षात परब्रह्म आहात. परमेश्वर आहात. ते पहाण्यासाठी दूरही जायला नको आणि ते पहाण्यासाठी डोळ्यांचीही आवश्यकता नाही. असे परमतत्व आपण आमच्याजवळ आहात. आपणच कर्ता आहात. जगाचे पोषण करुनसुद्धा आपण अविनाशी आहात. आपण नित्य आहात. आपल्या भक्तांची संगती आणि आपली मुक्ती मला द्या.''

मग इतरांना उद्देशनू नंदीशर्मा सांगतो, ''श्रीगुरुमहाराजांच्या रुपाने सत आणि धर्माचे संरक्षण करणारा परमात्माच अवतीर्ण झाला आहे. आपल्या लीला तेजाने प्रगट झालेला हा मनुष्य नाहीये. मोक्षाकरता ह्याची सेवा करा. अष्टांग योग, निष्काम कर्मानुष्ठान अथवा श्रवण मननआदिने ह्याला भजा. हा भगवान भक्तीनेच प्रसन्न होणारा आहे. ह्याच्याशी तद्रूप होऊन चिरासनावर पुष्कळ काळ जी घडेल ती उपासना. अग्नीच्या स्पर्शाने गवत क्षणार्धात भस्मसात होऊन जाते या प्रमाणे ह्या भगवंताने त्याच्या कृपेच्या नुसत्या अंशाने माझे पाप जाळून टाकले. वाणीला आणि मनाला विषय न होणारे - न समजणारे - आपले गुण किती सांगावेत ? श्रुतीने नेति नेति- कांही नाही असं सांगितले असतानासुद्धा श्रद्धावान जे योगी आहेत त्यांनाच आपण अगोचर आहात.''

अशी त्याने पुष्कळ स्तुति केली . चरणावर मस्तक ठेवून गुरुमहाराजांना नमस्कार केला. परमात्म्याच्या स्तुतीने त्याचे शिल्लक राहिलेले कुष्ठही गेले. महाराजांनी त्याला इष्ट वर देऊन त्यांच्याजवळ राहायला सांगितले.

○○○



## अध्याय ४६

नंदीशर्माने महाराजाच्या विविध लीला आणि स्तुती वर्णन करणारे पुष्कळ ग्रंथ तयार केले. त्याच्या कविता पुष्कळ लोकांच्यात प्रसिद्ध झाल्या ते पाहून नरकेसरी नांवाचा एक कवी, गाणगापुराजवळच राहाणारा, म्हणाला ही स्तुती कितीही चांगली असली तरी मनुष्याची स्तुती आहे, हे चांगले नाही.

नंतर तो नरकेसरी मानस पूजा करीत असताना त्याचे उपास्य दैवत कल्लेश्वर त्यावरच गुरुमहाराज बसलेले त्याला ध्यानात दिसले. मानस पूजा करताना रोज पांच नवीन श्लोक कल्लेश्वरावर करुन त्याला ते अर्पण करायचा त्याचा नियम होता. पण त्या दिवशी तो महाराजांचीच स्तुती करु लागल्यावर महाराजांनी त्याला विचारले, ''तुझा कल्लेश्वर कुठाय ?'' हे ऐकल्यावर त्याचे ध्यान भंगले आणि कल्लेश्वरच महाराजांच्या रुपाने अवतीर्ण झालेला आहे ह्याची जाणीव होऊन तो महाराजांच्याबरोबरच आला. त्याने महाराजांची नवीन पांच श्लोकांची स्तुती केल्यावर महाराजांनी त्याला विचारले, ''ईश्वराला सोडून मनुष्याची कशाला स्तुती करतोस ?'' नरकेसरी म्हणाला, ''अज्ञ भावाने मी आपल्याला मनुष्य समजलो. आपण मला आपले सात्विकरुप दाखवलेत. त्यामुळे आपल्याच प्रसादाने माझा अहंकार गेलेला आहे. माझं पुण्य फळाला आहे. आपण माझा शिष्य म्हणून स्वीकार करा.'' महाराजांनी त्याला उत्तम वस्त्र देऊन सांगितले, ''तूं आपले कल्लेश्वराचे भजन करत राहा. मी तिथेही आहे.'' तो म्हणाला, ''आपले हे प्रत्यक्ष दिसणरे रुप सोडून मी कल्लेश्वराच्या सेवेत जाऊ इच्छित नाही. आपल्या जवळच मला राहूं द्या. आपण अनायासे माझ्या घरी आलात आता माझी उपेक्षा करु नका. मी अत्यंत दयनीय आहे.'' असे म्हणून महाराजांसमोर त्याने लोटांगण घातले. मग महाराजांनी त्याला ब्रह्मज्ञानाचे सुख काय आहे ते त्याला सांगितले. अशा रीतीने हे दोन कवी महाराजांची स्तुती करुन,लीला वर्णन करुन कृतकृत्य झाले.

○○○

# अध्याय ४७

भगवंताचे भक्त वात्सल्य अजून काय वर्णन करायचे ? परिपूर्ण आणि तृप्त असूनही भक्तांच्या घरी ते भोजनाकरता जातात. अशा त्यांच्या अनंत लीला आहेत. भक्तावर अनुग्रह करणे हे त्या लीलांचे स्वरुप आहे. त्या लीला त्यांच्या स्वत:साठी नाहीत. कलीयुगामध्ये आपले भाग्य उदयाला आलेले आहे. कारण बाकीच्या युगांमध्ये ईश्वर दुर्लभ आहे. पण कलीयुगात मात्र भक्तीने तो सुलभ आहे. गाणगापूरमध्ये रोज कोणा कोणा भक्तांकडे महाराजांनी जाऊन भिक्षान्न सेवन केले. मग एके वर्षी दीपावली आली असतां त्यांचे सात प्रिय भक्त त्यांना आपल्या गांवी घरी यायचे आमंत्रण करायला आले. प्रत्येकाची जगत् गुरुंनी आपल्या घरी जेवावे अशी इच्छा होती व त्या करता महाराजांना त्याच दिवशी नेण्यासाठी ते आले होते. महाराज त्यांना म्हणाले, ''मी एका वेळेस सात गांवांना कसा येऊ शकणार ?'' आपली शक्ती असून ती विसरल्यासारखे महाराजांनी दाखविले. ''तुमच्या प्रत्येकाकडे एकेक दिवशी येतो मी. बघा तुम्ही ठरवा. मी भक्ताधीन आहे. जो मला घेऊन जाईल तिकडे मी जाईन.'' हे ऐकून प्रत्येक जण म्हणू लागला, मी प्रथम महाराजांना माझ्या घरी नेणार. ते भक्त महाराजांना म्हणाले, ''हा धनिक आहे. तो गरीब आहे अशा भेदाने आमच्याकडे तुम्ही पाहू नका. तुम्हाला सगळे सारखे आहेत तुम्ही कसंही करून माझ्याकडे याच महाराज, असं म्हणून ते आग्रह धरून बसले. महाराज म्हणाले, ''ठीक आहे. तुम्ही उठा. मी तुमच्या सगळ्यांच्या घरी येतो." महाराजांनी तेवढ्यापुरती आपली शक्ती कमी असल्याचे दाखविले. त्या भक्तांनी विचारले, तुम्ही कोणाच्या घरी येणार ? महाराजांनी सस्मित मुखाने एकेकाला जवळ बोलावले आणि म्हणाले, ''मी तुझ्या घरी येतो पण हे कोणाला सांगू नकोस. पटकन तुझ्या गांवी निघून जा.'' त्याप्रमाणे समाधानाने ते सातही जण आपापल्या गांवी निघू गेले. गाणगापुरातल्या लोकांनी हे सगळे पाहून विचारले, महाराज, आपण कुठे जाणार दीपावलीला ? महाराज म्हणाले मी कुठेही जाणार नाही. इथेच राहाणार आहे. गाणगापुरासह आठ ग्रामांत महाराज त्या दीपावलीत पांच दिवस आठ रुपं धारण करुन राहिले. त्या सात भक्तांपैकी कोणी महाराजांना छाटी दिली, कोणी कमंडलु दिला तर कोणी मस्तकावर धारण करायचा शिरटोप दिला. प्रत्येकाने महाराजांना पक्वान्नाची भिक्षा केली आणि नंतर पुढे थोडे दिवसांनी



कार्तिक पौर्णिमेला ते सातही भक्त गाणगापुरामध्ये आले. प्रत्येक जण सांगू लागला की दीपवाळीमध्ये पाच दिवस गुरु महाराज त्याच्या घरात राहिले. गाणगापुरातले लोक म्हणाले, महाराज तर कुठेच गेले नव्हते. गाणगापुरामध्येच होते. आमच्याबरोबर इथेच त्यांनी दीपावलीचा उत्सव केला. ते सगळे एकमेकांचे म्हणणे खोटं आहे असे म्हणू लागले. शेवटी महाराज म्हणाले, ''वाद घालत बसू नका, मी सर्वत्र गेलो होतो.'' हे ऐकून सर्व जण आश्चयचकित झाले. म्हणाले, ''प्रभू, आपल्या महिम्याचा प्रकार जो आहे तो आम्हाला कळत नाही. आमच्या लौकिक वाणीच्या स्त्रोत्राला आपण पात्र कसे व्हाल ? ज्यांच्या वाणीमध्ये श्रृती आहे त्यांनाही आपली स्तुती करता येणार नाही. आपण जीवाच्या बुद्धीमध्ये राहाणारे आहात. आपण निर्विकार आहात. ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेय या त्रिपुटी व्यवहाराची भ्रांती आणि विवेक. या भ्रांती असेपर्यंत भोग आहे आणि विवेक झाला की मोक्ष, बुद्धीनेच सर्व समजायचे ना! बुद्धीनेच भ्रांती झाली की संसार आहे, भोग आहेत. बुद्धीला विवेक झाला की मोक्ष आहे. अशा बुद्धीनेच प्राप्त होणारे ब्रह्म आहे. आपला जन्म आणि क्रिया दिव्य आहेत. आपला जन्म आणि दिव्य कर्म हे अन्यांकरता (इतरांकरता) नाही. आपले अवतार घेण्याच प्रयोजन हे आम्हाला मोक्ष देण्यासाठीच आहे. आमच्या बुद्धीवर जे आपल्या मायेचे आवरण आहे ते दूर व्हावे ही दक्षिणा आपण आम्हाला द्यावी.''

अशी प्रार्थना करुन त्या सर्वांनी महाराजांना अत्यंत भक्तीभावाने नमस्कार केला. त्यामुळे गुरु महाराज संतुष्ट झाले आणि ते सगळे आपापल्या घरी गेले. भक्तवत्सल प्रभुंनी कोणाला समाजणार नाहीत अशा लीला केल्या. त्यांना जातपात, ज्ञान, पौरुष, आचार, रुप, अर्थ, गुण पराक्रम यापैकी कशाचीही त्यांना अपेक्षा नाही. त्यांना भक्ताच्या ठिकाणी श्रद्धा आणि भक्तीची अपेक्षा आहे. कृपा करायच्या वेळेला वरील पैकी कोणता गुण भक्ताकडे आहे का हे ते पाहात नाहीत. श्रद्धा भक्ती आहे की नाही एंवढे पाहून कृपा करतात. त्यांना कोणावर कृपा करायची झाल्यास कोणी अडवू शकत नाही.

○○○

# अध्याय ४८

सिद्ध म्हणाले, आता एक आश्चर्यकारक कथा सांगतो, एका शूद्र भक्ताने दास्य भक्ती करून ऐहिकामुष्किक प्राप्त करून शेवटी मुक्ती मिळवली. तो शेती करीत असे. महाराज गांवातून संगमावर जाऊन परत येताना याच्या शेतातून येत जात. त्याच वेळी तो अगदी भक्तीभावाने महाराजांना नमस्कार करीत असे आणि आनंदाने महाराजांचे चिंतन करीत आपली शेती करीत असे. तो रोज महाराजांच्या जायच्यायायच्या रस्त्यावरचे दगड, कांटे वगैरे काढून स्वच्छ करीत असे. जाताना नमस्कार करावा आणि संगमावर परत आले की पुन्हा आनंदाने नमस्कार करावा.

एके दिवशी गुरुमहाराजांनी त्याला विचारले, "रोज मला जाता येता कशाला नमस्कार करतोस ? तुला काय साध्य करुन घ्यायचे आहे ? तुझी काय इच्छा असेल ती सांग." त्याने उत्तर दिले, "सुखाच्या इच्छेने मी आपली सेवा करतो. आपल्या कृपेने ह्या शेतात उत्तम पीक येते. ते आपण पाहा. मी शूद्र म्हणून आपण माझी उपेक्षा करु नका." त्याच्या प्रार्थनेप्रमाणे महाराज आनंदाने त्याचे सर्व शेत पाहून आले. सगळे पीक तयार होते. त्या शूद्राला महाराजांनी ते सर्व पीक तत्काल तोडून टाकण्यास सांगितले. ते म्हणाले, " माझ्या वाक्यावर तुझा खरंच विश्वास असेल तर हे सर्व पीक मी संगमावरुन परत येईपर्यंत कापून टाक." असे सांगून दत्तप्रभुंनी संगमावर जाऊन आपले आन्हिक केले.

इकडे तो शेतकरी आपल्या मालकाकडे गेला आणि म्हणाला, या शेताचा एकंदर कर किती द्यायचा ते ठरवून हे शेत माझ्या ताब्यात द्या. मी आत्ता हे पीक कापणार आहे. यावर त्या मालकाने नेहमीपेक्षा दुप्पट कर देईन असे वचन घेऊन पीक कापण्यास परवानगी दिली. लगेच त्याने मजूर बोलावून कापणीस आरंभ केला. तेव्हा त्याची पत्नी त्याच्या मुलांसह तिथे येऊन त्याला अडवू लागली. पण या शेतकऱ्याने तिला भीती दाखवून पळवून लावले आणि सगळे पीक महाराजांच्या आज्ञेप्रमाणे कापून टाकले.

त्या शुद्राला काय वेड लागले का ? नाही. तो उन्मत्त झाला नाही. भरताने मातेला टाकले. प्रल्हादाने पित्याला टाकले. बिभीषणाने मोठ्या भावाचा त्याग केला. मग ह्या शेतकऱ्याने एक साधे पीक गुरुंच्या आज्ञेखातर कापले तर ह्याला काय उन्मत्त झाला म्हणायचे का ? गुरुंची म्हणजे प्रत्यक्ष ईश्वराची आज्ञा ही त्याची भावना होती.



एका संन्याशाच्या सांगण्यावरुन हा आपले शेत कापतोय हे पाहून त्याला रोखण्यासाठी मालकाने आपल्या नोकरांना तिथे पाठवले.

ह्याने आपल्या मालकाला त्या नोकराजवळ उलट निरोप असा दिला की मी पीक कापायला सुरुवात केली आहे ते मी कापून टाकणार. मला मालकाची भीती वाटत नाही. मी मालकाकडून तसे आज्ञापत्र आधीच लिहून घेतले आहे. हा निरोप त्या नोकराने आपल्या मालकाला जाऊन सांगितला. त्या शेतकऱ्याच्या बायकोने शेत मालकाला जाऊन सांगितले, माझ्या नवऱ्याला ते पीक कापू देऊ नका. जर त्याने ते आत्ताच कापले तर तुमचा कर कुठून देईल तो ? तो मालक म्हणाला, मला त्याने अधिक कर देण्याचे वचन दिले आहे. मग ती रडत रडत शेताजवळ आली. पण तोपर्यंत त्या शेतकऱ्याने सर्व पीक कापून तो महाराज संगमावरुन परत यायची वाट पहात बसला.

महाराज आन्हिक आटोपून परत आले आणि त्यांनी शेतकऱ्याने सगळे पीक कापून टाकलेले पाहिले. त्या शेतकऱ्याने महाराजांना नमस्कार केला आणि आदराने उभा राहिला. महाराज त्याला म्हणाले, "या जगात असे काही करायचे मनांतसुद्धा आणणार नाही आणि तू हे दुष्कर कर्म केल्याने सगळे लोक तुझी निंदा करणार. तुझे जीवन कसे होणार ? तुझ्या मालकाला तू काय देणार ? हिरवेगार पीक फुकट गेले."

तो म्हणाला, "तुम्ही सहज बोला किंवा कसंही बोला. पण सद्गुरुंचे भाषण हे वेदांप्रमाणे आहे. आपली वाणीच फल देणारी आहे. ज्याने जन्म दिला आहे तोच जीवन देणार आहे. (केवढा निर्धार आहे!) गर्भावस्थेत असताना आईच्या अन्नरसावर माझे भरण पोषण झाले की नाही ! पण मग जन्माला आल्यानंतर तो जीवन सांभाळणार नाही का ?"

महाराज त्याला म्हणाले, "तुझी तशी भक्ती आहे ना मग तुझ्या म्हणण्याप्रमाणे होईल." आणि ते गावात निघून गेले. तो शेतकरी शांत चित्ताने महाराजांचे चिंतन करीत आपल्या घरी आला. त्याच्या मनावर ह्या सर्व घटनेचा काहीही परिणाम झाला नाही. लवकरच सूर्य मूळ नक्षत्राला गेला असताना गाणगापूरात अचानक प्रचंड पाऊस पडला आणि ह्याने कापलेले यावनाळ भरघोस वाढले. असंभवनीय रीतीने त्या यावनाळला असंख्य अंकुर फुटले ते पाहून त्या शेतकऱ्याला आणि त्याच्या स्त्रीला अत्यंत आनंद झाला. तिने शेतकऱ्याची त्याला पीक कापताना वाटेल तसे बोलल्याबद्दल क्षमा मागितली. ती म्हणाली, "तुम्ही खरे गुरुभक्त आहात." मग त्या शेतकऱ्याने शेतातल्या

क्षेत्रपालाची पूजा केली आणि महाराज संगमावर जाण्यासाठी आले असता त्यांना आपले शेत दाखवले. आणि म्हणाला, "आपले चरण म्हणजे चिंतामणी आहेत. आपले शब्द अमृतासारखे आहेत. आपले तेज हे ज्योतीस्वरुप आहे. आंधळ्याला आपले हे तेज समजत नाही. माझ्या पूर्व पुण्याईने आपले हे तेज मला पहायला मिळाले."

"तुझा विसर न व्हावा"।

असे भक्त मागतात. पण हा म्हणतो, "महाराज, मी आपल्या दर्शनाने कृतकृत्य झालो. आपण मला विसरु नका." हे केवढे मागणं आहे। म्हणजे किती विवेकी लोक असतात एकेक. इतक्या अनंत जीवांमध्ये देवाला आपली आठवण राहिली पाहिजे हे विलक्षणच आहे मागणे. देवाला काय!

महाराज त्याला म्हणाले, "तू खालच्या वर्णात असलास तरी धन्य आहेस. तुला उत्तम गती प्राप्त होईल. एखाद्या दुराचारी माणसाने जरी माझी सेवा अनन्य भावनेने केली तर तो साधू होईल. माझ्या ठिकाणी तुझी उत्तम भक्ती भावना आहे. हे सगळं तुला दिलंय. तुझ्या कुळामध्ये लक्ष्मी स्थिर राहील. आणि माझी भक्तीदास्यही तुझ्या वंशात राहील."

मग तो शेतकरी आपल्या मालकाकडे जाऊन म्हणाला, ''ठरल्याप्रमाणे जास्ती भाग मी द्यायला तयार आहे. शेतात पुष्कळ धान्य झालं आहे.''

त्या शुद्राला आपले दास्य दिले. ज्ञान दिले नाही. तो आपल्या मालकाला म्हणाला, ''सद्‌गुरुंच्या प्रसादाने आपल्या शेतात इतरांपेक्षा अधिक धान्य आलेले आहे ते मी तुम्हाला वचन दिल्याप्रमाणे देणार आहे. मला अन्याय करायचा नाही.'' त्या प्रमाणे ते पीक तयार झाल्यावर त्याने ते धान्य घरी आणले. शिल्लक राहिलेले इतर लोकांनाही दिले. पुढे सद्‌गुरुंच्या कृपेने तो पुष्कळ श्रीमंत झाला पण अत्यंत विनयाने, नम्रपणे श्रीगुरुंची सेवा करीत राहिला. श्रीमंती आली म्हणून त्याने सेवा सोडली नाही.

अशा पुष्कळ लीला झाल्या आहेत. त्या आपल्याला कळल्या नाहीत. हे गाणगापूर धन्य आहे. तो शेतकरी श्रीमंत जरी झाला तरी उद्धट झाला नाही.

○○○



# अध्याय ४९

नामधारकाने सिद्धांना विचारले, ''इतर काशी वगैरे तीर्थ क्षेत्र असताना भगवान् हे गाणगापुरात कां राहिले?'' सिद्ध म्हणाले, ''गाणगापुरात अनेक तीर्थ आहेत. मंद-बुद्धीच्या लोकांना या कलीयुगात तीर्थ अज्ञात आहेत. ती महाराजांनी प्रगट केली.'' एकदा गाणगापुरातली कांही मंडळी काशीयात्रेला निघाली असता श्रीगुरु त्यांना म्हणाले, ''तुम्ही इतक्या दूर कशाला जाता? इथे गाणगापुरातच सर्व तीर्थे आहेत ती मी तुम्हाला दाखवतो. हा भीमा अमरजा संगम म्हणजे प्रयाग आहे. षट् कुलात सगळी तीर्थे आहेत. पापनाशतीर्थ म्हणजे त्रिवेणी संगम आहे. जालंधराने मारलेल्या देवांना पुन्हा जिवंत करण्याकरता शंकरांनी दिलेले अमृत इंद्र नेत असताना कांही अमृत खाली पडले. त्यातून ह्या अमरजा नदीचा प्रवाह तयार झाला आहे. त्या वेळेपासून अमरजा नदी काल-मृत्यू दूर करणारी म्हणून प्रसिद्ध आहे. संगमावर जो अश्वत्थ आहे तो साक्षात् सर्व कामना पूर्ण करणारा कल्पवृक्ष आहे. विश्वेश्वर रुद्र तिथे स्वत: आहे. ही साक्षात् काशीच शंकरांनी भक्तांकरता निर्माण केली आहे. विषयरुपी दाढांनी सर्प दंश झालेला जीव कामादि विषयांनी पिडला जाऊन ईश्वराला विसरुन जातो. म्हणून हे सगळे लोक विकाररुपी सर्पाप्रमाणे आहेत त्यामुळे कोणाची संगती करायची नाही. विषयभोग हे विषाप्रमाणे आहेत. स्त्री ही शववत् आहे. विषयरुपी कावळे गिधाडे वगैरे या शवावर तुटून पडतात. ज्याप्रमाणे आपण शवदर्शन झाल्यावर स्नान करतो त्या प्रमाणे खरा जीवनमुक्त साधू असेल तो स्त्रीचे दर्शन झाले तरी स्नान करतो. यासाठी केवढी मनाची तयारी करावी लागते. हा अभ्यास करायला किती जन्म घालवले पाहिजेत? थोड्या काळात हा अभ्यास होणे शक्य आहे का? काशीची सर्व चिन्हे इथे आहेत.'' महाराज असा तीर्थ महिमा सांगत असता पूर्वाश्रमीची त्यांची रत्ना नांवाची भगिनी तेथे आली. महाराजांना नमस्कार केला. महाराजांनी तिला विचारले, ''तुला काय सांगितले होते याची आठवण आहे की नाही?'' असे विचारताच एकदम तिला महाराजांचे शब्द आठवले आणि तिच्या अंगावर तत्काळ कुष्ठ उद्‌भवले. पण अशा भोगाच्या वेळेलाच महाराजांचे सान्निध्य तिला मिळाले. म्हणजे तिचे पापही आणि पुण्यही आहे. ती खिन्न झाली. महाराज तिला म्हणाले, ''हे कुष्ठ पुढच्या जन्मात

भोगायचे असेल तर हे आत्ता लगेच जाईल. कुष्ठाला कारण करणारे पाप प्रयत्नाने जाईल. ते राहिलं आणि पुन्हा कुष्ठ झालं तर !'' ती रत्ना हुशार होती. ती म्हणाली, ''मला यापुढे गर्भवास पत्करावा लागणार नाही असा आपण मला आशीर्वाद द्या. महाराज म्हणाले, पापविनाश तीर्थात तीन दिवस स्नान केलं आणि शिवांची पूजा केली तर सात जन्म केलेले पाप नष्ट होते, तर कुष्ठाची काय कथा ?'' त्या प्रमाणे रत्नाने पापनाशतीर्थात तीन दिवस स्नान केल्यावर तिचे सर्व कुष्ठ गेले आणि पुढे महाराजांच्या कृपेने ती मुक्त झाली. पाप हरण करणाऱ्या जंबुद्वीपात असणाऱ्या अखिल तीर्थाप्रमाणे असणारे अघनाश तीर्थ महाराजांनी दाखवले. गयेप्रमाणे रुद्रपादतीर्थ आहे. स्थान महात्म्य हे बरोबर आहे अशी श्रद्धा ठेवणाऱ्यांना पापक्षय होण्याचे फल मिळते. चिकित्सा करणाऱ्यांना नाही. गयेमध्ये जे कर्म करतात ते कर्म इथे रुद्र पाद तीर्थावर करा. कृष्णाच्या समोर द्वारकेप्रमाणे हे चक्रतीर्थ आहे. द्वारकेमध्ये करायला सांगितलेले कर्म इथे केले तर त्याचे चौपट फल मिळते. या ठिकाणी स्नान केले असता पतितही ज्ञानी होतो आणि अस्थी जर टाकल्या तर त्यावर चक्र वगैरे चिन्ह येतात. गांवाच्या पूर्व भागात असलेला कल्लेश्वर, गोकर्णाप्रमाणे आहे. मन्मथलिंग महाबळेश्वराप्रमाणे तिथे आहे. श्रावण महिन्यात कल्लेश्वरला अखंड अभिषेक केला, कार्तिक महिन्यात दीपोत्सव केला म्हणजे तो सर्व सिद्धी देतो.

अशी सगळी तीर्थयात्रा सगळ्यांनी केली. विज्ञानमय असे प्रभू तिथे थांबले.

नामधारक म्हणतात, ''आपण क्षेत्र महात्म्य फार चांगले सांगितले. ते सर्व लोकांना पवित्र करणारे आहे. हा भगवान जगन्नाथ लीला करण्याकरता या ठिकाणी राहिला. ज्या ठिकाणी हा भगवान् राहातो त्या ठिकाणी सर्व देव, योगी, मुनी येऊन राहातात आणि सर्व तीर्थही तिथे येऊन राहातात. कृष्णापंचगंगा संगमही धन्य आहे आणि हा भीमाअमरजा संगमही धन्य आहे. या ठिकाणी राहाणारे पशु, पक्षी, जलचर हे ही त्या स्नानपानाने धन्य होतात. मग मनुष्यांचे धन्यत्व हे काय वर्णावे ? ज्याचे महात्म्य श्रवण केल्यावरही सगळ्या पापराशी नाहीशा होतात त्या ठिकाणी प्रत्यक्ष राहाणारे जे सज्जन आहेत त्यांना काय गती मिळते हे सांगायचे कांही कारण नाही. जे भगवत् भक्तीयुक्त आहेत त्यांच्या हातात मुक्ती आहे. पण मुक्तीलासुद्धा बाजूला सारुन ते भक्तीचाच आश्रय करतात.



मुक्तीची अपेक्षा मला पूर्वी होती म्हणतात. पण आपण केलेल्या बोधामुळे अहेतुकी भक्ती मिळून मुक्तीची इच्छा दूर झाली. म्हणून अत्यंत प्रिय असं विष्णुंच कीर्तन, श्रवण वगैरे हेच मला विशेष आवडतं. तुमचं चित्त त्या सद्गुरुंच्या चरित्राने पूर्ण आहे म्हणून मला श्रीगुरुंचे मंगल, परमपावन चरित्र आणखी सांगा. ह्या चरित्राचे गायन स्वर्गातही होत असते. कोणता म्लेंच्छ आहे आणि अत्यंत हीन असूनही भगवंताला तो कृपापात्र कसा झाला ?''

○○○

# अध्याय ५०

सिद्ध म्हणतात, ''नामधारका तूं धन्य आहेस. भगवंताच्या प्रसादानेच तुला अशी बुद्धी होते आहे. मलाही त्यांचे चरित्र सांगताना अतीव आनंद होत आहे. कुरवपुरामध्ये श्रीपादवल्लभ ज्या वेळी राहिले होते त्या वेळी एक रजक स्तोत्र, पूजा वगैरे म्हणून त्यांची सेवा करीत होता. त्याच्या सेवेने संतुष्ट झालेले श्रीपाद त्याला म्हणाले, ''मोठा भाविक आहेस. अखंड साम्राज्य तूं कर.'' ते ऐकून त्याला अतिशय आनंद झाला. एकदा एक राजा आपल्या सैन्य, राण्या, दासींसह तिथे जलक्रीडा करण्यासाठी आलेला या रजकाने पाहिला. तो विचार करु लागला, 'या राजाचा कोण गुरु असेल बरं? ह्याला इतके भाग्य कशाने मिळाले असेल? त्याचे जीवन फार श्रेष्ठ आहे. मला कुठलं असलं जीवन मिळणार?'

त्याच्या मनांतले विचार श्रीपादांनी ओळखले. ते म्हणाले, ''तुझ्या मनांतली इच्छा समजली. आता तुझे वय झाल्याने राज्य करायला तूं योग्य नाहीस. पुढच्या जन्मांत तुला तुझ्या इच्छेप्रमाणे राज्याचा उपभोग घ्यायला मिळेल.'' तरुणांनाच राज्याची आसक्ती असते. राज्यामध्येही राहून तुला माझे स्मरण राहील.

रजक म्हणाला, ''आपण म्हणता तेच बरोबर आहे. राज्याचा उपभोग तारुण्यातच घेतला पाहिजे. पण राज्यामध्ये असतानासुद्धा आपले स्मरण मला रहावे. अशी प्रार्थना आहे.'' श्रीपाद 'तथास्तु' म्हणाले. पुढे त्याला मृत्यु येऊन पुढच्या जन्मात तो बिदरचा बादशहा झाला. म्लेंच्छ जरी असला तरी पूर्वीच्या जन्मातल्या संस्कारामुळे देव आणि विप्र यांचीही सेवा करीत होता.

सार्वभौम सत्ता मिळाल्यावर मनुष्य आनंदाला विरोध कांहीच राहिला नाही. मनुष्य आनंदाची परिसीमा त्याने गांठली. सार्वभौम राज्य मिळाल्यावर हे तेज, प्रज्ञा, धर्म, यश सगळं नाहिसं होणार. पण पूर्वी वर मिळाल्याप्रमाणे त्या महाराजांची स्मृती होती. त्यामुळे राज्यात अनर्थ झाला नाही. आधीच्या जन्मातील प्रज्ञा ही पुढच्या जन्मांमध्ये येते. त्याच्या मनांत पूर्व संस्कारामुळे सर्वांबद्दल समभाव होता. शत्रूमित्रभाव नव्हता. त्याच्या म्लेंच्छ पुरोहितांनी त्याला सांगितले, ''आपला धर्म उत्तम आहे त्याचे



तुम्ही पालन करा. वर्णधर्म हा खोटा आहे. तो मनांतसुद्धा आणू नये. मुख आणि इतर अवयव असलेला देह सगळ्यांचाच सारखा आहे की! हा अमूक वर्णाचा श्रेष्ठ तो अमूक वर्णाचा कनिष्ठ हे यांनी कुठलं काढलं? अचेतन अशा दगडामध्ये, लाकडामध्ये देवता कुठल्या आल्या? पशु आणि मानवांचे अवयव वेगवेगळे असल्यामुळे ते एकमेकांपेक्षा वेगळे आहेत असे म्हणायला हरकत नाही. त्यांच्यात भेदलक्षण नाही. स्त्री पुरुषांच्यात लिंगभेदाने स्पष्ट फरक आहे पण मी क्षत्रिय, मी ब्राह्मण म्हणणाऱ्यांच्यात कांहीच वर्णभेद नाही.'' हा एक दोष त्यांनी काढला.

म्हणजे बाहेरुनच सर्व त्यांना ठरवायचे आहे. राजा त्यांना म्हणाला, ''तुमचे हे म्हणणे अमान्य आहे. परमेश्वराने गुणकर्मभेदाने चातुर्वर्ण्य निर्माण केले. चेतन अचेतन सगळ्यामध्येच देव आहे. स्थूल (म्हणजे मोठ्या) अक्षरावरुन बालकाला लिपीज्ञान होते. तसं गुरुंनी सांगितलेल्या मूर्तीची कल्पना करुन हृदयाचे, चित्ताचे स्थैर्य झाले म्हणजे देव सगळीकडे कसा आहे हे कळतं. स्वच्छ जलामध्ये प्रतिबिंब आहे. परंतु बिंबाची प्रतीती आहे. प्रतिबिंब असतानासुद्धा. पण तो आरसा, जल जर मलीन झाले तर ही प्रतीती येत नाही. म्हणून ज्यांना स्वप्रामाण्य आहे अशा अनादि वेदांमध्ये सांगितलेल्या धर्माचे आचरण करणाऱ्या द्विजांना भक्तीने नमस्कार करीत चला. ते देवांचेही देव आहेत. वेद आणि स्मृतींनी सांगितलेले धर्म आणि कर्म याप्रमाणे वागणारे विप्र पूज्य आहेत त्यांच्याबद्दलची द्वेष भावना सोडून द्या.''

कांही काळाने त्या राजाच्या मांडीवर एक फोड झाला. त्याला अत्यंत व्यथा होऊ लागली. त्यावर पुष्कळ उपाय केले पण ते फुकट गेले. त्या यातनांमुळे त्याने सगळे विषयभोग सोडून दिले. शेवटी विद्वान ब्राह्मणांना बोलावून या रोगाचा प्रतिकार कसा करायचा हे विचारले. ते ब्राह्मण म्हणाले, ''तुम्ही म्लेंच्छ, मी ब्राह्मण इथे कसे सांगणार? लोकापवाद नको म्हणून एकांतात आम्ही तुम्हाला यावर उपाय सांगू.'' मग ते दोघे गाणगापूरला पापनाशतीर्थावर आले.

त्या ब्राह्मणाने राजाला सांगितले, ''पूर्वी केलेल्या दुष्कर्मांमुळे हा रोग होतो. ह्या रोगाची शांती दान, औषध, तीर्थ, देव यांच्या सेवेने होते. सर्व पाप दूर करण्याचे सामर्थ्य ज्यांच्या दृष्टीत आहे अशा साधुंची दृष्टी पडली तरीसुद्धा हा रोग दूर होतो.''

राजाने विचारले, ''पूर्वीच्या जन्मांत दुष्कर्म केले. आता दुसरा देह आलेला आहे. त्याच देहाने केलेल्या पापाचं फळ त्याच देहात मिळालं तर ठीक आहे पण आता दुसऱ्या देहात आल्यावर त्या पापाचे फल म्हणून रोग कसा होतो ?'' हा ! ज्या शरीराने पापकर्म केले त्याला आरंभक अशी जी पंचभूतं ती नष्ट झाली. परंतु शरीर नष्ट झालं तरी शरीरामध्ये राहाणारा जीवात्मा नष्ट झालेला नाही. पापकर्ता तो आहे. शरीर साधन आहे. जोपर्यंत तत्वज्ञान होत नाही तोपर्यंत पुन्हा पुन्हा जन्ममृत्युच्या फेऱ्यात जीव सांपडतो. मरण म्हणजे जीवात्मा देहातून बाहेर पडणे. शुद्ध आत्मा जो आहे त्याला कांही नाही. लिंग शरीर हे त्या जीवाचा शक्ती अवशेष आहे. आत्म्याच्या ठिकाणी ते लीन होते. आत्मस्वरुपामध्ये ते लीन झाले म्हणजे पूर्व जन्म संपला. प्राणोत्क्रमणाच्या वेळेला प्राणाच्या पाठोपाठ सगळी सूक्ष्म इंद्रिये बाहेर पडतात. एका नाडीने ते उदान, पुण्याने पुण्यलोकाला नेतो. पापाने पापलोकाला नेतो. पाप आणि पुण्य मिळून मनुष्यलोकाला नेतो. दुसरे शरीर धारण करण्याकरता दुसऱ्या योनीमध्ये जातात.

कर्म करणारा आणि कर्मफल भोगणारा ह्याला मरण नाही. त्याचा फक्त देह गेला. कर्मफल देणारा ईश्वरही अमर आहे. त्याच्या प्रेरणेने जन्मांतरात केलेले जे दुष्कर्म असेल त्यामुळे रोगादि दु:ख प्राप्त होते. मागच्या जन्मांत केलेले पाप नाहीसे झाले म्हटलं म्हणजे केलेल्याचा नाश व्हायचा या ठिकाणी (या जन्मात) दु:ख आलं त्याचं कारण काय सांगता येत नाही. कांही न करताना दु:ख भोगावं लागलं. केलेलं फल कांही फल न देता गेलं असे दोष येतात. म्हणून त्याच कर्माचं हे फल आहे. साधूंच्या कृपादृष्टीने रोग कसा शांत होतो याची कथा सांगताहेत.

अवंतीपुरामध्ये धर्महीन असा स्वत:ला ब्राह्मण म्हणविणारा एकजण होता. तो एका वेश्येच्या नादी लागला होता. पूर्व जन्मातील पुण्याईमुळे त्यांच्या घरात एकदा ऋषभयोगी त्यांच्या घरी आल्यावर या दोघांनी त्यांचे उत्तम आदरातिथ्य केले. पादसंवाहन वगैरे करुन त्यांची पूजा केली. त्यांना चांगले भोजन दिले. त्यांचे पादतीर्थही प्राशन केले. त्यांना वारा घातला. आपल्या सेवेने त्यांना संतुष्ट केले. ऋषभयोगी त्या दिवशी यांच्याकडे राहून दुसऱ्या दिवशी सकाळी आपल्या संचाराला निघून गेले. हे पुण्यकर्म त्यांच्या कडून घडल्यामुळे ती दोघे ब्रह्मकुळामध्ये जन्माला आली. तो ब्राह्मण दशार्ण



देशाचा राजा वज्रबाहू याच्या राणीच्या पोटी जन्माला आला. त्या राणीने द्वेषभावनेने आपल्या सवतीला गर्भिणी असताना विष दिले. ती मेली नाही पण प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. तो मुलगाही त्या विषप्रयोगाने प्रभावित झाला. मायलेकरांच्या अंगावर व्रण उत्पन्न झाले. ती पीडा अनेक उपायांनी सुद्धा शांत झाली नाही. त्या दोघांना फार यातना होऊ लागल्या. यांच्या अंगाला पू इत्यादीमुळे येणाऱ्या दुर्गंधीने त्रस्त होऊन राजाने त्या दोघांना जंगलात नेऊन सोडले. त्या अरण्यात भयंकर प्राणी होते. पोटात अन्न नाही, देहाला यातना होताहेत, रस्ता माहीत नसल्याने पायात कांटे टोचताहेत, दगडावर ठेचाळते आहे. ती देवाला म्हणू लागली, इतके कष्ट देण्यापेक्षा आम्हाला एखाद्या हिंस्त्र पशुचे भक्ष बनवलेले चांगले. आम्हाला या दु:खातून मुक्त कर. चालता चालता शोक करते आहे. पुढे तिला गाई दिसल्या. त्या गायींच्या मागे हळूहळू जाऊन त्या गवळ्यांना म्हणाली, तहानेने माझे प्राण जायची वेळ आली आहे. त्या गवळ्यांनी सांगितले, या मार्गावर पुढे विहीर आहे तूं पुढे जा. त्या प्रमाणें ती तिथे गेली, पाणी प्यायली. तिथे इतरही स्त्रिया होत्या त्यांना तिने विचारले, इथे कोण राजा राज्य करतोय ? इथले सगळे प्रजाजन आनंदी आहेत. त्या स्त्रियांनी सांगितले, इथे पद्माकर नांवाचा वैश्य राजा राज्य करतो आहे. इतक्यात त्या राजाच्या दासी तिथे आल्या. त्या तिला घेऊन राजवाड्यात गेल्या. राजाने तिची सविस्तर चौकशी केली. तिने पहिल्यापासून सर्व राजाला आपली हकिकत सांगितली. ते ऐकून दया येऊन त्या राजाने तिला आश्रय दिला. लवकरच तिच्या मुलाची व्रणाची पीडा वाढली आणि त्याला मृत्यु आला.

अज्ञानाने त्या मुलाच्या मृतदेहाला उद्देशून ती स्त्री बोलू लागली, माझ्यासारख्या दीन मातेला शोक सागरात लोटून तूं कुठे गेलास बाळा। तुझ्याचकरता म्हणून मी इतके कष्ट सोसले याची तुला आठवण नाही का। तुझ्याचकरता मातापिता बंधू आप्तेष्ट सर्वांना सोडले. मी तुझ्याकरता सर्वांना विसरुन गेले. माझा प्राण तूं आहेस. तूंच जर गेलास तर मी जिवंत कशी राहीन ?

तिचे हे रोदन ऐकून ऋषभयोगी तिथे आले. हे ज्ञानी महात्मे दु:खी जीवाला अगोदर तत्वज्ञान सांगतात. ते जर समोरच्या जीवाला पटलं तर तो जीव मुक्त होतो. त्या जीवांचं तसं पूर्व सुकृत असेल तर ते तत्वज्ञान पटतं. सोडून द्या. माया ममता

गेली. पण ती ममता तशीच जर राहीली तर तत्वज्ञानाचा कांहीही उपयोग नाही असे समजून त्या जीवाची इच्छा असेल त्या प्रमाणे करतात ते. जिवंत करायचे असेल तर जिवंत करतात. पण मग ते जीव मग त्या आसक्तीतच पडतात. अगोदर बोध करुन पहातात.

ऋषभयोगी तिला म्हणाले, ''सर्व जग मायामय आहे. असत् आहे. कशाकरता रडतेस ? पंचभूतांपासून बनलेला नश्वर देह माझा मुलगा आहे ही कल्पना कशाकरता आहे ?'' 'आमच्याजवळ इतके दिवस हा होता ना ! जन्मापासून स्मशानात जाईपर्यंत हा मुलगा नाही असं कसं म्हणता तुम्ही ?' असे त्या स्त्रीने विचारले. ऋषभयोगी तिला म्हणाले, ''किडा हा आपल्या शरीरावरच कंटक देह निर्माण करतो. आयुष्य असेपर्यंत त्या देहामध्ये चेष्टा करतो. देह म्हणजे जीव नाही. तो किटक जसा आपल्या शरीरावर धाम्ना निर्माण करतो तसा जीव हा आपल्या कर्मामुळे, कालकर्मगुणांपासून उत्पन्न झालेला देह पुत्रादि संबंधांना योग्य नाही. किंवा पुरुष, स्त्री या संज्ञेलाही पात्र नाही. तो अचेतन आहे. त्यातला आत्म्याचा अंश तर कायम आहे. त्याला जन्म मरण नाही. हा तर जाणारच आहे. मग कोणाबद्दल शोक करायचा ? म्हणून हा प्रारब्धभोग समजून आयुष्य असेपर्यंत परमेश्वराचे भजन कर.''

असा उपदेश करुन ते थांबले. अत्यंत अनावर दु:खी झालेली ती स्त्री म्हणाली, ''आपण दयाळु आहात, आपण मला अध्यात्मक तत्व सांगितलेत पण अबोधाचाच परिचय मला आहे. अध्यात्म तत्वाचं ज्ञान कसं येणार ? अध्यात्म तत्वज्ञान माझ्या ठिकाणी राहाणं शक्य नाही. ज्यामुळे माझे मन प्रसन्न होईल असे आपण करा. माझ्या या दु:खदशेत ईश्वराच्या प्रेरणेने आपण आलेले आहात. तेव्हां मला सुख होईल असे आपण करा.'' तो बालक म्हणजे मागच्या जन्मात ऋषभ योगींचीच सेवा केलेला होता. साधू केवळ नमस्कार केला तरीही फल देतात. तपामुळे ज्याची बुद्धी अत्यंत प्रदीप्त आहे अशा त्या योग्याने त्या मुलावर भस्म मंत्रित करून टाकल्यावर तो मुलगा उठून बसला. त्याला योग्याने एक तलवार दिली, शैव कवच दिले. दहा हजार हत्तींचे बलही दिले. हा भद्रायु अजिंक्य होईल आणि राजाला शासन करणारा होईल. तो मुलगा आणि ती माता दिव्य गात्र झाले.



राजा ब्राह्मणाला म्हणाला, ''तुम्ही मला सज्जनांचे महात्म्य सांगितलेत. असा साधू पुरुष कुठे आहे ? मी मुसलमान आहे मला हे कसं सांगायचं हे तुम्ही मनांत आणू नका. शुद्ध ब्राह्मणांचा मी दास आहे.''

त्या ब्राह्मणाने सांगितले, ''भीमा अमरजा संगमावर साक्षात् ईश्वरस्वरुप एक साधू पुरुष कुठे आहेत त्यांना शरण जा.'' हे ऐकून तो यवनराजा महाराजांच्या दर्शनासाठी आपल्या सैन्यासह गाणगापुरला येण्यासाठी निघाला. गाणगापुरात आल्यावर त्याने चौकशी केली, इथे कोण तपस्वी पुरुष आहेत असे मी ऐकले ते कुठे राहातात ते मला दाखवा. म्लेंच्छ सैन्य पाहून गांवातले लोक घाबरुन गेले. कांही बोलले नाहीत. तो राजा म्हणाला, ''मी त्यांच्या दर्शनाला आलोय ते कुठे आहेत ते लवकर सांगा मला.'' मग लोकांनी सांगितले की महाराज संगमावर आहेत. हे ऐकल्यावर तो म्लेंच्छ राजा पायीच संगमावर आला. महाराजांना त्याने पाहिले आणि महाराजांनी त्याला विचारले, ''अरे, रजका, कुठं राहातोस तूं ? तुझं सर्व कुशल आहे ना ! इतके दिवस कां आला नाहीस तूं ?'' श्रीगुरुंचे हे शब्द ऐकताच त्याला त्याच्या पूर्व जन्मीचे स्मरण झाले. तो म्हणाला, ''आपण दिलेल्या राज्यामध्ये आसक्त झाल्यामुळे आपले चरण मी विसरलो. माझ्यासारखा रजक आपल्या सत्य संकल्पामुळे, कृपेमुळे मी सार्वभौम राजा झालो. माझ्या अपराधांची आपण क्षमा करा. हे श्रीपादा, कृष्णातीरावर राहाणारा मी रजकच आहे. मी आपला दास आहे.'' अत्यंत दीन होऊन महाराजांच्या पुढे सर्वांगाने नतमस्तक होऊन तो पुढे म्हणाला, ''माझ्या या स्फोटकाच्या व्यथेच्या निमित्ताने मी आपल्याकडे आलो. आंत (माझ्या चित्तात) आपलं मला ज्ञान होतं पण आपल्या शब्दांमुळे ते एकदम प्रगट झालं.''

महाराज म्हणाले, ''कुठं आहे स्फोटक तो दाखिव मला.'' इतके दिवस त्या स्फोटकाच्या व्यथेने तो पीडला असतानासुद्धा महाराजांनी विचारल्यावर स्फोटक दाखवायला जातो तो काय स्फोटक नाही कांही नाही. तो म्हणाला, ''हा स्फोटक जणू काय तुमच्या दूतासारखाच तुमच्या पर्यंत मला आणून सोडण्यासाठी आला होता की काय ? अन्यायाने वागणाऱ्या मला त्याने आपल्याकडे आणले आणि तो दुसरीकडे गेला. आपली वाक्य (आपले शब्द) जागृत असताना दु:ख दोषांनी भरलेल्या असार संसारामध्ये मी मग्न झालेलो आहे. आपण माझा उद्धार करा.'' महाराजांनी विचारले,

''तुझे मन हे भोग भोगून तृप्त झाले की नाही ? उत्तम प्रकारे राज्याचा भोग घेतलास ना ? मुलं बाळं झाली ना तुला ? आता आणखी काय अपेक्षा आहे तुझी ?'' त्या रजकाने सांगितलं, 'आपल्या कृपेने माझ्या सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या. आपणच दिलेली ही श्री आपल्यालाच अर्पण करायची इच्छा आहे.' ''ज्या तुमच्या राज्यात गोहत्या होते तिथे आमचे गमन कसे होईल ? ब्राह्मणादिक सर्व वर्ण मला हंसतील आणि तुला म्लेंच्छ हंसतील,'' असे महाराज त्याला म्हणाले.

पण तो पक्का होता. तो म्हणाला, ''मी रजक आहे आणि आपण माझे स्वामी श्रीपाद आहात. माझ्या नगरात या पुढे हिंसा होणार नाही.'' महाराज म्हणाले, ''मी भक्ताधीन असल्यामुळे येतो तुझे राज्य वैभव पहायला. केवळ म्लेंच्छ आहे म्हणून माझे जे भक्त आहेत त्यांची उपेक्षा करणे योग्य नाही.'' महाराजांचे बोलणे ऐकून प्रसन्न झालेल्या राजाने पालखीमध्ये उत्तम आसन करुन महाराजांना बसवले, त्यांच्या इतर शिष्यांनाही पालखीची व्यवस्था केली. आणि महाराजांच्या पादुका हातात घेऊन तो राजा आपल्या नगराच्या दिशेने चालू लागला. महाराज त्याला म्हणाले, ''राजा, इथून तुझे नगर फार लांब आहे. आपल्याला खूप दूर जायचे आहे. तुझ्या सारख्या सार्वभौम राजाने असे पायी चालणे बरे नाही.'' राजा म्हणाला, ''कोण मला सार्वभौम म्हणतयं ? ही लोकलज्जा सगळी गेली पाहिजे. मी राजा आहे. आपणही जवळच्या पालखीत बसायचे आणि बोलत बोलत जायचे असे नाही. मी आपला अनुचर आहे. भूमीचा भार आपणच मला दिलेला आहे. आपल्या आज्ञेप्रमाणेच मी सेवा करतोय.''

महाराज म्हणाले, ''तुला दिक्पालांच्या अंशाने राजत्व दिलेले आहे. म्हणजे तूं साक्षात् विष्णुसारखा आहेस. तेव्हा माझ्या आज्ञेने पायी न येता घोड्यावर बसून ये. तुमच्या अशा चालण्याने आमचा क्रियालोप होईल. मी पुढे जातो. पापनाश तीर्थावर थांबतो तिथे तूं हळूं हळूं ये.'' असे म्हणून अर्ध्या क्षणात चाळीस कोसावरच्या पापनाशतीर्थावर महाराज गेले. आपल्या शिष्यां समावेत सायंकालचे नित्यकर्म तिथे केले. एवढ्यात सायंदेवांचे पुत्र नागनाथ त्यांनी महाराजांना पाहिले. चकोराला जसा चंद्र पाहून आनंद होतो तसा नागनाथांना महाराजांना पाहून अतिशय आनंद झाला. महाराजांचे आन्हिक आटोपल्यावर त्याने महाराजांना आपल्या घरी नेले आणि त्यांना



भिक्षा दिली सर्व शिष्यांसह. महाराज नागनाथाला म्हणाले, ''तो म्लेंच्छ राजा आता इथे येईल. तेव्हां इथे न राहता आम्ही तीर्थावर जातो. तो म्लेंच्छ राजा गांवात आला म्हणजे त्याचा उपद्रव होईल.'' आणि त्या प्रमाणे तो राजा तिथे येण्यापूर्वी महाराज आपल्या शिष्यांसह पापनाश तीर्थावर आले. तो पर्यंत तो राजाही तिथे येऊन पोहोचला. तिथून त्याने महाराजांना आपल्या नगरामध्ये नेले. सर्व नगर ध्वज, पताका, रत्नांकित तोरणांनी सुशोभित केले. पालखी नगराच्या वेशीवर आल्यावर त्याने महाराजांना ओवाळले. मोठ्या सन्मानाने त्याने महाराजांना आपल्या राजवाड्यात नेले. त्यांच्यासाठी गालीच्याच्या पायघड्या घातल्या होत्या. सिंहासनावर बसवून त्यांची पाद्यपूजा केली. महाराजांच्या बरोबर आलेल्या शिष्यांचीही पूजा केली. आपल्या सर्व कुटुंबियांना महाराजांचे दर्शन घडवले. गीत, वाद्य, चामर, नृत्य असे सर्व त्यांना अर्पण केले. आपला सगळा परिवार त्यांना दाखवला. त्याच्या म्लेंच्छ जातीच्या लोकांनी त्याचा ह्याप्रमाणे पूजा अर्चा केल्याबद्दल धिक्कार केला. द्विजांनी मात्र राजाला आशीर्वाद दिले.

राजाने त्या म्लेंच्छांच्या टीकेकडे कांही लक्ष दिले नाही. महाराज म्हणाले, ''तुझा सगळा परिवार पाहून मला आनंद झाला. या सर्व परिवारासह तूं संतुष्ट झालास की नाही ?'' तो राजा म्हणाला, ''या वैभवामुळे मला अजिबात समाधान नाही. माझे सर्व वैभव मी आपल्या चरणावर अर्पण केले आहे.''

महाराज म्हणाले, ''सर्वस्व दिल्याशिवाय कसं मिळेल ?'' राजाने आत्मनिवेदन करुन सर्व राज्य महाराजांना देऊन टाकलं. संकल्पपूर्वक आत्मा आणि सर्वस्व देऊन टाकलं. म्हणजे मिळालेले स्थान टिकलं पाहिजे ही इच्छा नाही. देऊन टाकायचं. नाही तर अशक्य काय होतं ? महाराजांच्या कृपेनेच सगळं मिळालं होतं. त्यामुळे बाकीचे म्लेंच्छ कांही बोलू शकत नव्हते. राजाला काय बोलू शकतात ते ! इतके दिवसांची स्फोटकाची व्यथा एका क्षणात गेली हे धडधडीत दिसतयं ! महाराजांच्या कृपेचा असा अनुभव आहे. म्हणून बाकीचे तरी काय बोलणार ? नुसता स्फोटक गेला असं नाही तर त्याला पूर्वजन्माची स्मृती दिली. म्हणजे पूर्वजन्मापासून त्याचा आणि महाराजांचा संबंध आहे हे आता कोणाला खरं वाटो अगर न वाटो, नास्तिक लोकांना वाटणार नाही. पण अनुभव आहे ना तो !

महाराज म्हणाले, ''तूं आत्मनिवेदन केलस हे फार चांगलं केलंस. तुझ्या इच्छेप्रमाणे तुला काय हवं ते देतो. तुझी माझ्या ठिकाणी भक्ती आहे.'' हां! काय केलं महाराजांनी त्या राजाच्या तरुण पुत्राला बोलावून राज्याची सर्व जबाबदारी सोपिवली आणि राजाला म्हणाले, ''तूंही आता इथून लगेच बाहेर पड. मी सुद्धा इथून लवकर मठामध्ये जाऊन इतर सर्व भक्तांचे समाधान करुन श्रीपर्वतावर जाणार आहे. तूंही तिथे ये. तिथे तुला माझे दर्शन होऊन तूं जीवनमुक्त होशील.'' सगळी वासना संपलेली आहे ना! कांही शिल्लक राहिलेली नाही. असे सांगून महाराज संगमावर आले शिष्यांसह स्नान इ. आटोपले. राजाने (गाणगापुरातल्या) व सर्व शिष्यांनी महाराजांची निरांजन वगैरे ओवाळून आरती केली, ब्राह्मण भोजन झाले. सर्वत्र भक्तीचा प्रसाद झाला.

○○○



# अध्याय ५१

म्लेंच्छही भजन करायला लागले. आता इथे सगुणरुपाने राहाणे बरं नाही असा महाराजांनी विचार केला.

म्लेंच्छ राजाला सांगितल्याप्रमाणे महाराज श्रीशैल्य पर्वतावर गेले. म्लेंच्छ राजाने आत्मा आणि देह देऊन टाकला होता म्हणून महाराजांनी त्याच्या मुलाची नेमणूक करुन टाकली. म्लेंच्छ राजा महाराजांनी बोलावल्याप्रमाणे श्रीशैल्यावर त्यांना भेटला. त्याला सद्‌गती देऊन पुन्हा मठात आले. भजकांची कामधेनु असे भगवान त्या ठिकाणी प्रत्यक्ष राहिले. अनार्यांना मात्र ते अगोचर राहिले.

कृष्णा पंचगंगा संगमावर महाराज वाडीत स्नान करतात. या ठिकाणी (गाणगापुरात) भीमा अमरजा संगमावर सकाळचे आन्हिक वगैरे आटोपून गांवातल्या मठात भिक्षा घेऊन तिथे राहातात. त्यांनी पुष्कळ लीला दाखिवल्या. अजूनही दाखिवताहेत. पुढेही दाखिवणार आहेत. समजायला कठीण असा त्यांचा प्रभाव कोण जाणू शकणार आहे! ज्याची जशी इच्छा असेल ती महाराजांच्या भजनाने पूर्ण होते. भजकाचे अनुसरण करणारा भगवान् आहे तो! भगवंताच्या दुसऱ्या कला कलीयुगात जागृत आहेत की नाहीत कोणास ठाऊक! साक्षात् भगवान् इथे आहेत. त्यांचे श्रद्धेने संशय मनांत न आणता भजन कर.

नामधारकाला दर्शन झालेले नाही. पण तो श्रवणाने मुक्त झालेला आहे. सिद्धांनी सांगितल्याप्रमाणे संशयरहित भावनेने त्याने गुरुंची पूजा केली. हा संवादरुप ग्रंथ, धर्मयुक्त असा गंगाधरात्मज आहे, त्याने हा श्रीगुरु चरित्र ग्रंथ रचला. हा ग्रंथ कुठेही स्थापन केला असता प्रेत, भूत, राक्षसादि असत् ग्रह जे आहेत त्यांची पीडा दूर करणारा आहे. या ग्रंथाचा सप्ताह करणाऱ्याची तसेच ऐकणाऱ्याचीही दत्तात्रेय सर्व इच्छा पूर्ण करतात. दत्तात्रेय हे आत्रेय गोत्रामध्ये उत्पन्न झालेले गणेश पुत्र जे आहेत त्याची वाणी पवित्र करणारे या ग्रंथामध्ये तोच ग्रंथात्मा सद्गुरु तारक उत्कर्षाने आहे.

गणेश ब्रह्म - गणेश ब्राह्मणाच्या पुत्राची 'गा' म्हणजे वाणी त्याला पवित्र करणारी म्हणजे त्यानेच आपल्या वाणीने हे करवून घेतले आहे. तेव्हां ह्याही ग्रंथाचा तोच ग्रंथात्मा आहे. गुरुचरित्ररुपी असणारा दत्तात्रेय असणारा ग्रंथात्मा हाच तारक आहे.

**।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।**

OOO

Graphic Printers Borivali (W) : 9322 840 846 / 2899 92 39 / 2899 93 30